छत्रपती शिवाजी महाराजांचे

हिंदू, मुसलमान आणि ख्रिस्ती सेवक

गजानन भास्कर मेहेंदळे

छत्रपती शिवाजी महाराजांचे

हिंदू, मुसलमान आणि ख्रिस्ती सेवक

गजानन भास्कर मेहेंदळे

छत्रपती शिवाजी महाराजांचे
हिंदू, मुसलमान आणि ख्रिस्ती सेवक

गजानन भास्कर मेहेंदळे

© गजानन भास्कर मेहेंदळे

प्रथम आवृती : १५ ऑगस्ट २०२५

प्रकाशक :
ऐतिहासिक साहित्य प्रकाशन
संपर्काचा पत्ता:
गजानन भास्कर मेहेंदळे
१०१, मधुली, वडगाव,
सिंहगड रोड, पुणे ४१.
Email: asprakashan9@gmail.com

या पुस्तकातील कोणताही मजकुरात बदल न करण्याच्या शर्तीवर हे पुस्तक वितरित करण्याची सर्वांना परवानगी आहे.

प्रस्तावना

इतिहास सर्वस्पर्शी असतो. त्यामुळे, राजनीती, राजकारण, हे विषय इतिहासात येणारच. पण इतिहासाचा माणसांच्या भावनांवर परिणाम होतो. त्यामुळे राजकारणात इतिहास येतो, एवढेच नव्हे तर इतिहासलेखनात राजकारण येते. हे आज नव्याने घडते आहे असे नाही. पण प्रसारमाध्यमांची व्याप्ती आणि गती आता खूपच वाढल्यामुळे इतिहासलेखनातील राजकारण दिवसेंदिवस अधिक आक्रमक, अधिक उग्र, अधिक हिंस्र होऊ लागले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्रही याला अपवाद नाही. त्यामुळे. त्यांच्या राज्याचा हेतू काय होता, त्यांना प्रेरणा कुठून मिळाली, यांसारखे प्रश्न अतिसंवेदनशील झाले आहेत, किंबहुना करण्यात आले आहेत. त्यांच्या सेवेतील मुसलमानांची संख्या हा असाच एक प्रश्न आहे. अलीकडेच एका गृहस्थांनी मला एका वृत्तपत्राचे कात्रण दाखविले, सहासात वर्षांपूर्वीचे असेल. शिवाजी महाराजांच्या सेवकांमध्ये मुसलमानांचे प्रमाण नव्वद टक्के होते असे एका व्याख्यानात सांगण्यात आल्याचे वृत्त त्या कात्रणात होते. हे टोकाचे उदाहरण झाले. एवढा अतिरेक सामान्यतः, सहज लक्षात येण्याजोगा असल्याने, निरुपद्रवी ठरतो. पण छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वसनीय साधनांमधून दिसणारे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न यापेक्षा अधिक सूक्ष्म, अधिक तरल पद्धतीने, अधिक सफाईने, गेली का ही वर्षे सुसंघटितपणे होत आहे.

अशा परिस्थितीत इतिहासकाराने काय करावे याचे उत्तर प्रोफेसर रमेशचंद्र मजुमदार यांनी ***The History and Culture of the Indian People*** या ग्रंथाच्या सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत देऊन ठेवले आहे. तेच मी पुढे माझ्या शब्दांत सांगतो:

इतिहास हे काही विशिष्ट राजकीय, सामाजिक आणि आर्थिक कल्पनांचे वाहन म्हणून वापरण्याची प्रवृत्ती जगात सर्वत्र आढळते, सध्या ती, एखाद्या ढगाप्रमाणे, माणसाच्या तळहाताइतकी लहान दिसली तरी ती वाढत जाऊन आकाश झाकोळून टाकू शकेल. या प्रवृत्तीविरुद्ध लढण्याकरिता इतिहासकाराकडे एकच शस्त्र आहे: ते म्हणजे परिणामांची तमा न बाळगता सत्य सांगत राहणे. इतिहासकाराने वारा वाहील त्याप्रमाणे आपले शीड फिरविता कामा नये; त्याने सत्याचा शोध हे त्याच्या प्रवासाचे ध्येय नजरेसमोर ठेवून सरळ रेषेत जात राहिले पाहिजे.

तेच कर्तव्य मी या पुस्तिकेच्या रूपाने पार पडतो आहे

गजानन भास्कर मेहेंदळे

निवेदन

काही वर्षांपूर्वी एका आगामी पुस्तकाकरिता तिथून ठेवलेले एक परिशिष्ट या पुस्तिकेच्या रूपात मी प्रकाशित करीत आहे. आधार देताना पुस्तकांच्या नावांचे जे संक्षेप मी वापरले आहेत त्यांचा खुलासा 'संक्षेप' अशा मथळ्याखाली दिला आहे. पुस्तिका लवकर प्रसारित करता यावी म्हणून या पहिल्या आवृत्तीत संदर्भ–ग्रंथ–सूची दिलेली नाही. पण तिच्यात वापरलेल्या बहुतेक पुस्तकांचा तपशील श्री राजा शिवछत्रपती, भाग २ या माझ्या पुस्तकाच्या संदर्भ–ग्रंथ–सूचीत आहे. जी मोजकी पुस्तके त्याही संदर्भ–ग्रंथ–सूचीत नाहीत ती सर्व भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे या संस्थेच्या ग्रंथालयात आहेत. तिथे ती कोणालाही पाहता येतील. थोड्याच दिवसांत मी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित करणार आहे, तिच्यात संदर्भ–ग्रंथ–सूची देईन. जमले तर त्या आवृत्तीत थोडा मजकूरही वाढवीन.

शिवाजी महाराजांच्या हिंदू सेवकांच्या यादीनंतर 'स्पष्टीकरणार्थ टीपा' अशा मथळ्याखाली काही टीपा दिल्या आहेत. संदर्भाकरिता दिलेल्या 'टीपा संदर्भ' टीपा अशा मथळ्याखाली शेवटी दिल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज निधन पावले तेव्हा त्यांच्या सैन्यात चाळीस हजार स्वार आणि त्याहून अधिक पदाती होते. त्या सर्वांची नावे मिळणे अशक्य आहे. या पुस्तिकेत ज्या याद्या दिल्या आहेत त्यांच्यातील नावे उपलब्ध साधनांमधून घेतली आहेत. अर्थातच ही केवळ नमुना पाहणी (सॅम्पल टेस्टिंग) आहे.

ऋणनिर्देश

माझे मित्र मला माझ्या कामात सर्व प्रकारे नेहमीच साहाय्य करतात. साहाय्य अनेकांनी केले आहे आणि पुस्तिका लहान आहे म्हणून त्यांचा नामनिर्देश करीत नाही. मी त्यांचा ऋणी आहे.

माझ्या इतर पुस्तकांप्रमाणे ही पुस्तिकाही माझे मित्र श्री. प्रदीप रावत यांनी आधीच वाचली आहे आणि उपयुक्त सूचनाही केल्या आहेत. मात्र या पुस्तिकेतील सर्व मजकुराची जबाबदारी माझीच आहे.

गजानन भास्कर मेहेंदळे

संक्षेप

१. ऐफासा = ऐतिहासिक फारसी साहित्य, ऐतिहासिक फार्सी साहित्य.

पुढे खंड क्रमांक.

२. ऐसंसा = ऐतिहासिक संकीर्ण साहित्य. पुढे खंड क्रमांक

३. चिटणीस बखर = श्री. शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र.

४. पर्णाल = पर्णालपर्णतग्रहणाख्यानम्.

५. पुद = पुरंदरे दफ्तर. पुढे खंड क्रमांक.

६. पेद = पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद. पुढे खंड क्रमांक.

७. भाइसमं = भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

८. मइसा = मराठ्यांच्या इतिहासाची साधने. पुढे खंड क्रमांक.

९. शिचप्र = शिवचरित्रप्रदीप.

१०. शिचसा = शिवचरित्रसाहित्य. खंड क्रमांक.

११. शिभा = श्रीशिवभारत

१२. शेडगावर बखर = मराठी दप्तर, रुमाल पहिला.

१३. सभासद बखर = छत्रपती श्रीशिवाजीराजे यांची बखर

14. EFI = The English Factories in India.

15. ERS = English Records on Shivaji.

16. RSP = Records of the Shivaji Period.

17. SDAR = Selected Documents of Aurangzeb's Reign.

अनुक्रमणिका

प्रस्तावना	तीन
निवेदन	पाच
ऋणनिर्देश	पाच
संक्षेप	सहा
याद्यांकरिता वापरलेले निकष	१
शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक	६
स्पष्टीकरणार्थ टीपा	३७
शिवाजी महाराजांचे मुसलमान सेवक	४७
शाहजी महाराजांनी नेमलेले मुसलमान सेवक	५१
काझी हैदर, दर्यासारंग आणि दौलतखान	५८
शत्रूंकडून फुटून आलेले सरदार	६०
इतर मुसलमान सेवक	६१
मदारी मेहतराची गोष्ट	६२
मदारी मेहतराच्या गोष्टीचे परीक्षण	६५
जदुनाथ सरकार यांचे विधान	७२
काझीपणाचे वतन	७४
सिद्दी संबुल आणि सिद्दी मिस्त्री	७८
काझी हैदर	८२
काही थापांचे परीक्षण	८३
पुन्हा एकदा काझी हैदर	८४
शिवाजी महाराजांचे चित्र आणि मीर मुहम्मद	८६
रुस्तम-इ ज़मान	८८
रायगडावरील मशीद	८९
अफजलखानाची कबर	९२
शिवाजी महाराजांचे ख्रिस्ती सेवक	९६
संदर्भ टीपा	१००

छत्रपती शिवाजी महाराजांचे
हिंदू, मुसलमान आणि ख्रिस्ती सेवक

शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुसलमानांचे प्रमाण फार मोठे होते असा प्रचार छापील स्वरूपात व इंटरनेटवर गेल्या काही वर्षांपासून होत आहे आणि काही ठिकाणी तर ते प्रमाण ७० टक्के किंवा अधिक होते असेही सांगण्यात आले आहे![१] हा सर्व प्रचार धादांत खोटा आहे हे सप्रमाण दाखवून देण्याकरीता या पुस्तिकेत महाराजांच्या सेवेतील हिंदूंच्या व मुसलमानांच्या याद्याच दिल्या आहेत. महाराजांच्या सेवेत काही ख्रिस्ती धर्मीयही होते. त्यांचीही माहिती शेवटी दिली आहे. धर्म नावावरून ठरवला आहे.

याद्यांकरिता वापरलेले निकष

पुढे ज्या याद्या दिल्या आहेत त्यांतील नावे समकालीन पत्रांमधून, समकालीन ग्रंथांमधून, जेधे शकावलीसारख्या विश्वसनीय साधनांमधून आणि सभासद बखरीतून घेतली आहेत. या बाबतीत कोयाजी बांदल, कावजी मल्हार व बाजी पासलकर हे तीन प्रमुख अपवाद मी केले आहेत. त्यांची नावे मी उत्तरकालीन साधनांमधून घेतली आहेत आणि ती स्वीकारण्याची कारणे त्या नावांवरील टीपांमध्ये थोडक्यात दिली आहेत. समकालीन इंग्रजी, पोर्तुगीज व डच पत्रव्यवहारातूनही ज्यांच्याशी पत्रव्यवहार झाला असेल किंवा ज्यांच्याशी बोलणी झाल्याचा उल्लेख असेल अशांचीच नावे मी ग्राह्य मानली आहेत; अशा पत्रव्यवहारात आलेल्या ऐकीव माहितीत (hearsay) जी नावे आली असतील ती मी ग्राह्य मानलेली नाहीत. उदाहरणार्थ : शिवाजी महाराजांनी पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटून जाण्यापूर्वी सलाबतखानाकडे (म्हणजेच सिद्दी जौहरकडे) गंगाधर नावाचा वकील पाठवला होता असा उल्लेख वेंगुर्ल्याहून पाठवण्यात आलेल्या ५ सप्टेंबर १६६० या तारखेच्या एका डच पत्रात आहे. पण तो उल्लेख पन्हाळ्याच्या वेढ्यातून वेंगुल्यांच्या एका व्यापाऱ्याला आलेल्या पत्रातून त्या डच पत्रात उद्धृत केलेल्या हकिगतीतील आहे. म्हणजे ती डचांना असलेली प्रत्यक्ष माहिती नाही. म्हणून त्या उल्लेखातील गंगाधर याचा समावेश मी महाराजांच्या हिंदू सेवकांमध्ये

केलेला नाही. त्याच कारणाकरिता त्या पत्रातील शिवा नाभिक (barber) याचे ही नाव माझ्या यादीत नाही.

सभासद बखरीखेरीज इतर बखरींमधील नावे — जर त्या नावांचा विश्वसनीय साधनांमध्ये उल्लेख नसेल तर — मी पुढे दिलेल्या याद्यांमध्ये समाविष्ट केलेली नाहीत. उदाहरणार्थः शायिस्ताखानाने चाकणचा किल्ला काबीज केला तेव्हा फिरंगोजी नरसाळे हा महाराजांतर्फे तेथील हवालदार (किल्लेदार) होता असा उल्लेख चिटणीस बखरीत (पृ. १३०) आहे. पण ते नाव कोणत्याही विश्वसनीय साधनांमध्ये आलेले नाही. म्हणून मी त्या नावाचा समावेश पुढे दिलेल्या यादीत केलेला नाही. आख्यायिका किंवा जनश्रृती अशा नावाखाली अलीकडे पुढे आलेली नावेही मी स्वीकारलेली नाहीत.

याद्या देताना मी मुलकी आणि लष्करी असा भेद केलेला नाही कारण शिवकालातील परिस्थितीमुळे शिवाजी महाराजांच्या सेवेतील प्रत्येकजण हा मूलतः सैनिक किंवा सैनिकी अधिकारीच असे. त्यांच्यापैकी काहीजणांवर मुलकी कारभाराची जबाबदारी सोपवलेली असली तरी जरुरीनुसार त्यांना लष्करी मोहिमांवरही जावे लागे आणि अशी उदाहरणेही अपवादात्मक होती असे नाही. उदाहरणार्थ : मोरो त्रिमल ऊर्फ मोरोपंत पिंगळे हा पेशवा होता म्हणजे प्रामुख्याने मुलकी कारभार करणारा अधिकारी होता. पण १६७२ मध्ये साल्हेरच्या लढाईत त्याने हशमांचे म्हणजे पायदळाचे नेतृत्व केले होते आणि सरनौबत प्रतापराव याने लष्कराचे म्हणजे घोडदळाचे नेतृत्व केले होते.[२] त्या पाठोपाठ जव्हार काबीज करण्याची कामगिरीही मोरोपंतानेच बजावली होती.[३] तिळो सोनदेव हा मुजुमदार म्हणजे वित्तमंत्री होता. पण मला लष्करी कामगिरी सांगत जा अशी विनंती त्याने शिवाजी महाराजांकडे केली होती.[४] पुढे १६७० मध्ये पुरंदर किल्ला काबीज करण्याची कामगिरी त्यानेच बजावली होती.[५] त्या मोहिमेत केसो नारायण नऱ्हेकर धारातीर्थी पडला.[६] तो मुळात सबनीस होता.[७] नोकरीतील लोकांची हजेरी ठेवणे व पगार देणे हे सबनिसाचे काम असे. कृष्णाजी भास्कर हा मुख्यतः मुलकी प्रशासकीय अधिकारी होता. १६६८ मध्ये तो मावळे सुभ्याचा आणि १६७४ मध्ये

वाई सुभ्याचा सुभेदार होता.[८] पण १६७३ मध्ये तो उमराणीच्या लढाईत सहभागी होता.[९] काही अधिकारी मात्र नेहमीच लष्करी सेवेतच असलेले आढळतात. उदाहरणार्थ : नेतोजी पालकर, तानाजी मालुसरे, प्रतापराव गुजर इत्यादी.

जे वतनदार (पाटील, कुलकर्णी, देशमुख आणि देशकुलकर्णी ऊर्फ देशपांडे) खुद्द शिवाजी महाराजांच्या सेवेत मुलकी किंवा लष्करी पदावर काम करीत होते असा पुरावा आहे त्यांची नावे मी यादीत घेतली आहेत, इतर वतनदारांची घेतलेली नाहीत. उदाहरणार्थः कान्होजीचा मुलगा बाजी (सर्जेराव) जेधे हा रोहिडखोऱ्याच्या भोर तरफेचा वंशपरंपरेने देशमुख होता. शिवाय तो महाराजांच्या लष्करी सेवेतही होता. म्हणून त्याचे नाव यादीत घेतले आहे. पंताजी गोपीनाथ बोकील हा सुपे परगण्याच्या पिढीजात देशकुलकर्णी होता.[१०] शिवाय तो शिवाजी महाराजांच्या नोकरीतही होता. म्हणून त्याचे नाव यादीत घेतले आहे. पुण्याचे पाटील झांबरे व पुणे परगण्याचे देशमुख शितोळे यांच्यापैकी कोणी शिवाजी महाराजांच्या सेवेत मुलकी किंवा लष्करी पदावर काम करीत असल्याचा पुरावा, मी ठरवलेल्या निकषांनुसार, मला मिळाला नाही. म्हणून त्यांच्यापैकी कोणाचे नाव मी यादीत घेतले नाही. विनायकभट ठकार हा पुणे परगण्यातील दहा गावांचा कुलकर्णी होता.[११] पण तो शिवाजी महाराजांच्या सेवेत असल्याचा पुरावा मला मिळाला नाही. म्हणून त्याचे नाव मी यादीत घेतले नाही.

मी केलेली यादी सर्वांना मान्य होईलच असे नाही ज्यांना ती मान्य नसेल त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे यादी करण्याचे स्वातंत्र्य आहेच.

पुढे दिलेली महाराजांच्या हिंदू सेवकांची यादी वर्णानुक्रमे दिली आहे. त्यांच्यापैकी कित्येकांचे आडनाव साधनांमध्ये दिलेले नसते, म्हणून क्रम व्यक्तिनामानुसार, आणि क्वचित किताबानुसार, लावला आहे. ज्याचे व्यक्तिनाम साधनामध्ये नसेल त्याचा क्रम त्याच्या आडनावानुसार लावला आहे. काही व्यक्तिनामांपुढे पंडित अशी उपाधी लावलेली आढळते. तिथे पंडित हे आडनाव नसते किंवा त्या व्यक्तीच्या वडिलांचे नावही नसते. ती त्या काळी ब्राह्मणांना अतुलक्षून वापरली जाणारी उपाधी आहे. व्यक्तिनामापुढे ती उपाधी लावली असेल

तर सामान्यतः पुढे आडनाव किंवा वडिलांचे नाव दिलेले नसते. मराठी नावांच्या बाबतीत इंग्रजी, पोर्तुगीज व डच पत्रांमध्येही पंडित ही उपाधी वापरल्याचे आढळते. चांद्रसेनीय कायस्थ प्रभू जातीच्या पुरुषांच्या नावापुढे सामान्यतः प्रभू ही उपाधी लावत; ती कधी व्यक्तिनामापुढे लावलेली असते तर कधी वडिलांच्या नावापुढे लावलेली असते. नाईक ही एक आदरार्थी उपाधी काही व्यक्तिनामांपुढे लावलेली आढळते.

व्यक्तिनामांच्या किंवा आडनावांच्या बाबतीतही अक्षरविन्यासांमध्ये एकसूत्रता आढळत नाही. एखाद्या व्यक्तीचे नाव वेगवेगळ्या प्रकारे लिहिल्याचे आढळते. उदाहरणार्थ : तानाजी/तान्हाजी, महादजी/माहादाजी, रावजी/राऊजी/राहूजी, एसाजी/येसाजी, राघो/राघोजी, त्र्यंबक/त्रिंबक/त्रिमल, गंगाधर/गंगाजी इत्यादी. मी प्रत्येकाच्या बाबतीत कोणतातरी एक अक्षरविन्यास स्वीकारून त्याप्रमाणे क्रम लावला आहे. वर्गीय व्यंजनांच्या पूर्वी येणारी अनुनासिके शिरोबिंदूनेच दर्शवली असली तरी यादीत क्रम लावताना मात्र परसवर्ण विचारात घेऊन क्रम लावला आहे. उदाहरणार्थ : अंतोजी = अन्ताजी, कोंडाजी = कोण्डाजी, गंगाधर = गङ्गाधर.

कित्येक नावांचा उल्लेख साधनांमध्ये अनेकवेळा आलेला आहे, पण मी प्रत्येक नावापुढे सामान्यतः फक्त एकच आधार दिला आहे.[१२] शक्यतो त्या व्यक्तीला जो जास्तीत जास्त वरचा हुद्दा मिळाला असेल तो दिला आहे. उदाहरणार्थ: नेतोजी पालकर आधी पुरंदर किल्ल्याचा हवालदार (किलेदार) होता.[१३] पुढे तो सरनौबत (सेनापती) झाला. म्हणून त्याचा हुद्दा सरनौबत असा दिला आहे.[१४] बहुतेक ठिकाणी आधारापुढे कंसात इसवी सन दिला आहे. तो त्या व्यक्तीला मिळालेल्या हुद्द्याचा नसून आधार म्हणून दिलेल्या पत्राचा किंवा साधनातील प्रसंगाचा सन आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या तृतीय संमेलन वृत्तात (शके १८३७) ‘स्वराज्यांतील देशाधिकारी’ अशा मथळ्याखाली पृ. १२७ ते १३१ मध्ये भास्कर वामन भट यांनी स्वराज्यातील हवालदार, सुभेदार व सरसुभेदार या मुलकी प्रशासकांची यादी दिली आहे. स्वराज्यात त्या पदावरील अधिकाऱ्यांच्या बदल्या

होत असत हे दाखवण्याकरिता ती यादी दिली आहे. तिच्यात शिवकालानंतरच्या अधिकाऱ्यांचीही नावे आहेत. ती देण्याकरिता मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १५, १६, १७, १८ व २० आणि श्री समर्थ संप्रदायाचीं कागदपत्रें या ग्रंथांमध्ये छापलेल्या पत्रांचा उपयोग केला असल्याचे तिथे सांगितले आहे, मात्र नावांपुढे आधार दिलेले नाहीत. त्या यादीत शिवकालातील नावे बावीस आहेत. त्यांपैकी शक १५९६ खाली दिलेले नरसाला, किल्ला वसंतगड हे एक नाव मला मिळाले नाही.

शिवकालीन पत्र-सार-संग्रह, खंड ३ च्या पृ. २११-१२ मध्ये शिवशाहींतील अधिकारी अशा मथळ्याखाली ९५ नावे छापली आहेत. ''शिवशाहींतील सुभेदार, सरसुभेदार व हवालदार यांची उपलब्ध पत्रांत आढळणारी काही नावे अक्षरानुक्रमे देऊन पुढे शक दर्शवले आहेत'' असे तिथे म्हटले आहे; नावांपुढे आधार दिलेले नाहीत. त्या यादीतील काही नावे पुढे मी दिलेल्या यादीत नाहीत. त्याची कारणे पुढे थोडक्यात सांगतो : काशी रंगनाथ हा छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत जावळी प्रांतात देशाधिकारी होता. त्यास संभाजी महाराजांनी पाठवलेले जुन्यातले जुने पत्र १८ ऑक्टोबर १६८० चे आहे. तत्पूर्वी तो शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत अधिकारी असण्याची बरीच शक्यता आहे. पण मी त्याचे नाव यादीत घेतलेले नाही, कारण तो शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत अधिकारी होता असा पुरावा (अनुमान नव्हे) नाही. खेम सावंत (सरदेसाई, कुडाळ), मल्हारजी यशवंतराव (देशमुख, शिरवळ), महादाजी राम (देशकुलकर्णी, शिरवळ), रामाजी जगताप (सुपे खुर्द या गावच्या पाटीलकीचा दावेदार), विठोजी सिलिंबकर (देशमुख, गुंजण मावळ), शंकराजी निळकंठराव (सुपे खुर्द या गावच्या पाटीलकीत हिस्सेदार) हे वतनदार असले तरी शिवाजी महाराजांच्या मुलकी किंवा लष्करी सेवेत होते असा पुरावा नाही. त्यामुळे त्यांची नावे माझ्या यादीत नाहीत. बाजी सर्जाराव आणि सर्जाराव देशमुख या वेगळ्या व्यक्ती नाहीत, एकच आहेत; बाजी हे नाव आहे आणि सर्जाराव हा किताब आहे. माझ्या यादीत बाजी सर्जाराव आहे, सर्जाराव देशमुख नाही. गंगाजी मुद्गल आणि गंगाधर मुद्गल याही वेगळ्या

व्यक्ती नाहीत. गंगाजी हे गंगाधरचेच रूप आहे. माझ्या यादीत गंगाजी मुद्‌गल आहे, गंगाधर मुद्‌गल नाही. गणेश जोगदेऊ ही छपाईची चूक आहे, तिथे गणेश गोजदेऊ (गोजदेव) असे हवे. माझ्या यादीत गणेश गोजदेव आहे, गणेश जोगदेऊ नाही. गिरमाजी तुकदेव, पिलाजी घाटगे, बाबाजी अस्ताग्ने, मल्हारजी लोंढे आणि रामाजी – हवालदार कोंडाणा ही शिवकालीन–पत्र–सार–संग्रह, खंड ३ मधील यादीत असलेली नावे मला शिवकालीन साधनांमध्ये आढळली नाहीत, कदाचित ती माझ्या नजरेतून निसटली असतील. त्यामुळे ती माझ्या यादीत नाहीत.

शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक

१. अनाजी (अण्णाजी) दत्तो, सचिव. मइसा १५, लेखांक १४२ (१६७८).
२. अनाजी वाळके, (तट) सरनौबत, कोट उटतूर.[१५] मइसा ८, लेखांक ३५ (१६७७). (स्पष्टीकरण टीप क्र. १ पण पहा.)
३. अंताजी पंडित, सुरतेत वकील. *ERS*, Vol. I, No. 228 (1670).
४. अंताजी सिधनाथ, हवालदार, बामणोली, सुभा जावळी. शिचसा ३, लेखांक ६३९ (पृ. २२६, १६५७).
५. अंतो हेमाद्री, मुख्य देशाधिकारी, प्रांत कोपळ. शिचसा ६, लेखांक ४४ (१६७९).
६. अमरोजी पांढरे. सभासद बखर, पृ. ९८.
७. अर्जोजी यादव, हवालदार, इमारत, प्रतापगड.[१६] शिचसा १०, लेखांक ५४ (१६५६–५७) (स्पष्टीकरण टीप क्र. २ पण पहा.)
८. (मकाजी) आनंदराव. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २५, १६७२); सभासद बखर, पृ. ६०.
९. आबाजी महादेव, हेजीब. मइसा १७, लेखांक १० (१६५७).
१०. आबाजी मोरदेव, देशाधिकारी, प्रांत जावळी. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें, खंड १, लेखांक १४ (१६७६).
११. आमाजी कान्हो, हवालदार, संमत हवेली, परगणा वाई. मइसा २०, लेखांक १५३ (१६७४).

१२. आवजीपंत, पोर्तुगिजांकडे वकील. पोर्तुगेज – मराठे संबंध, पृ. ८२ (१६७७).

१३. इंद्रोजी गावडे. सभासद बखर, पृ. ९९.

१४. उचाले. सभासद बखर, पृ. ९८.

१५. उदोजी पवार. सभासद बखर, पृ. ९८.

१६. उधो राम, सरमुजुमदार, तर्फ मावळ. शिचसा २, लेखांक २८१ (१६७५).

१७. एसाजी राम, हवालदार, संमत निंब, परगणा वाई. मइसा २०, लेखांक १५५ (१६७९).

१८. एसाजी लखमाजी जाधव, (तट) सरनौबत, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

१९. एसू काकडा, रजपूत.[१७] मइसा १८, लेखांक १९ (पृ. ३६, १६७२–७३). (स्पष्टीकरण टीप क्र. ३ पण पहा.)

२०. कमळोजी नाईक, सुभेदार. शिचसा १२, लेखांक १२२ (१६६६).

२२. कमळोजी साळुंखे, हजारी. शिभा २२.२ (१६५९).

२३. कलधोंडे. सभासद बखर, पृ. ९९.

२४. कल्याणजी यादव (जाधव). शिभा १७.५६, २३.५५. हा मूळचा आदिलशाही. अफजलखानवधानंतर शिवाजी महाराजांकडे आला.

२५. काताजी इंगळे, अंगक्षक. शिभा २१.७० (१६५९).

२६. कानोजी जाऊजी, बारगीर, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

२७. कान्होजी जेधे. जेधे शकावली (शिचप्र, पृ. १९–२०, १६५९).

२८. कावजी कोंढाळकर, हशमांचा हजारी. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २१, १६५९).

२९. कावजी मल्हार.[१७*] शिचसा ५, लेखांक ७७३ (१६४८–४९).

३०. कावुक. शिभा १३.५७ (१६४८–४९).

३१. काशी राम, हवालदार, परगणा चाकण. मइसा १८, लेखांक १९ (पृ. ३७, १६७२).

३२. काळो विश्वनाथ, हवालदार, तर्फ कऱ्हेपठार, परगणा पुणे. शिचसा २, लेखांक १६५ (१६७७).

३३. कुकाजी बयाजी, हवालदार, तर्फ सातारा. मइसा १५, लेखांक १३४ (१६७४).

३४. कृष्ण ज्योतिषी (पिता महादेव). शिचप्र, पृ. २१९-२१; शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. १८६-८७ (१६७७); करणकौस्तुभ. याचे आडनाव टकले असे असल्याचे मी एका अप्रकाशित व त्रुटित बखरीत वाचले आहे.

३५. कृष्णाजी कान्हो, मजमूदार, कसबे बारामती. शिचसा ७, लेखांक ३२ (१६४३).

३६. कृष्णाजी गायकवाड, अंगरक्षक. शिभा २१.७१ (१६५९). म्हणजेच कृष्णाजी नाईक बंकी. पुद, भाग ३, पृ. १४०. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६). बकी म्हणजेच बंककर. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ९३२-३३ मधील तळटीप १७४ पहा.

३७. कृष्णाजी घाटगे. सभासद बखर, पृ.९८.

३८. कृष्णाजी बाबाजी, सुभेदार, जावळी. शिचसा ४, लेखांक ७१७ (सु. १६५६).

३९. कृष्णाजी भांदडे. सभासद बखर, पृ. ९८.

४०. कृष्णाजी भालेराव, सबनीस, किल्ले xx गड. शिचसा १२, लेखांक १३० (सु. १०६६).

४१. कृष्णाजी भास्कर, सुभेदार, सुभा मावळे.[१८] शिचसा २, लेखांक २२० (१६६८). सुभेदार, सुभा माहालहाय, परगणा वाई – मइसा १५, लेखांक १३४ (१६७४). अफजलखानाच्या वतीने १६५९ मध्ये वाईचा हवालदार असलेला कृष्णाजी भास्कर शिवाजी महाराजांकडे वकील

म्हणून आला होता, तो वेगळा. (स्पष्टीकरण टीप क्र. ४ पण पहा.)

४२. कृष्णाजी सखाजी. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पत्र क्र. ५० (पृ. १८७, १६७७).

४३. कृष्णाजी सूर्यवंशी, सरनौबत, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३३ (१६७७).

४४. केदारजी फिरंगोजी जाधव, हवालदार, इमारत, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३६ (१६७७).

४५. केरोजी, रजपूत. मइसा १८, लेखांक १९ (पृ. ३६, १६७२-७३).

४६. केरोजी पवार. सभासद बखर, पृ. ९८.

४७. केशव शिवप्रभू, हवालदार, कर्यात नाणेघोळ. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. १६५ (१६७६).

४८. केसो आनंदराव, मजमूदार (तर्फ हवेली), परगणा पुणे. मइसा १७, लेखांक १० (१६५७).

४९. केसो नारायण, सबनीस, किल्ले राजगड. मइसा ८, लेखांक ९ (सु. १६६५); जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४, १६७०); पुद ३, पृ. १४१.

५०. कोंडाजी कंक, अंगरक्षक, शिभा २१.७० (१६५९).

५१. कोंडाजी फर्जंद. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २६, १६७३).

५२. कोंडाजी वडखले, हजारी. शिभा २२.२ (१६५९).

५३. कोनेरी (कोन्हेर) रंगनाथ, सुभेदार, सुभा तर्फ कल्याण. शिचसा ४, लेखांक ६८५ (१६७६). सरसुभेदार, प्रांत कऱ्हाड – मइसा २०, लेखांक १७६ (पृ. २४९, १६७९-८०). (स्पष्टीकरण टीप क्र. ४ पण पहा.)

५४. कोन्हेर रुद्र, देशाधिकारी, प्रांत मावळ. मइसा १७, लेखांक १७ (१६७९).

५५. कोयाजी बांदल.[१८*] शिचसा ५, लेखांक ७७४ (१६६३).

५६. खंडोजी आटोळे. सभासद बखर, पृ. ९८.

५७. खंडोजी जगथाप, जुमलेदार. शिचसा १५, लेखांक ११५; मइसा १८,

लेखांक १९ (पृ. ३७, १६७२).

५८. खंडोजी वाघ, जुमलेदार. शिचसा १५, लेखांक ११५; शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

५९. खंडो बायदेव, हवालदार, अथणी. शिचसा २, लेखांक ३६४ (१६७७–७८).

६०. खेमणी (खोमणे?). सभासद बखर, पृ. ९८.

६१. गंगाजी मंगाजी, वाकनीस. सभासद बखर, पृ. ६, ९, ५४.

६२. गंगाजी महादेव, सुभेदार. शिचप्र. पृ. ८५ (१६७८).

६३. गंगाजी (गंगाधर) मुद्गल, हवालदार, परगणा सुपे. शिचसा १५, लेखांक १०५ (१६७५). सरहवालदार – माहालहाय, पुणे – सनदापत्रांतील माहिती, पृ. १३२ (१६७६); शिचसा ५, लेखांक ९७१ (पृ. २५१, १६७६); शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

६४. गंगाधर जनार्दन (हणमंते). सभासद बखर, पृ. ७७, १०६.

६५. गणेश गोजदेव, सुभेदार, सुभा तर्फ कोल. श्री संप्रदायांची कागदपत्रें [खंड १], लेखांक ११ (१६७२). कोळ किंवा कोळे हे गाव सातारा जिल्ह्याच्या कऱ्हाड तालुक्यात आहे.

६६. गणेश चाटी, पोर्तुगिजांकडे वकील. *The Portuguese and the Marathas,* pp. 47-48 (1679).

६७. गणेश तुकदेव. सभासद बखर, पृ. ९८.

६८. गणेश पंडित, सुभेदार, कुडाळ. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ७८ (१६७९); *The Portuguese and the Marathas,* p.2, fn 6 (1679). हा गणेश शंकर अत्रे असेल काय? शिचसा ५, लेखांक ८४१ (पृ. ९२).

६९. गणेश शिवदेव. सभासद बखर, पृ. ९८.

७०. गणोजी गोविंद, हवालदार, किल्ले प्रतापगड. शिचसा ३, लेखांक ६३९ (पृ. २२९, १६५७).

७१. गणोजी दरेकर. सभासद बखर, पृ. ९९.

७२. गणोजी रवळेकर. पर्णाल ३.१९ (१६७३).

७३. गणोजी शिर्के. सभासद बखर, पृ. ९८.

७४. गणो राम, सुभेदार, सुभा परगणे कुडाळ व माहालानिहाय. मइसा २०, लेखांक २८० (२४ मार्च १६८०). देशाधिकारी, तर्फ कुडाळ – शिचसा ४, लेखांक ७३३ (१६७८), ७३५ (१६७९).

७५. गबाजी वैज प्रभू, हवालदार, तर्फ पोन (पवन) मावळ. शिचसा १६, लेखांक ४० (१६७५–७६).

७६. गिरमाजी पंडित, सुभेदार, डिचोली. *The Portuguese and the Marathas,* p.2, fn 6 (1667).

७७. गोंदजी पांढरे. मइसा ८, लेखांक १२ (१६६३).

७८. गोदाजी जगताप. शिभा १३.५१ (१६४८–४९). सभासद बखरीत (पृ. ९८) गोंदजी जगताप.

७९. गोपाल रायाजी, देशाधिकारी, प्रांत जावळी. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड १], लेखांक २० (१६७७).

८०. गोमाजी नाईक पानसंबळ, जामदार. सभासद बखर, पृ. ९; पेद ३१, लेखांक ४१ (१६७९); पुद ३, पृ. १४०.

८१. गोरखोजी दिनकरराव काकडे, सुभेदार, सुभा जावळी. शिचसा ३, लेखांक ६३९ (पृ. २२६, १६५७).

८२. गोविंद रघुनाथ, सुभेदार, सुभा गदग. शिचसा ६, लेखांक ६७ (१६७५).

८३. गोविंद रघुनाथ धडफळे, दफ्तरदार, दिंमत प्रतापराव सरनौबत. शिचसा १५, लेखांक ११५ (पृ. १८१).

८४. गोविंदराव, नामजाद, मौजे उझर्डे. मइसा १५, लेखांक १२९ (१६७१).

८५. गोविंद विठ्ठल प्रभू, मजमूदार, सुभा किल्ले सातारा. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

८६. गोविंद विश्वनाथ प्रभू, नामदार, सुभा किल्ले सातारा. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

८७. गौरोजी गायकवाड, हवालदार, इमारती, किले पुरंदर. मइसा १८, लेखांक ५७ (पृ. ८४, १६७६-७७).

८८. चंदो नारायण. सभासद बखर, पृ. ९९.

८९. चंदो हिरदेव. सभासद बखर, पृ. ९९.

९०. चवडोजी (चौडोजी) बल्लाळ. पुद ३, पृ. १३४, १३५. मइसा २०, लेखांक ४७ (पृ. ७१).

९१. चांगोजी कडू. सभासद बखर, पृ. ९९.

९२. चांदजी जेधे (कान्होजीचा मुलगा). जेधे शकावली (शिचप्र, पृ. २२, १६६३).

९३. चांदजी पाटणकर. RSP, letter No. 105 (1678).

९४. चाहूजी कान्होजी गायकवाड, बारगीर, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

९५. चिमणाजी बापूजी देशपांडे. हा बापूजी मुद्गल याचा मुलगा. सभासद बखर, पृ. ३०-३१ (१६६३).

९६. जगन्नाथपंत. मइसा ८, लेखांक १३.

९७. जगन्नाथ वैजाजी राउतराऊ, हवालदार, तर्फ उंबरज. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

९८. जनार्दन नारायण हणमंते. सभासद बखर, पृ. ७७.

९९. जाधवराव. शिचप्र, पृ. ८४ (लेखांक १, १६६१). हा पुढे मुघलांकडे गेला. पूर्वी शिवाजी महाराजांकडे असलेला व त्यांच्याशी काही नाते असलेला जाधवराव, सिद्दी हिलाल आणि इतर दोघेजण मिळून घोडेस्वारांची [प्रत्येकाकडील एक प्रमाणे] चार पथके नाशिक येथून मुघलांची चाकरी सोडून शिवाजी महाराजांकडे गेली असा उल्लेख १६७२ मधील दोन इंग्रजी पत्रांमध्ये आहे. (*ERS,* Vol. I, Nos. 314, 322). शिवाजी महाराजांचा मामेभाऊ जाधवराव व सिद्दी हिलाल हे दोघे नाशिकहून मुघलांकडून शिवाजी महाराजांकडे गेल्याचा उल्लेख

पर्णालपर्वतग्रहणाख्यानम्‌मध्येही (२.४२-४४) आहे. ते दोघेही उमराणीच्या लढाईत प्रतापरावाच्या नेतृत्वाखाली लढले. (पर्णाल, ५.५६, ७७, ८१). या जाधवरावाचे नाव कुठे नमूद नाही.

१००. जानराव वाघमारे. सभासद बखर, पृ. ९९.

१०१. जानोजी जगथाप, सरनौबत, किल्ले पुरंदर. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

१०२. जावजी कृष्ण प्रभू, हवालदार, पेठ पारगाव. मइसा २०, लेखांक २८० (२४ मार्च, १६८०).

१०३. जावजी पाये. सभासद बखर, पृ. ९९.

१०४. जावजी महानलाग. सभासद बखर, पृ. ९९.

१०५. जिजोजी काटकर, हवालदार किल्ले सज्जनगड. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड १], लेखांक १६ (१६७६).

१०६. जिवाजी विनायक, सुभेदार, सुभे मामले प्रभावळी. मइसा ८, लेखांक ३१ (१६७५).

१०७. जिवाजी शेणवी (पितांबरचा भाऊ), पोर्तुगिजांकडे वकील. *The Portuguese and the Marathas,* p.47 and fn 109 (1678).

१०८. जिवा महाले, अंगरक्षक. शिभा २१.७१ (१६५९).

१०९. जैतजी काटकर. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६). सभासद बखरीत (पृ. ९८) जैतोजी काटकर.

११०. जोतिराव. सभासद बखर, पृ. १०७.

१११. ढवळेकर. सभासद बखर, पृ. ९९.

११२. तान सावंत भोसले. सभासद बखर, पृ. ९९.

११३. तान सावंत मावळे. सभासद बखर, पृ. ९९.

११४. तानाजी तुंदुसकर. सभासद बखर, पृ. ९९.

११५. तानाजी मालुसरे, हजारी. शिभा २२.२ (१६५९). हशमांचा सुभेदार – जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४, १६७०).

११६. तानाजी राम, हवालदार, वेंगुर्ले. शिवशाही पोर्तुकीत कागदपत्रे, पत्र क्र.

४४ (१६७८). *The Portuguese and the Marathas,* p.2, fn 6 (1678).

११७. तान्हाजी जनार्दन, हवालदार, कर्यात (सास)वड, परगणा पुणे. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

११८. तिमाजी कोन्हेर, हवालदार, कर्यात सासवड. शिचसा ७, लेखांक ४३ (१६५७).

११९. तिमाजी नारायण, लिहिणार (लेखनिक). कोट वालगुंडानूर. मइसा ८, लेखांक ३४ (१६७७).

१२०. तिमाजी वेंकटेश, सुभेदार, चौल. शिचसा १०, लेखांक १३ (१६७९–८०).

१२१. तुक प्रभू, मुजुमदार, तर्फ आजगाऊ, परगणा कुडाळ. शिचसा १४, लेखांक ३८ (१६७९).

१२२. तुकाजी पवार, बारगीर, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

१२३. तुकाजी प्रभू, हवालदार, तर्फ सातारा. मइसा १५, लेखांक १४१ (१६७६).

१२४.तुकाजी संताजी सोमवंशी, बारगीर, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

१२५. तुका पंडित, सुभेदार, राजापूर *ERS,* Vol. II, No. 113 (1675).

१२६. तुकोजी कडू. सभासद बखर, पृ. ९९.

१२७. तुकोजी चोर, सरनौबत. सभासद बखर, पृ. ४ (१६४२). चोर हे आडनाव आहे.

१२८. तुकोजी निंबाळकर. सभासद बखर, पृ. ९८.

१२९. तुको राम, सुभेदार, मामले प्रभावळी. मइसा ८, लेखांक २४ (१६७५).

१३०. तेलंगराव. पर्णाल ५.७९. ऐसंसा ६, लेखांक ९६.

१३१. त्रिंबक (त्र्यंबक) गोपाळ, सुभेदार, पुणे. शिचसा २, लेखांक १२४ (१६७८); शिचसा ५, लेखांक ९७१ (पृ. २५१).

१३२. त्रिंबक गोविंद, हवालदार, तर्फ हवेली, परगणा पुणे. श्री राजा

शिवछत्रपती, भाग २, पृ. ४९२ (१६७१).

१३३. त्रिंबकजी प्रभू. सभासद बखर, पृ. ९९.

१३४. त्रिंबक दादो, हवालदार, तपे तारळे. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५९ (१६७६).

१३५. त्रिंबक पंडित, सुभेदार, फोंडा. पोर्तुगेज – मराठे संबंध, पृ. ७९ (धर्माजी नागनाथ याच्या पूर्वी); शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ६४ (१६७८).

१३६. त्रिंबक बापूजी, मजमूदार, तर्फ कऱ्हेपठार, परगणा पुणे. शिचसा ७, लेखांक ५८ (१६७७).

१३७. त्रिंबक लुने (?), परसोजी महाडिकाचा मुजुमदार. पुद, भाग ३, पृ. १३८.

१३८. त्रिंबक वासुदेव, हवालदार, तर्फ कऱ्हेपठार (परगणा पुणे). शिचसा २, लेखांक १३५ (१६७५).

१३९. त्रिंबक विठ्ठल, सभासद बखर, पृ. ९९.

१४०. त्रिंबक वेंक (टेश), मजमूदार, सुभे मजकूर (पुणे). शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६); मइसा ८, लेखांक १३.

१४१. त्रिंबक सोनदेव, डबीर, सोनोपंताचा मुलगा. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४, १६६६–६७; शिचसा १५, लेखांक १०० (१६६९–७०).

१४२. त्र्यंबक भास्कर (अत्रे). किल्लेदार, पन्हाळा – शिभा २६.५४–५५; प्रभावळीचा अधिकारी – शिभा ३२.२ (१६६०); शिचसा ५, लेखांक ८४१ (पृ. ९४).

१४३. दत्ताजी इडिलकर (इंदुलकर). सभासद बखर, पृ. ९९.

१४४. दत्ताजी त्रिमल, वाकेनिवीस. शिचसा २, लेखांक ३६२; शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५७ (१६७६).

१४५.दसमाजी नरसाळे, हवालदार, महाल इमारती, किल्ले महिपतगड. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड १], लेखांक १५ (१६७६).

१४६.दादजी काकडे. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६). सभासद बखरीत (पृ. ९८) रामजी काकडे असे एक नाव आहे आणि त्यातील रामजीच्या जागी बाबाजी किंवा दादाजी असा पाठभेदही आहे. त्यांतील दादाजी (किंवा दादजी) ग्राह्य आहे.

१४७. दादाजी कृष्ण लोहकरे, नामजाद हवालदार, कल्याण. जेधे शकावली (शिचप्र, पृ. १८, १६५७).

१४८. दादाजी कोंडदेव, मजमूदार, सुभा सा जुन्नर. मइसा १८, लेखांक १९ (पृ. ३७, १६७२). हा शाहजी महाजरांच्या नोकरीतील दादाजी कोंडदेव (सुभेदार) नव्हे.

१४९. दादाजी नारायण, हवालदार, संमत हवेली (परगणा वाई). शिचसा ७, लेखांक ५९.

१५०.दादाजी पंडित, सुभेदार, कल्याण. *ERS*, Vol. II, No. 462 (p. 341, 1674).

१५१. दादाजी बापूजी, सुभेदार, कल्याण. जेधे शकावली (शिचप्र, पृ. १८, १६५७).

१५२. दादाजी बायाजी प्रभू, हवालदार, तर्फ खडकवासले व तर्फ माण (कर्यात मावळ). शिचसा २, लेखांक १११.

१५३. दावलजी गाडगे, सभासद बखर, पृ. ४३ (१६६६).

१५४. दिबाजी (किंवा बिंबाजी) भांडवलदार (भांउवलकर), हवालदार, पागा. शिचसा १५, लेखांक ११५ (पृ. १७७, सु. १६६८).

१५५. दीपाजी राऊतराव. पर्णाल ५.९५ (१६७३).

१५६. देवाजी उघडे. सभासद बखर, पृ. ९९.

१५७. दोरोजी. *ERS*, Vol. I, letter Nos. 4, 7 (1660).

१५८. धनाजी जाधव. सभासद बखर, पृ. १०९.

१५९. धर्माजी नागनाथ, सुभेदार, फोंडा. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ५४ (१६७८). *The Portuguese and the Marathas,* p. 2, fn 6 (1678-79).

१६०. धारराव निंबाळकर, सुभेदार. मइसा ८, लेखांक २५ (१६७१).

१६१. नरसा जनार्दन, हवालदार, तर्फ वेळवंड खोरे. शिचसा १५, लेखांक १०० (१६६९–७०).

१६२. नरसाजी हणमंतराव महारावर (?) बारगीर, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

१६३. नरसो काळो, हवालदार xx. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, लेखांक ४६ व ४९ (१६७८).

१६४. नरसो गिरमाजी, मुजुमदार, कर्यात सासवड. शिचसा ७, लेखांक ४३ (१६५७).

१६५. नरसोजी शितोळे. सभासद बखर, पृ. ९९.

१६६. नरसो दत्ताजी, मजमूदार, तर्फ उंबरज. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

१६७. नरहरी आनंदराव, सरसुभेदार, कुडाळ. मइसा ८, लेखांक २७ (१६७९).

१६८. नरहरी बाबाजी, तर्फदार, तर्फ जाळगाऊ. मइसा ८, लेखांक ३२ (१६७५).

१६९. नरहरी शिवदेव, मजमूदार, परगणा सुपे. मइसा २०, लेखांक ५४ (पृ. ८९, १६७२).

१७०. नाईकजी खराडे. शिभा १७.५६, २३.५५ (१६५९). पर्णाल ५.८३ (१६७३). याचा मुलगा हणमंत पुढे आदिलशाहीत गेला. पहा – शिचसा २, लेखांक ३९५ (१६७७); शिचसा ५, लेखांक ७८२ (१६७७); शिचसा ६, लेखांक ६९ (१६७८).

१७१. नाईकजी पांढरे. शिभा १७.५९, २३.५५ (१६५९). अफजलवधानंतर आदिलशाहीकडून शिवाजी महाराजांकडे आला. १६६५ पूर्वी परत आदिलशाहीत गेला. (श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ९५० मधील तळटीप २३४.) पण त्यानंतर पुन्हा शिवाजी महाराजांकडे आला.

(पर्णाल ५.८३, १६७३).

१७२. नागोजी गुजर (प्रतापरावाचा मुलगा). शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

१७३. नागोजी गोपजी थोरात, जमातीदार. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

१७४. नागोजी गोविंद, खजिना. मइसा ८, लेखांक २१ (१६७१-७२).

१७५. नागोजी प्रल्हाद. सभासद बखर, पृ. ९९.

१७६. नागोजी बल्लाळ. सभासद बखर, पृ. ९९.

१७७. नागोजी जेधे (बाजी सर्जेरावाचा मुलगा). जेधे शकावली (शिचप्र, पृ. २८, १६७६).

१७८. नागोजी भोसले, मुद्राधारी, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक २२ (१६७७).

१७९. नामाजी नाईक, पाचा लोकांचा नाईक, किल्ले मनोहरगड. शिचसा १२, लेखांक १२४ (१६६६-६७).

१८०. नारायण ब्राह्मण, पंचहजारी. शिभा २२.४ (१६५९).

१८१. नारो केशव, दफ्तरदार, किलेहाये. मइसा १८, लेखांक ५७ (पृ. ८२, १६७५-७६).

१८२. नारोजी पवार, बारगीर. शिचसा १५, लेखांक ११५ (सु. १६६८).

१८३. नारो त्रिमल, हुद्देदार, मौजे किवाड, तर्फ खेडेबारे. मइसा ८, लेखांक २० (१६७०-७१).

१८४. नारो नरसिंह, हवालदार, कर्यात सासवड. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

१८५. नारो नीलकंठ, मजमूदार. मइसा १८, लेखांक ५७ (पृ. ८०, १६७४-७४); शिचसा १, लेखांक ६३ (१६७७); शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५७ (१६७६).

१८६. नारो बापूजी (बापूजी मुद्गलाचा मुलगा), जुमलेदार. पुद ३, पृ. १३३, १३८ (१६६४).

१८७. नारो भिकाजी, सुभेदार, सरदेशमुखी सरकार महालहाय, तलकोकण.[१९] मइसा २०, लेखांक १९९ (पृ.३०२, १६६९). (स्पष्टीकरण टीप क्र. ५ पण पहा.)

१८८. नारो भिकाजी, पाव लोकांची फडणिशी. पुद ३, पृ. १३३ (१६५२).

१८९. निंबाजी पाटोळे. सुभासद बखर, पृ. ९८.

१९०. निंबाजी बागूल, हवालदार, xx गड. शिचसा १२, लेखांक १३० (सु. १६६६).

१९१. निराजी राहूजी (राऊजी, रावजी), न्यायाधीश. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४); सभासद बखर, पृ. ४३, ५४, ८२, ८३.

१९२. निलोजी हैबतराऊ, सुभा किल्ले सातारा. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

१९३. निळोजी काटे. सभासद बखर, पृ. ९८.

१९४. निळो मोरेश्वर, मोरो त्रिमल पेशवे याचा मुलगा. सभासद बखर, पृ. १०७; जेधे शकावली (शिचप्र, पृ. ३०-३१).

१९५. निळो सोनदेव, मजमूदार. मइसा ८, लेखांक १२ (१६६३), लेखांक १० (१६६०).

१९६. नील प्रभू, पारसनीस. सभासद बखर, पृ. ८२; दुर्ज उल-गवाहिर *(Tarabai Papers : A Collection of Persian Letters,* Persian text in photo no.7 on p.2; English translation on p.vii).

१९७. नेतोजी पालकर, सरनौबत. सभासद बखर, पृ. ६

१९८. नेमाजी शिंदे. सभासद बखर, पृ. ९९.

१९९. पदो (किंवा यादो) नारायण, सभासद, नामजाद, किल्ले कोंढाणा. शिचसा २, लेखांक ९८; शिचसा ३, लेखांक ६४० (१६५८).

२००. पंताजी गोपीनाथ. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २०, १६५९).

२०१. परमानंद. शिभा १.१-४१, *Shivaji's visti to Aurangzib at Agra,* Rajasthani letters no. 28, 32, 33, 43.

२०२.परसोजी नामाजी सितोळे, जमातीदार. शिचसा ७, लेखांक ५७ (पृ. ९४, १६७६).

२०३. परसोजी भोसले. सभासद बखर, पृ. ९८.

२०४. परसोजी महाडिक, सुभेदार नामजाद, महालानिहाय, किल्ले सातारे. मइसा १५, लेखांक ११२ (१६६५); शिभा २४.३८; पुद ३, पृ. १३८ (१६६४).

२०५.पितांबर शेणवी, पोर्तुगिजांकडे वकील. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ४२ (१६७८); *The Portuguese and the Marathas,* p. 44 (1678).

२०६. पिलाजी गोळे, सभासद बखर, पृ. ९९.

२०७. पिलाजी नारायण अत्रे, हवालदार तर्फ नीरथडी, परगणा पुणे. शिचसा १५, लेखांक १३ (१६७५); शिचसा ५, लेखांक ८४१ (पृ. ९२–९३).

२०८. पिलाजी नीलकंठराव. सुभेदार, नामजाद, माहालानिहाय, मामले प्रभावळी. शिभा ३०.४१ (१६६०); मइसा १५, लेखांक २–३ (१६६१).

२०९. पिलाजी भोसले, हवालदार, मोहनगड. भाइसंमंचे त्रैमासिक, वर्ष ७, अंक १–४ (एकत्र), पृ. ४३–४४ (१६५८).

२१०. पिलाजी सणस. सभासद बखर, पृ. ९९.

२११. पोसजी तुकाजी जाधव, बारगीर, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

२१२. प्रतापजी, मुंबईकर इंग्रजांकडे वकील. *ERS,* Vol. II, Letter No. 340.

२१३. प्रतापराव गुजर, सरनौबत. नाव – कडतोजी. सभासद बखर, पृ. ५४, ५७, ८३; शिचसा ११, लेखांक ४४ (१६७२); शिचसा १५, लेखांक ११५ (पृ. १७८, १८१).

२१४. प्रल्हाद निराजी (निराजी रावजीचा मुलगा). *ERS,* Vol. I, No. 451 (p.327); Vol. II, No. 81 (pp. 45-46); सभासद बखर, पृ. ५४,

५७, ८३.

२१५. बकाजी नावडकर, बारगीर. शिचसा ११, लेखांक ४४ (१६७२).

२१६. बकाजी फर्जंद. शिचसा २, लेखांक २७८ (१६७५).

२१७. बजाजी नागनाथ, हवालदार, तर्फ हवेली, परगणा पुणे. शिचसा २, लेखांक १३१ (१६७८).

२१८. बयाजी गडदरे. सभासद बखर, पृ. ९९.

२१९. बहिरजी घोरपडे. सभासद बखर, पृ. ९९, १०९.

२२०. बहिरजी जाधव (हेरखाते). सभासद बखर, पृ. २३, ६०.

२२१. बहिरजी वडगरे. सभासद बखर, पृ. ९९.

२२२. बहिरजी (किंवा बहिरोजी) वाघ (किंवा वाघोजी) प्रभू, हवालदार तर्फ रोहिडखोरे. शिचसा १५, लेखांक ६ (१६६९).

२२३. बहिराजी बाबाजी प्रभू, हवालदार, तर्फ मुठे खोरे. भाइसंमं, वार्षिक इतिवृत्त, शक १८३५, पृ. ४१-४१ (लेखांक २, १६७८).

२२४. बहिरो त्रिमल, देशाधिकारी, पटण चेऊल. शिचसा ९, लेखांक ५४ (१६७६), ५६ (१६७७). सरसुभेदार, चौल – शिचसा १०, लेखांक १३ (१६७९-८०); *ERS,* Vol. II, No. 140 (Bair [o]pant, 1678).

२२५. बहिरो शिवदेव, सुभेदार माहालानिहाय. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड १], लेखांक २३ (१६७७); शिचसा २, लेखांक २५३ (१६७१-७२).

२२६. बळवंतराव देवकांते. सभासद बखर, पृ. ९९.

२२७. बागाजी प्रतापराव, जमातीदार. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

२२८. बाजी कदम. सभासद बखर, पृ. १०७.

२२९. बाजी घोलप, हवालदार, मनोहरगड. शिचसा १२, लेखांक १२३-२५ (१६६६). हवालदार, किल्ले पुरंदर – मइसा १८, लेखांक ५७ (पृ. ८४, १६७४-७४); शिचसा ७, लेखांक ५७ (पृ. ९६-९७, १६७६).

२३०. बाजी पासलकर.[१९*] शिचसा ५, लेखांक ७७३ (१६४८-४९).

२३१. बाजी प्रभू. भाइसंमंचे त्रैमासिक, वर्ष ७, अंक १-४ (एकत्र), पृ. ४३-

४४ (१६५८); जेधे शकावली (शिचप्र, पृ. २१, १६६०).

२३२. बाजी बांदल. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १०, पृ. ६–७ (१६५०–५१).

२३३. बाजी सर्जाराव जेधे, कान्होजीचा मुलगा. मइसा १५, लेखांक २७५ (१६६२), ३३९ (१६६२).

२३४. बापूजी दामोदर, मुजुमदार, पेठ शिवापूर. पुद ३, पृ. १३०.

२३५. बापूजी हैबतराव सिलिंबकर. मइसा १७, लेखांक ९ (१६५०–५१).

२३६. बाबाजी कृष्ण, सुभेदार, डिचोली. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ५१ (१६७८); *The Portuguese and the Marathas,* p. 2, fn 6 (1678).

२३७. बाबाजी घाटगे. सभासद बखर, पृ. १०७.

२३८. बाबाजी जुंझारराव मरळ. शिचसा ४, लेखांक ७५४ (१६५०).

२३९. बाबाजी ढमढेरे. सभासद बखर, पृ. ८५, १०६.

२४०. बाबाजी नाईक पुंडे, वकील. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २६, १६७२).

२४१. बाबाजी बापूजी, बापूजी मुद्गलाचा मुलगा. सभासद बखर, पृ. ३० (१६६३).

२४२. बाबाजी विठ्ठल, सुभेदार, तर्फ मलकापूर. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड १], लेखांक २९ (१६७९).

२४३. बाबाजी शिवदेव, देशाधिकारी, प्रांत बंकापूर. शिचसा ६, लेखांक ७२ (१६७९).

२४४. बावाजी जनार्दन. पुद ३, पृ. १३४.

२४५. बाळकृष्णपंत (हणमंते). सभासद बखर, पृ. ३, ७७.

२४६. बाळ प्रभू (ऊर्फ बाळाजी आवजी), चिटणीस. सभासद बखर, पृ. ६०, ८२, १०७; शिवापूर शकावली (शिचप्र, पृ. ५२).

२४७. बाळंभट. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. १८६–८७ (१६७७).

२४८. बाळाजी नाईक सिलिंबकर. मइसा १७, लेखांक ९ (१६५०–५१).

२४९. बाळाजी निळकंठ. सभासद बखर, पृ. ९९.

२५०. बाळाजी बहिरव. सभासद बखर, पृ. ९९.

२५१. बाळाजीराव दरेकर. सभासद बखर, पृ. १००.

२५२. बाळाजीराव पाटणकर. *RSP*, No.105 (1678).

२५३. बाळाजी हरी मजालसी. मइसा १७, लेखांक १० (१६५७).

२५४. बाळोजी काटकर. सभासद बखर, पृ. ९८.

२५५. बाळोजी शिवतरे. सभासद बखर, पृ. ९९.

२५६. बोमाजी कालूजी, सरनौबत, किल्ले मनोहरगड. शिचसा १२, लेखांक १३० (सु. १६६६).

२५७. भवानराव सरदार. सभासद बखर, पृ. ९८.

२५८. भानजी गोपाळ, देशाधिकारी, प्रांत कऱ्हाड. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड १], लेखांक ३०-३१ (१६७९).

२५९. भानजी बल्लाळ. पुदे ३, पृ. १३०.

२६०. भिकजी दळवी. सभासद बखर, पृ. १००.

२६१. भिकाजी चोर. शिभा १३.५४ (१६४८-४९).

२६२. भिवजी मल्हार, हवालदार, परगणा सुपे. मइसा २०, लेखांक ५४ (पृ. ८९, १६७२).

२६३. भीमाजी पंडित, मुंबईकर इंग्रजांकडे वकील. *ERS*, Vol. I, No. 358 (p. 255), 370 (p.270, 1673), 390 (p.290)

२६४. भीमाजी मल्हारी, हवालदार, संमत कोरेगाव, परगणा वाई. मइसा २०, लेखांक १५६ (१६७६).

२६५. भीमाजी वाघ. शिभा ३.५२ (१६४८-४९).

२६६. भैरव चोर. शिभा १३.५४-५५ (१६४८-४९).

२६७. मताजी जुंझारराव घाटगे. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २६० (१६७७). पूर्वी, १६४८-४९ मध्ये, बहुधा आदिलशाहीत होता; नंतर ''शिवचरणी तत्पर'' झाला. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. १०१६, पुरवणी टीप ८९ पहा.

२६८. मंबाजी नाईक, दिंमत श्री तुळजाभवानी, मुक्काम किल्ले प्रतापगड.

पोतदार सन्मान ग्रंथ, मराठी विभाग, पृ. ३२-३३ (१६७७).

२६९. महादजी नाईक पानसंबळ. सभासद बखर, पृ. १०७.

२७०. महादजी नारायण. सभासद बखर, पृ. ९९.

२७१. महादजी फर्जंद. सभासद बखर, पृ. १००.

२७२. महादाजी अनंत, सरसुभेदार, कोकण. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ६९ (१६७९); *The Portuguese and the Marathas,* p.2, fn 6 (1679); पोर्तुगेज – मराठे संबंध, पृ. ८४ (फोंडे, १६८०).

२७३. महादजी गोविंद, सुभेदार, पुणे. शिचसा १, लेखांक ५३ (१६७०); श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. ४९२ (१६७१).

२७४. महादाजीपंत, फोर्ट सेंट जॉर्ज (मद्रास) येथे वकील. *ERS,* Vol. II, No. 224 (1677).

२७५. महादाजी मदने, जमातीदार. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

२७६. माणकोजी दहातोंडे, सरनौबत. मइसा १७, लेखांक १० (१६५७).

२७७. माणकोजी पवार, तटसरनौबत, कोट उटतूर, मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

२७८. माणको राम, ठाणेदार, वाई. शिचसा ६, पृ. ६७ (१६५९).

२७९. माणको हरी, सबनीस. सभासद बखर, पृ. ४३ (१६६६).

२८०. मानाजी मोरे. सभासद बखर, पृ. ७१, ९०, ९८.

२८१. मायनाक भंडारी. सभासद बखर, पृ. ६५; *ERS,* Vol. II, No. 369 (p.202, 1679). त्याच्याबरोबर त्याचा मुलगा होता. Ibid., No. 446 (1679).

२८२. माल सावंत. सभासद बखर, पृ. १००.

२८३. मालोजी थोरात. सभासद बखर, पृ. ९९.

२८४. माहादाजी अनंत, सरसुभेदार, माहालानिहाय, पुणे. शिचसा २, लेखांक १२४ (१६७८). सुभेदार, मामले दाभोळ – पेद ३१, लेखांक ३२ (१६७७).

२८५. माहादाजी नरस (किंवा नरसिंह) प्रभू, हवालदार, तर्फ कर्यात मावळ.

शिचसा २, लेखांक १०९ (१६७४).

२८६. माहादाजी यमाजी, हजारी सुभ्याचा मुजुमदार. मइसा ८, लेखांक २५ (१६७१).

२८७. माहादाजी राम, हवालदार, तर्फ पाटस, परगणा पुणे. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

२८८. माहादाजी सामराज, सुभा मावळे. शिचसा २, लेखांक २७५ (१६७५). सुभेदार माहानिहाय तर्फ सातारा (किंवा सुभा सातारा) – श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड १], लेखांक १७, २१ (१६७७).

२८९. मुकुंद धोंडदेव अत्रे, हवालदार, तर्फ खेडेबारे. शिचसा ७, पृ. ९२ (१६७१); शिचसा ५, लेखांक ८४१ (पृ. ९४), पुद ३, पृ. १३४.

२९०. मुकुंद बल्लाळ. सभासद, पृ. ७१.

२९१. मुधोजी थोरात. सभासद बखर, पृ. ९९.

२९२. मुधोजी सरखवास. सभासद बखर, पृ. १०७.

२९३. मुधोजी सोनदेव. सभासद बखर, पृ. १००.

२९४. मुधो राम, मुजुमदार, सुभा माहालानिहाये (तर्फ मावळे). शिचसा १५, लेखांक १०० (१६६९–७०).

२९५. मुबाजी बेनमणा. सभासद बखर, पृ. १००.

२९६. मुरार बाजी प्रभू (नाडकर). सभासद बखर, पृ. ३७–३८ (१६६५); ऐतिहासिक साधने, पृ. ९८–९९.

२९७. मोत्याजी रवळेकर. पर्णाल ३.१९ (१६७३).

२९८. मोरेश्वर त्र्यंबक (मोरो त्रिमल, मोरोपंत पिंगळे), पेशवे, मुख्य प्रधान. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५७ (१६७६); सभासद बखर, पृ. ६.

२९९. मोरेश्वर, पंडितराय. मइसा २०, लेखांक १५८ (१६७९); शिचसा ९, लेखांक ५४ (१६७६), ५६ (१६७७).

३००. मोरो दादाजी, सुभेदार, डिचोली. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ७६ (१६७९); *The Portuguese and the Marathas,* p. 2, fn 6

(1679).

३०१. मोरो नागनाथ. सभासद बखर, पृ. ७१.

३०२. मोरो निंबाजी, मजमुदार, परगणा पुणे. शिचसा ३, लेखांक ४०२ (१६७५) ;शिचसा १२, लेखांक ५७ (१६७५) ; शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

३०३. यशवंतराव पाटणकर. *RSP,* letter No. 105 (1678) म्हणजेच शिवछत्रपतींची पत्रे, खंड २, पत्र क्र. ३४.

३०४. यशवंतराव बयाजी, हवालदार, तर्फ पाली. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

३०५. यशवंतराव वाबिले, जमातीदार. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

३०६. यशवंतराव शाहाजी कदम, नामजाद, कोट वालगुंडानूर. मइसा ८, लेखांक ३४ (१६७७).

३०७. यादव दत्तो, सुभेदार नामजाद, किलेहाय.[२०] शिचसा १२, लेखांक १२४ (१६६६).

३०८. यादो सिद्धनाथ, हवालदार, सुपे. मइसा २०, लेखांक ४७ (पृ. ७०–७१).

३०९. येसजी दरेकर. सभासद बखर, पृ. १००.

३१०. येसाजी कंक, अंगरक्षक – शिभा २१.७० ; हजारी – शिभा. २२–२. सरनौबत – जेधे शकावली (शिचप्र, पृ. २८, १६७७).

३११. येसाजी काटकर. सभासद, पृ.९८.

३१२. येसाजी गणेश अत्रे, सरहवालदार, परगणा पुणे. शिचसा ४, लेखांक ६८६ (१६७३, हवालदार, परगणा पुणे) ; शिचसा ५, लेखांक ८४१ (पृ. ९२) ; शिचसा १५, लेखांक १०२ (१६७२).

३१३. येसाजी गोविंद, सुभेदार, परगणा कुडाळ व माहालानिहाय. शिचसा. १२, लेखांक १२२ (१६६६).

३१४. येसाजी जाधव, हवालदार, पायदळ. शिचसा १५, लेखांक ११५ (सु. १६६८).

३१५. येसाजी मल्हार, सुभेदार, वाई. मइसा २०, लेखांक १५२ (१६७६).

३१६. रखमाजी बिन जनाजी नाईक, जासूद. शिचसा १२, लेखांक १२६ (१६६७).

३१७. रखमाजी शिवदेव. मइसा ८, लेखांक ९.

३१८. रघुनाथ, पंडितराव. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ५, पृ. ३ (पत्र क्र. ३, १६७२).

३१९. रघुनाथ नारायण हणमंत. मजमू दिली – जेधे शकावली (शिचप्र, पृ. २९, १६७७). शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५७ (१६७६). राजव्यवहारकोश (शिचप्र, पृ. १४२–४३, श्लोक ६८–७३).

३२०. रघुनाथपंत कोरडे. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४, १६६६–६७).

३२१. रघुनाथ बल्लाळ, सरसबनिवीस. मइसा १७, लेखांक १० (१६५७); सभासद बखर, पृ. १०.

३२२. रंगो नारायण. सभासद बखर, पृ ९०.

३२३. राघोजी मित्रा मराठा. सभासद बखर, पृ. ४३, ४९, ५१, ५४.

३२४. राघो पंडित, हवालदार, मामले चौल. शिचसा ५, लेखांक ९७५ (१६६३).

३२५. राघो बल्लाळ अत्रे, सुभेदार, संमत जुन्नर व माहलहाय. शिचसा ४, लेखांक ६८४ (पृ. १५, १६७६), शिचसा ५, लेखांक ८४१ (पृ. ९२).

३२६. राघो भास्कर, सरहवालदार, परगणा पुणे. शिचसा ३, लेखांक ४०० (१६७५).

३२७. राघो मुद्गल, मुजुमदार, तर्फ वेळवंडखोरे. शिचसा १५, लेखांक १०० (१६६९–७०).

३२८. राघो मुद्गल, मजमूदार, कर्यात नाणेघोल. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २६५ (१६७९).

३२९. रामचंद्र त्रिंबक, सुमंत. सभासद बखर, पृ. ८२.

३३०. रामचंद्र नीलकंठ, सबनीस, जंजिरे सिंधुदुर्ग. शिचसा ३, लेखांक ४२६

(१६६८).

३३१. रामजी काकडे. सभासद बखर, पृ. ९८.

३३२. राम दळवी. सभासद बखर, पृ. १००.

३३३. रामाजी अनंत, सुभेदार, मामले प्रभावळी. शिचसा ९, लेखांक ५५ (१६७६).

३३४. रामाजी जनार्दन. सभासद बखर, पृ. ९९.

३३५. रामाजी पांगेरा, हशमांचा हजारी. शिभा २२.३ (१६५९); सभासद बखर, पृ. ७०.

३३६. रामाजी बल्लाळ, हवालदार, तर्फ कऱ्हेपठार. शिचसा २, लेखांक ९८; शिचसा ३, लेखांक ६४० (१६५८).

३३७. रामाजी बांदे, हरकारा. मइसा ८, लेखांक २७ (१६७१).

३३८. रामाजी भास्कर. सभासद बखर, पृ. ९९.

३३९. रामाजी महाद प्रभू, हवालदार, मामले चेऊल. शिचसा १०, लेखांक ११ (१६७३).

३४०. रामाजी मोरे. सभासद बखर, पृ. १००.

३४१. रामाजी वासुदेव, मजमूदार, तर्फ पाली. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

३४२. रामाजी विश्वनाथ, सबनीस, किल्ले मनोहरगड. शिचसा १२, लेखांक १२९-३० (सु. १६६६).

३४३. रामोजी सूर्यवंशी, सरनौबत, xx गड. शिचसा १२, लेखांक १३० (सु. १६६६).

३४४. रायाजी गंगादास, माहालानिहाय, भीमगड. *The Portuguese and the Marathas,* p. 2, fn 6 (1668), p.26 (1668).

३४५. रायाजी बजाजी जाधव, बारगीर. कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

३४६. रायाजी भोसले, हवालदार, जंजिरे सिंधुदुर्ग. शिचसा ३, लेखांक ४२६ (१६६८).

३४७. रायाजी, रजपूत. शिचसा १२, लेखांक १३० (सु. १६६६).

३४८. रावजी (किंवा राहूजी) सोमनाथ (पतकी), सुभेदार/सरसुभेदार, कुडाळ. *The Portuguese and the Marathas,* p. 9, fn 2 (1663); डाग रजिस्टर (शिवकालीन – पत्र – सार – संग्रह १, लेखांक १००२, १६६४); पुद ३, पृ. १३८.

३४९. रुद्राजी तुकदेव, सरनौबत, किल्ले मनोहरगड. शिचसा १२, लेखांक १३० (सु. १६६६).

३५०. रूपाजी भोसले. पर्णाल ५.७८ (१६७३).

३५१. रुमाजी अहिरा. मइसा ८, लेखांक १२ (१६६३).

३५२. लक्ष्माजी मादरस, मजमूदार, इमारत, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३६ (१६७७).

३५३. वाघोजी तुपे, हशमांचा हजारी. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २१, १६५९).

३५४. वाघोजी शिर्के. सभासद बखर, पृ. ९८.

३५५. वासुदेव बाळकृष्ण, मजमूदार. मइसा १७, लेखांक १० (१६५७).

३५६. विठोजी जाधव, हवालदार, किल्ले रांगणा. शिचसा १२, लेखांक १२३ (१६६६).

३५७. विठोजी लाड. सभासद बखर, पृ. १००.

३५८. विठोजी शिंदे. पर्णाल ५.५७ (१६७३); जेधे शकावली (शिचप्र, पृ. २६, १६७३).

३५९. विठ्ठल दत्तो, सुभेदार, सुभा जावळी. मइसा १५, लेखांक १३२ (१६७२); शिचसा १०, लेखांक ५५ (१६६७–६८); मइसा ८, लेखांक १८ (१६७०).

३६०. विठ्ठल नरहरी, मजमूदार, तपे तारळे. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

३६१. विठ्ठलपंत, पोर्तुगिजांकडे वकील. पोर्तुगेज-मराठे संबंध, पृ. ४७–४८

(१६७०).

३६२. विठ्ठल पिलदेव (किंवा पिलाजी) अत्रे, सुभेदार, मावळे. शिचसा ३, लेखांक ४४१ (१६७२); शिचसा ५, लेखांक ८४१ (पृ. ९३); पर्णाल ५.५७ (१६७३).

३६३. विठ्ठल भिकाजी, सबनीस, दिंमत हशम, किलेहाये. शिचसा १२, लेखांक १३१ (सु. १६६६–६७).

३६४. विठ्ठल सोमनाथ, हवालदार, परगणा इंदापूर. शिचसा ३, लेखांक ५५४ (१६७१).

३६५. विसाजी कोंडदेव, सुभेदार कारवार. *ERS,* Vol. II, No. 273 (Vissages Comdue, 1678); 296 (Vissagee Cumbdu).

३६६. विसाजी गंगाधर, हवालदार, परगणा सुपे. शिचसा २, लेखांक १६४ (१६७७); शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६, हवालदार, तर्फ नीरथडी, परगणा पुणे).

३६७. विसाजी नागनाथ, नामजाद सुभेदार, जावळी. शिचसा ३, लेखांक ६३९ (पृ. २२६, १६५७).

३६८. विसाजी बल्लाळ, सुभेदार, महाल सरदेशमुखी सरकार, महाल तर्फ पुणे. शिचसा ८, लेखांक ५७ (१६६८); पुद ३, लेखांक १५४; पर्णाल ५.५८ (१६७३).

३६९. विसाजी मुरुंबक, अंगरक्षक. शिभा २१.७१ (१६५९).

३७०. विसाजी विठ्ठल, हवालदार, पेठ कसबे पाटगाव. शिचसा १२, लेखांक १२८ (१६६६–६७).

३७१. वीरो पंडित, सुभेदार, पेडणे. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. २९ (१६६८); *The Portuguese and the Marathas,* p. 2, fn 6 (1668).

३७२. वीरो राम, सुभेदार जावळी. मइसा १५, लेखांक १११ (१६६५). मजमूदार, जावळी – शिचसा ४, लेखांक ७१७ (सु. १६५६).

३७३. वेंकाजी रुद्र, माहालानिहाय, तर्फ कोले. श्री संप्रदायाचीं कागदपत्रें [खंड

१], लेखांक २५ (१६७७). कोळ किंवा कोळे हे गाव सातारा जिल्ह्याच्या कऱ्हाड तालुक्यात आहे.

३७४. व्यंकाजी (ऊर्फ वेंकाजी) दत्तो. सभासद बखर, पृ. ६०, ६१, ७१.

३७५. व्यंकटराव खांडकर. सभासद बखर, पृ. ९८.

३७६. शंकराजी नागनाथ, मुजुमदार, बामणोली, सुभा जावळी. शिचसा ३, लेखांक ६२९ (पृ. २२६, १६५७).

३७७. शंकराजी मोरदेव, नारो बापूजी जुमलेदार याचा मुजुमदार. पुद ३, पृ. १३८.

३७८. शंकरोजी (ऊर्फ संकरोजी) माने. सभासद बखर, पृ. ९९.

३७९. शामजी आवजी, हवालदार, तर्फ जाळगाऊ. मइसा ८, लेखांक ३२ (१६७५).

३८०. शामजी केशव, दफ्तरदार, किल्ले अदिवंतगड. मइसा १८, लेखांक ५७ (पृ. ८२, १६७५-७६).

३८१. शामजी नाईक पुंडे. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५७ (१६७६).

३८२. शामजी शिवदेव, सुभा, किल्ले सातारा. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६).

३८३. शिवाजी इंगळे. शिभा १३.५३ (१६४८-४९).

३८४. शिवाजी किटो निंबकर, नामदार, तर्फ हवेली, परगणा पुणे. मइसा १७, लेखांक १० (१६५७); मइसा २०, लेखांक २६६ (पृ. ३७७, ३७९).

३८५. शिवाजी बाबाजी, हुजरातीस सबनिसीची पारखी. मइसा १८, लेखांक १९ (पृ. ३८, १६७२).

३८६. सखो कृष्ण लोहकरे, हवालदार, भिवंडी. जेधे शकावली (शिचप्र, पृ. १८-१९, १६५७).

३८७. सखोजी गायकवाड. मइसा २०, लेखांक १८१ (पृ. २६७, १६७६).

३८८. सखोपंत, पोर्तुगिजांकडे वकील. *The Portuguese and the Marathas,* pp. 19-20, (1667).

३८९. सखो भिकाजी, आनंदरावाचा मजमूदार, पुरंदरे दफ्तर, भाग ३, पृ.

१३०, १३४ (१६५२).

३९०. संताजी गिरजोजी. मइसा ८, लेखांक २७ (१६७१).

३९१ संताजी घोरपडे. सभासद बखर, पृ. ९८, १०९.

३९२. संताजी जगथाप, जुमलेदार. शिचसा १५, लेखांक ११५ (सु. १६६८); शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६); मइसा १८, लेखांक १९, (पृ. ३७, १६७२).

३९३. संताजी बोबडे, जुमलेदार. शिचसा १५, लेखांक ११५ (सु. १६६८); पुद ३, पृ. १३८ (१६६४).

३९४. संतोजी भोसले, शाहजी महाराजांची उपस्त्री नरसाबाई हिचा मुलगा. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पत्र क्र. ५९ (पृ. १८९); खंड २, पत्र क्र. ४० (पृ. १४७); सभासद बखर, पृ. ८९; *ERS,* Vol. II, No. 264 (Shivaji's lieutenant and brother Santoji, 1677); Jesuit letter (*Historical Miscelleny,* p. 16); Martin (*FBS,* p. 318, 1678).

३९५.संभाजी अनंत, हवालदार, डिचोली. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पत्र क्र. ३ (१६६३); ५३ (१६७८).

३९६. संभाजी करवर, अंगरक्षक. शिभा २१.७२ (१६५९).

३९७. संभाजी काटे. शिभा १३.५२ (१६४८–४९).

३९८. संभाजी कावजी, अंगरक्षक. शिभा २१.७० (१६५९).

३९९. संभाजी गायकवाड, जुमलेदार. शिचसा १५, लेखांक ११५ (सु. १६६८).

४००. संभाजी हंबीरराव. सभासद बखर, पृ. ९८.

४०१. साऊजी मोहिते, जुमलेदार. शिचसा १५, लेखांक ११५ (सु. १६६८). सभासद बखरीत (पृ. ९८) सावजी मोहिते.

४०२. सामजी नाईक. *ERS,* Vol. I, No. 486 (p. 373, Samgee Naigee, Keeper of the seal).

४०३. सामजी (संभाजी ?) मोहिते. पर्णाल ५.७८ (१६७३).

४०४. सामराज नीळकंठ, पेशवे. पुद ३, पृ. १३१ (१६५२). शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पत्र क्र. ६९ (पृ. २१२–१३, १६५७), २१ (१६५८ किंवा १६५९).

४०५. सामराज पद्मनाभी, सबनीस, पाऊलोक. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पत्र क्र. ६९ (पृ. २१२–१३, १६५७).

४०६. सालो विश्वनाथ, हवालदार, तर्फ कऱ्हेपठार, परगणा पुणे. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६), ५८ (१६७७).

४०७. सिदोजी खराडे, जुमलेदार. शिचसा १५, लेखांक ११५ (सु. १६६८).

४०८. सिदोजी देवकांते, जमातीदार. शिचसा ७, लेखांक ५७ (१६७६).

४०९. सिदोजी (किंवा सिधोजी) निंबाळकर (पवार). पर्णाल ५.७९ (१६७३); जेधे शकावली (शिचप्र, पृ. ३०, १६७९). शिवाजी महाराजांनी डिसेंबर १६५९ मध्ये रुस्तुम–इ जमानचा पराभव केला. त्या लढाईच्या शिवभारतातील वर्णनात महाराजांच्या सेनानायकांची जी नावे शिवभारतात दिली आहेत त्यांत ''प्रवारः सिद्धजित्'' असे एक नाव आहे. ते अर्थात सिदोजी पवार या नावाचे संस्कृतीकरण आहे. तो सिदोजी पवार म्हणजे बहुधा सिदोजी निंबाळकरच असावा. निंबाळकरांचे मूळचे आडनाव पवार होते अशी समजूत आहे. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ९५१ मधील तळटीप २३५ पहा.

४१०. सुंदरजी प्रभू, मुंबईकर इंग्रजांकडे वकील. *ERS,* Vol. I, No. 399 (p. 289, 1673); Vol. II, No. 394. सुरतेत वकील – *ERS*, Vol. II, No. 157 (1676), 168 (1676).

४११. सुभानजी नाईक. सभासद बखर, पृ. ९ (१६५९).

४१२. सूर्याजी (किंवा सूर्यराव) काकडे, अंगरक्षक. शिभा २१.७१ (१६५९); सभासद बखर, पृ. ७१–७२.

४१३. सूर्याजी दुंदुसकर, जुमला, हशम पावलोक. मइसा ८, लेखांक ३२ (१६७५).

४१४. सूर्याजी मालुसरे, तानाजीचा भाऊ. सभासद बखर, पृ. ५३, १०७.

४१५. सोनजी नाईक, रजपूत. मइसा १८, लेखांक १९ (पृ. ३६, १६७२–७३).

४१६. सोनजी रायाजी चव्हाण, दहा लोकांची नाइकी,, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३३ (१६७७).

४१७. सोनजी लोहारी, रजपूत. मइसा १८, लेखांक १९ (पृ. ३६, १६७२–७३).

४१८. सोन दळवे. सभासद बखर, पृ. १००.

४१९. सोनाजी तमाजी प्रभू, मजमूदार, कर्यात मावळ. शिचसा २, लेखांक २८१ (पृ. २७५, १६७५); मइसा १८, लेखांक २१ (पृ. ४१, १६७५). शिचसा २ मधील सोनाजी ऐवजी मइसा १८ मध्ये सोमाजी. शिचसा २ मधील पाठ एक फाटकी अस्सल व तिची नकल या दोन्हींवरून केला आहे. मइसा १८, लेखांक २१ ही त्याच महजराची फाटकी नक्कल आहे.

४२०. सोनाजी विश्वनाथ, डबीर. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पत्र क्र. ६९ (पृ. २१२–१३, १६५७) जेधे शकावली (शिचप्र, पृ. २३, १६६४–६५).

४२१. सोमाजी नाईक बंकी. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५८ (१६७६). सभासद बखरीत (पृ. ८५, १०६) सोनाजी नाईक बंकी आणि सोनोजी नाईक बंकी.

४२२. सोमाजी पंडित, अण्णाजी दत्तोचा भाऊ. *ERS,* Vol. II, No. 444 (Summajee Pundit, Anagee's brother, 1679). जेधे शकावलीत सोमाजी दत्तो असा उल्लेख आहे (शिचप्र, पृ. ३१, १६८१), तो याचाच असावा.

४२३. सोमाजी विष्णू, हवालदार, तर्फ रोहिडखोरे. शिचसा ३, लेखांक ५८४ (१६६०).

४२४. हणमंत खराडे, नाईकजीचा मुलगा. शिभा २४.३४ (१६६०). अफजलखानवधानंतर नाईकजी आदिलशाहीकडून शिवाजी

महाराजांकडे आला तेव्हाच हणमंतही आला असला पाहिजे. डिसेंबर १६५९ मध्ये महाराजांनी रुस्तुम-इ जमानच्या सैन्याचा पराभव केला तेव्हा हणमंत व नाईकजी महाराजांच्या सैन्यात होते. (श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ९५० व त्यातील टीप २३३ पहा.) पण पुढे १६७७-७८ मध्ये हणमंत आदिलशाहीकडे होता. पहा – शिचसा २, लेखांक ३९५ (१६७७); शिचसा ५, लेखांक ७८२ (१६७७); शिचसा ६, लेखांक ६९ (१६७८).

४२५. हंबीरराव मोहिते, सरनौबत (सेनापती). जेधे शकावली (शिचप्र, पृ. २७, १६७५). नाव – हसाजी (किंवा हंसाजी). सभासद बखर, पृ. ७६-७७.

४२६. हरजी निंबाळकर, सभासद बखर, पृ. ९८.

४२७. हरजी महाडिक, परसोजीचा मुलगा आणि शिवाजी महाराजांचा जावई. शिचसा ८, लेखांक ६७ (१६७७); शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २५७ (१६७६).

४२८. हरिदास केदारदास, तटसरनौबत, कोट उटतूर. मइसा ८, लेखांक ३५ (१६७७).

४२९. हाबाजी हैबतराव सिलिंबकर. मइसा १७, लेखांक ९ (१६५०-५१).

४३०. हिरोजी इंगळे. शिभा २४.३७ (१६५९).

४३१. हिरोजी इंदलकर, सुभेदार, इमारती, किले रायगड. मइसा १८, लेखांक ५७ (पृ. ८२).

४३२. हिरोजी फर्जंद. सभासद बखर, पृ. ४३, ४८-४९, १०७.

४३३. हिरोजी भालदार. सभासद बखर, पृ. १००.

४३४. हिरोजी मराठे. सभासद बखर, पृ. १००.

४३५. हिरोजी शेळके. सभासद बखर, पृ. ९९.

४३६. xx णोजी बिन शितोळे, जमातीदार. शिचसा ६, लेखांक ५७ (१६७६).

शिवाजी महाराजांचे आणखी पाच हिंदू सेवक

४३७ ते ४४० *Selected Documents of Aurangzeb's Reign* या पुस्तकात पृ. १०७-०८ वर (A.R. No. 1061) २५ रजब, जुलूस सन १९ (म्हणजे २४ सप्टेंबर १६७६) या तारखेचा एक 'तजवीजनामा' (म्हणजे शिफारसपत्र) छापला आहे. त्यात शिवाजी महाराजांच्या सेवकांपैकी (''राघोजी वगैरा अज नौकरान-सीवा मकहूर'') मुघलांकडे आलेल्या चार जणांची खान जहान बहादुर याने मनसबी करिता शिफारस केली आहे. ते चारजण असे आहेत: १) रघोजी, २) गोपालजी, ३) हरी पंडित आणि ४) अंबाजी. ही नावे त्या दस्तऐवजाच्या फार्सी पाठात आहेत. त्यापुढे अगदी त्रोटक इंग्रजी सारांश दिला आहे, त्यात नावे दिलेली नाहीत.

४४१. करमाजी. जयसिंगाकडे वकील. हफ्त अंजुमन (House of Shivaji, ed. of 1940, p. 104.)

ही यादी मी काही निवडक साधने पाहून एका वाचनात तयार केली आहे. अधिक बारकाईने पाहिले तर हिच्यात पाचदहा नावांची वाढ होऊ शकेल. दुसरी गोष्ट अशी की छत्रपती संभाजी महाराजांच्या आणि छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीमध्ये आढळणारे कित्येक सेवक, विशेषतः जरा वरच्या पदांवरील सेवक, शिवाजी महाराजांच्या सेवेतही असले पाहिजेत; त्यांना एकदम वरचा हुद्दा दिला गेला असणे शक्य नाही. उदाहरणार्थ, संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत, काशी रंगनाथ हा निदान १८ ऑक्टोबर १६८० पासून जावळी प्रांताचा देशाधिकारी होता. तो एकदम त्या पदावर नेमला गेला असणे शक्य नाही. तो तत्पूर्वी शिवाजी महाराजांच्या सेवेतही असला पाहिजे. पण हे अनुमान अवाजवी नसले तरी तो शिवाजी महाराजांच्या सेवेत होता असा पुरावा मला आढळला नाही. म्हणून वरील यादीत मी त्याचा समावेश केला नाही. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत आणि राजाराम महाराजांच्या कारकीर्दीच्या पहिल्या दहा वर्षांत, जरा वरच्या पदांवर असणारे अधिकारी शिवाजी महाराजांच्या सेवेतही असले पाहिजेत हे अनुमान

स्वीकारले तर वरील यादी बहुधा पाचशेच्या घरात तरी जाईल.

स्पष्टीकरणार्थ टीपा

स्पष्टीकरण टीप क्र. १ – अनाजी वाळके (तट) सरनौबत, कोट उटतूर. (वरील यादीतील क्र.२.)

शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांवर जे अधिकारी असत त्यांत सरनौबत व तटसरनौबत या नावांच्या पदांचे अधिकारी असत. इथे अनाजी वाळके याचा (तट) सरनौबत म्हणून उल्लेख आला आहे. या निमित्ताने महाराजांच्या किल्ल्यांवरील अधिकारीगणाची थोडी माहिती इथे देतो.

आपण सामान्यतः किल्ल्याच्या प्रमुखाचा उल्लेख किल्लेदार असा करतो, पण आदिलशाहीत आणि शिवशाहीतही किल्ल्याच्या प्रमुख अधिकाऱ्याला हवालदार म्हणत असत. शिवशाहीत मुलकी प्रशासनात आणि सैन्यातही हवालदार या नावाची पदे होती ती वेगळी. किल्ल्याच्या हवालदाराच्या हाताखाली सरनौबत, सबनीस व कारखानीस हे अधिकारी असत. सेनापती अशा अर्थीही सरनौबत ही संज्ञा वापरली जात असे, तो सरनौबत वेगळा. किल्ल्याच्या हवालदाराच्या हाताखालचा दुय्यम अधिकारी म्हणजे सरनौबत, सबनीस म्हणते हजेरी ठेवणारा व पगार देणारा अधिकारी आणि कारखानीस म्हणजे कोठाराचा प्रमुख. कधीकधी तटाचे विभाग पाडून एक एक विभाग एकेका अधिकाऱ्याच्या हाताखाली देत त्याला म्हणत तटसरनौबत.

शिवाजी महाराजांनी नागोजी भोसले मुद्राधारी, कोट उटतूर याला पाठविलेले ३० जुलै १६७७ या तारखेचे पत्र उपलब्ध आहे.[२१] त्यात त्या किल्ल्यावर ''तटसरनोबत'' व जाहगीर नेमल्याचे सांगून खाली त्यांच्या याद्या दिल्या आहेत. त्यांपैकी डाव्या रकान्यात ''सरनोबत तटाचे'' अशा मथळ्याखाली पुढील चार नावे आहेतः हरिदास बिन केदारदास तटसरनोबत, येसाजी लखमाजी जाधव सरनोबत, माणकोजी पवार तटसरनोबत, अनाजी वाळके सरनोबत. या नावांपैकी येसाजी लखमाजी जाधव व अनाजी वाळले या दोघांच्या नावापुढे तटसरनोबत असे न

म्हणता नुसतेच सरनोबत म्हटले असले तरी तेही तटसरनोबतच आहेत हे मथळ्यावरून स्पष्ट आहे; लेखनिकाने संक्षेपाने तिथे सरनोबत म्हटले आहे इतकेच.

स्पष्टीकरण टीप क्र. २ – अर्जोजी यादव, हवालदार, इमारत, प्रतापगड. (वरील यादीतील क्र.७)

शिवाजी महाराजांच्या हिंदू सेवकांच्या यादीत किल्ल्याच्या इमारतीचा हवालदार या पदावरील आणखीही काही अधिकारी आहेत. किल्ल्याचा प्रमुख अधिकारी असणारा हवालदार वेगळा आणि किल्ल्याच्या इमारतींवरील हवालदार, म्हणजे बांधकामाची जबाबदारी असणारा हवालदार, वेगळा. उदाहरणार्थः शिवाजी महाराजांनी नागोजी भोसले मुद्राधारी कोट उटतूर याला पाठविलेले ३० जुलै १६७७ या तारखेचे पत्र उपलब्ध आहे आणि त्यांनीच केदारजी जाधव बिन फिरंगोजी हवालदार इमारत कोट उटतूर याला पाठविलेले त्याच तारखेचे पत्र उपलब्ध आहे.[२२] मुद्राधारी म्हणजे हवालदारच. शिवाय नागोजी भोसले याला पाठविलेल्या त्या पत्राच्या मायन्यात त्याला ''नागोजी भोसले मुद्राधारी कोट उटतूर'' म्हटले असले तरी त्याच पत्रात त्याला पुढे ''खासा तुम्ही नागोजी भोसले हवालदार कोट मजकूर'' म्हटले आहे. त्या पत्रात सुरुवातीस ''स्वामी [म्हणजे शिवाजी महाराज] तुम्हावरी कृपाळू होउनु कोटमजकुरीचा हवाला देउनु सरंजामी केली'' असे सांगितले आहे आणि केदारजी जाधव बिन फिरंगोजी हवालदार हमारत कोट उटतूर याला पाठविलेल्या पत्रात ''स्वामी कृपाळू होउनु इमारत मजकुरीचा तुज हवाला देउनु सरंजामी करून व मजमूदार देउनु ठेविले'' असे सांगितले आहे. दोघांची कामे वेगळी आहेत; नागोजी भोसले याच्याकडे (संपूर्ण) कोटाचा हवाला दिला आहे आणि केदारजी जाधव याच्याकडे कोटातील इमारतीचा हवाला दिला आहे. आदिलशाहीत, कुत्बशाहीत, किंवा मुघल साम्राज्यात किल्ल्यावरील बांधकामाकरिता वेगळा अधिकारी नेमल्याचे मला कागदपत्रांमध्ये आढळलेले नाही.

स्पष्टीकरण टीप क्र. ३ – एसू काकडा, रजपूत. (वरील यादीतील क्र १९)

संमत जुन्नर व माहालहायचा सुभेदार राघो बल्लाळ याने केलेला १७ जुलै १६७२ या तारखेचा 'जाबिता मखलासी' म्हणजे हिशोबविषयी चौकशी करून केलेला एक निर्णय आहे. (मइसा १८, लेखांक १९.) त्यात या एसू काकडा याचा व आणखी तिघांचा रजपूत म्हणून उल्लेख आहे. तिथे रजपूत या शब्दाचा अर्थ हिंदू सैनिक असा आहे, उत्तर भारतातील राजपूत जातीचा मनुष्य असा नाही. त्या दस्तऐवजातील जरुरीपुरता उतारा पुढे देतोः

पुणे परगण्याच्या हवेली तर्फेतील खिली या गावच्या काहीजणांनी सुभेदाराकडे फिर्याद केली कीः

''विसाजी बाबजी कुलकर्णी मौजे मजकूर हा कुलकर्ण चालवीत असता आपणास हिसोब गावगतीचा समजाविला नाही, लोकांचे देणेघेणे आहे ते मागत आहेत. विसाजी मुठे खोरियात जाउनु राहिला आहे. तरी साहेबी तलब करूनु आणून त्याचा आपला हिसोब गावगतीचा साहेबी आपणादेखता मनास आणून विल्हे केली पाहिजे.' म्हणउनु फिर्याद केली. त्यावरून सुभाहून, विसाजी बाबजी मुठे खोरियातमधे रहात होता तेथे, सुभाहून चौघजण रजपूत पाठउनु यास मसाला खुद्द निा विसाजी टके २० वीस

सोनजी नाा खासा टके ५... एसू काकडा टके ५...
केरोजी टके ५... सोनजी लोहारी टके ५...

एणेप्रमाणे चौगजण रजपूत सुभाहून माळियाचे मालुमाजीवरून पाठविले.''

सारांश असा की विसाजी बाबजी याच्याविषयी तक्रार होती म्हणून त्याला पकडून आणण्यासाठी सुभ्याहून चार रजपूत पाठविले आणि त्यांचा मसाला (म्हणजे एखाद्याला घेऊन येण्यास पाठविलेल्या जासुदांचा खर्च) म्हणून प्रत्येकी पाच टकेप्रमाणे वीस टके विसाजीने द्यावयाचे होते. पाठविलेल्या चार रजपुतांची नावे सोनजी नाईक, एसू काकडा, केरोजी आणि सोनजी लोहारी अशी दिली आहेत. उघडच आहे की ते सुभेदाराच्या हाताखालील लोकांपैकी चार सैनिक आहेत, उत्तर भारतातील राजपूत नाहीत. रजपूत शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता

काही उदाहरणे पुढे देतोः

(१) यादव दतो, सुभेदार नामजाद किलेहाये, याने मनोहरगडचा हवालदार बाजी घोलप याला शुहूर सन सबा सितैन अलफ (१०६७) मध्ये पाठविलेल्या एका पत्रात पुढील उल्लेख आहेः

''[तुम्ही] पत्र पाठविले [ते] पाऊन लिहिलेप्रमाणे वर्तमान कळो आले. लिहिले जे, 'छ ६ जमादिलाखरी हणवंत माचीस नामाजी नाईक याचा लोकांचा नाईक होता तो माणसासहित तिघा रजपुतानसी रात्री पलोन [गेला].' ''

तिघा रजपुतांनसी म्हणजे तीन सैनिकांसह पत्र पाठविणाऱ्या यादव दत्तोचे पद आहे 'सुभेदार नामजाद किलेहाये.' नामजाद हे नामजद (म्हणजे नेमलेला) या फार्सी शब्दाचे मराठी रूप आहे आणि किलेहाये हे किला या शब्दाचें फार्सी पद्धतीने केलेले अनेकवचन आहे. सुभेदार नामजाद किलेहाये म्हणजे अनेक किल्ल्यांवर नेकलेला सुभेदार. मनोहरगड हा त्यांपैकी एक किल्ला असला पाहिजे. यावरून अनेक किल्ल्यांवर (बहुधा लहान किल्ल्यांवर) वरिष्ठ अधिकारी म्हणून एक सुभेदार शिवशाहीत नेमला जाई असे दिसून येते. (शिचसा १२)

(२) यादव दत्तो, सुभेदार नामजाद किलेहाये, याने मनोहरगडाचा हवालदार बाजी घोलप याला पाठविलेले २४ डिसेंबर १६६६ या तारखेचे पत्र असे आहेः

''बैलाबद्दत रायाजी रजपूत पाठविला व तुम्हासी लिहिले होते त्याचे उत्तर नाही व तो रजपूत गैब [म्हणजे गायब] जाहला [की काय] हेही कलो येत नाही. आता राजेश्री आणाजीपंताचे कागद पाठविला असेल तो घेणे आणि बैलाचे तलास करून बैल लिहिलेप्रमाणे पाठवून देणे. हेविसी दिरंग न लावणे. भात येथे रानामध्ये पडोन राहिले असे. रायेगडासी रवाना करणे असे. बैल आलेवरी पाठऊन देऊन.''

रायगडाला भात पाठविण्याकरिता सुभेदाराने मनोहरगडाहून बैल मागविले होते आणि ते घेऊन येण्याकरिता रायाजी रजपूत याला पाठविले होते. पण रायाजी गायब होता आणि बैलही आले नव्हते. म्हणून हे पत्र पाठविले आहे. रायाजी हा सुभेदाराच्या हाताखालील लोकांपैकी एक सैनिक आहे.

(३) यादव दत्तो, सुभेदार नामजाद किलेहाये, याने विसाजी विठ्ठल, हवालदार,

पेठ कसबे पाटगाव याला शुहूर सन सबा सितैन अलफ (१०६७) या वर्षी पाठविलेल्या पत्रातील उल्लेखः ''तुम्ही लिहिले [ते] कलो आले. 'शाकाराबद्दल रजपूत पाठऊन देणे' म्हणौन लिहिले तरी हाली बाजी नाईक व १० रजपूत पाठविले असेती.''[२३]

इथे शाकार म्हणजे शाकारणीकरिता लागणारे गवत. ते आणण्याकरिता बाजी नाईक याला दहा रजपुतांसह, म्हणजे सैनिकांसह, पाठविले होते. शाकारणी किल्ल्यावर करायची होती हे पत्रातील पुढील मजकुरावरून दिसून येते. तो इथे दिलेला नाही.

वरील तिन्ही पत्रांविषयी प्रा.ग.ह. खरे यांनी दिलेली टीप अशी आहेः ''या तिन्ही पत्रांत रजपूत शब्द आला आहे तो केवळ शिपाई [सैनिक] या अर्थी आहे. शहाजीने आपल्याला प्रसिद्ध पत्रांत स्वतःस आपण रजपूत लोक असे संबोधिले आहे. याचाही अर्थ आम्ही शिपाई गडी असाच आहे. येथे रजपूत जमातीशी काही संबंध नाही.'' (शिचसा १२, पृ. १२०.)

(४) कानदखोऱ्याच्या देशमुखीविषयीच्या एका तंट्याच्या निवाड्याचा महजर त्या खोऱ्यातील धातीब या गावी माघ शुद्ध १०, गुरुवार, शक १५८८ (म्हणजे २४ जानेवारी १६६७) या दिवशी मातुश्री आऊसाहेब यांच्या उपस्थितीत झाला. (मइसा १६, लेखांक २२.) त्याच्या हाजिर मजालसीत, म्हणजे सभेत उपस्थित असलेल्या लोकांच्या यादीत ''बकाजी नाईक मरळ रजपूत'' असे एक नाव आहे. हा बकाजी नाईक सैनिक असेल आणि गावी आला असेल. म्हणून त्याच्या नावापुढे रजपूत ही उपाधी जोडली आहे. मातुश्री आऊसाहेब म्हणजे बहुधा जिजाबाई असाव्यात.

(५) बाजी सर्जाराव देशमुख याने काही सैनिकांना अनुलक्षून पाठवलेले ११ जुलै १६६२ या तारखेचे एक पत्र उपलब्ध आहे.[२४] त्याचा प्रारंभ ''बजानिब रजपुतानी देशमुख ताा रोहिडखोरे'' असा केला आहे. त्याचा अनुवाद ''रोहिडखोरे तप्याच्या देशमुखाचे सैनिक यांप्रति'' असा होईल. पत्राचे आधुनिक मराठी रूपांतर पुढीलप्रमाणेः[२५]

''राजमान्य राजश्री पंताजी पंडित मौजे अंबोडा येथे आहेत. 'तेथे रायाजी

देशमुख बाजाराचे रोजी गेला होता.' तो व उपर्युक्त पंडित यांच्यात कलागत झाली. त्या वेळी त्या पोराने कमअकली करून पंताजी यांच्यावर चालून जाऊन बेअदबी केली आणि त्याच्याबरोबर तुम्हीदेखील [तसेच केलेत]. ती तालीक लिहिली जाऊन साहेबांस [म्हणजे शिवाजी महाराजांना] खरी बातमी समजली.

हे तुम्हास कसे सहन झाले? उपर्युक्त पंडित 'बहुत थोर मनुष्य आहेत. साहेबांचे [म्हणजे शिवाजी महाराजांचे] मेहेरबानीत ते बहुत काही आहे. असे असता तुम्ही लहान लोकी त्यांसी बेअदबी केली. तरी साहेबांची [म्हणजे शिवाजी महाराजांची] रवेशी [म्हणजे रीत, रिवाज] तरी तुम्हांस ठावकीच आहे.' या उपरी तुम्ही सर्वांनी उपर्युक्त पंडितांपाशी जाऊन 'बजिद होऊनु आपला गुन्हा त्यांपासून माफ करून घेणे.'[२६] जर वर लिहिल्याप्रमाणे अंमल न कराल आणि त्या तालिकेचा बयदा निस्तरला नाहीत तर 'साहेब तमाम रजपुतांचे पायी बेडिया घालूनु गळां तोग घालुनु किले राजगडावरी ठेउनु धोंडे वाहवितील.'[२७] हे चांगल्या प्रकारे जाणून उपर्युक्त पंडित यांस 'साहेबांचे [म्हणजे शिवाजी महाराजांचे] जागी समजोन' अदब राखत जाणे.''

वरील पत्रात रजपूत या शब्दाचा अर्थ सैनिक एवढाच आहे, उत्तर भारतातील राजपूत असा नाही.

शाहजी महाराजांनी आदिलशाहीतील कोणा खानाला सप्टेंबर १६५५ च्या सुमारास लिहिलेले एक मराठी पत्र उपलब्ध आहे. पत्राचा शेवटचा काही भाग फाटून गेलेला आहे आणि पत्राच्या शेवटचा काही भाग फाटून गेलेला आहे आणि पत्राच्या अवशिष्ट भागात त्याची तारीख दिलेली नाही. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ७२३ ते ७२९ मध्ये त्या पत्राचे आधुनिक मराठी रूपांतर छापले आहे.'[२८] त्यातील एक उतारा असा आहे :

''मत्सरी लोकांच्या सांगण्यावर विसंबून आमच्या जहागिरीत पादशाह निष्कारण गैरहिशेबी ढवळाढवळ करवितात. तरी आपण [म्हणजे आम्ही] रजपूत लोक. आजतागायत दोनचार पादशाह्यांत चाकरी केली, परंतु गैरहिशेबी जास्ती सोसून कमइज्जतीने व गैरमेहेरबानीने पूर्वीही चाकरी केली नाही व पुढेही करणार

नाही.''[२९]

इथेही रजपूत या शब्दाचा अर्थ सैनिक, शिपाईगडी असा आहे. शाहजी महाराज हे खूप मोठ्या हुद्द्यावर होते हे खरे, पण सेनाधिकारी कितीही मोठ्या हुद्द्यावर असला तरी मूलतः सैनिकच असतो आणि स्वतःला अभिमानाने सैनिक म्हणवतोही. एक उदाहरण देतो. दुसऱ्या महायुद्धातील एक प्रसिद्ध अमेरिकन सेनानी ओमर ब्रॅडले (Omar Bradley) 'जनरल ऑफ द आर्मी' या हुद्द्यावर पोचला होता. अमेरिकन आर्मीतील तो हुद्दा ब्रिटिश आर्मीतील फील्ड मार्शल या हुद्द्याच्या बरोबरीचा आहे. त्या हुद्द्यावरील ब्रॅडलेने आपल्या आत्मचरित्राला नाव दिले आहे *A Soldier's Story*. तेव्हा शाहजी महाराज जरी खूप मोठ्या हुद्द्यावर पोचले होते तरी त्यांनी स्वतःला अभिमानाने रजपूत म्हणजे शिपाईगडी म्हणवावे यात काही आश्चर्य नाही.

मी आतापर्यंत मराठी कागदपत्रांमध्ये जेव्हा जेव्हा सैनिक या अर्थी रजपूत हा शब्द आल्याचे पाहिले आहे तेव्हा तेव्हा तो सैनिक, निदान नावावरून तरी, हिंदूच होता. म्हणून मला वाटते तो शब्द हिंदू सैनिक, हिंदू योद्धा, अशा अर्थी वापरला जात असे.

स्पष्टीकरण टीप क्र. ४ – सुभा तर्फ मावळे, सुभा माहालहाय परगणा वाई, इत्यादी. (वरील यादीतील क्र. ४१,५३,६५,७४, इत्यादी.)

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात सुभा नावाचा मोठा प्रशासकीय विभाग केला होता. त्यातील वेगळेपण काय होते ते स्पष्ट व्हावे म्हणून इतर राज्यांमध्ये काय व्यवस्था होती ते प्रथम सांगतो.

मुघल साम्राज्य कारभारासाठी अनेक सुभ्यांमध्ये विभागलेले होते. सुभ्याच्या प्रमुख अधिकाऱ्याला सूबादार (मराठीत सुभेदार) किंवा साहिब–इ सूबा किंवा नाज़िम असे म्हणत असत.[३०] सुभ्याच्या लष्करी व मुलकी कारभाराची जबाबदारी त्याच्यावर असे. कारभारासाठी प्रत्येक सुभ्याचे जे विभाग पाडलेले असत त्यांना सरकार असे म्हणत.[३१] सरकार या विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्याला फौजदार असे म्हणत असत.[३२] प्रत्येक सरकारचे जे उपविभाग पाडलेले असत त्यांना परगना

(मराठीत परगणा) म्हणत.[३३] परगण्याच्या मुख्य अधिकाऱ्याला सामान्यतः थानेदार असे म्हणत.[३४] प्रत्येक परगण्यात अनेक गावे असत.

आदिलशाही मुलखात प्रशासनासाठी जे अनेक विभाग पाडलेले असत त्यांना परगणे किंवा मामले असे म्हणत.[३५] प्रत्येक परगण्यात किंवा मामल्यात अनेक गावांचा अंतर्भाव होई.[३६] परगणा किंवा मामला मोठा असेल तर त्याचे उपविभाग पाडलेले असत. अशा उपविभागाला तरफ (तर्फ), कर्यात, संमत किंवा तपा असे म्हणत.[३७] मुघल साम्राज्यात अनेक परगणे मिळून सरकार आणि अनेक सरकारे मिळून सुभा होई. आदिलशाहीत तशी व्यवस्था नव्हती; तिथे परगणा किंवा मामला हाच सर्वात मोठा प्रशासकीय विभाग होता. निजामशाहीत मात्र अनेक परगण्यांचा किंवा मामल्यांचा मिळून संमत नावाचा विभाग कारभाराकरिता करीत असत.[३८]

आदिलशाहीत परगण्यावरील प्रमुख अधिकाऱ्याला हवालदार किंवा सरहवालदार म्हणत. परगणा जर मुकासा (म्हणजेच जहागीर) म्हणून दिला असेल तर त्यावरील हवालदाराची किंवा सरहवालदाराची नेमणूक मुकासदार करीत असे आणि परगणा जर आदिलशाहाने स्वतःकडे राखून ठेवला असेल, म्हणजेच अमानत असेल, तर त्यावरील हवालदाराची किंवा सरहवालदाराची नेमणूक आदिलशाह करीत असे.[३९] आदिलशाहीत कारभारासाठी परगण्यापेक्षा मोठा विभाग केला जात नसला तरी कधी कधी सरहद्दीवरील काही मुलूख, विशेषतः तिथे आक्रमणाचे किंवा अंतर्गत बंडाळीचे भय असेल तर, एकाच वजिराच्या हाताखाली देत असत आणि त्याला सुभेदार किंवा सरसुभेदार म्हणत.[४०] हे सुभेदारपद किंवा सरसुभेदारपद हे लष्करी कामगिरीकरिता देलेले पद असे, मुलकी प्रशासनाकरिता दिलेले पद नसे.

आदिलशाहीत आणखीही एका प्रकारचे सुभेदार असत. त्यांची नेमणूक आदिलशाहाने केलेली नसे, मुकासदाराने केलेली असे, म्हणजेच ते मुकासदाराचे नोकर असत, आदिलशाही वजीर नसत. एखाद्या मुकासदाराने त्याला मुकासा म्हणून मिळालेल्या एका किंवा अनेक परगण्यांचा कारभार पाहण्याकरिता स्वतःच्या वतीने नेमलेल्या ज्येष्ठ अधिकाऱ्याला सुभेदार म्हणत.[४१] हा सुभेदार प्रामख्याने

मुलकी प्रशासक असे. उदाहरणार्थ : (१) कोंढाणा किल्ला आणि त्याभोवतीचा पुणे, शिरवळ व सुपे हे परगणे आणि खेडेबारे, कर्यात मावळ, गुंजण मावळ, इत्यादी मुलूख शाहजी महाराजांकडे मुकासा म्हणून होता आणि त्यांच्या वतीने सुभेदार म्हणून दादाजी कोंडदेव त्या मुलखाचा कारभार करीत होते. तत्कालीन कागदपत्रांमध्ये त्यांचा उल्लेख ''दादाजी कोंडदेऊ सुभेदार किले कोंढाणा व माहालानिहाय'' असा येतो.[४२] महाल ही लहानमोठ्या प्रादेशिक प्रशासकीय विभागांना अनुलक्षून वापरली जाणारी संज्ञा होती. महालहाय हे महाल या शब्दाचे फार्सी पद्धतीने केलेले अनेकवचन आहे आणि माहालानिहाय हे त्या अनेकवचनाचेच अशुद्ध पण सर्रास वापरले जाणारे रूप आहे.[४३] ''दादाजी कोंडदेऊ सुभेदार किले कोंढाणा व माहालानिहाय'' म्हणजे कोंढाणा किल्ला व [त्या परिसरातील अनेक] महाल यांच्यावर नेमलेले सुभेदार दादाजी कोंडदेव. (२) सिकंदर आदिलशाहाने सिदोजी माने याला पाठविलेल्या १५ नोव्हेंबर १६७३ या तारखेच्या एका फर्मानात ''खवासखानाच्या वतीने नेमला गेलेला त्या बाजूच्या महालांचा सूबादार एसू पंडित'' अशा अर्थाचा उल्लेख आला आहे.[४४] हा एसू पंडित खवासखानाने स्वतःच्या मुकाशांवर नेमलेला सुभेदार असला पाहिजे. (३) बंकापूर मामल्याची कुंदगोळ संमत १६७७ मध्ये हणमंतराव खराडे याच्याकडे आदिलशाहीकडून मुकासा म्हणून होती. त्या वेळी त्याच्या वतीने गणेश पंडित हा त्या परिसरावर सुभेदार म्हणून होता.[४५] त्याने कुंदगोळ समतेतील नाडगिरांना पाठविलेल्या २ सप्टेंबर १६७७ या तारखेच्या पत्रात त्याचे नाव ''गणेश पंडित सुबेदार माहालानिहाये'' असे लिहिले आहे.[४६] (४) भीमराव नागनाथ याने लक्ष्मेश्वर परगण्याचा देसाई केंचणगौडा याला पाठविलेले ४ जानेवारी १६७८ या तारखेचे पत्र उपलब्ध आहे. त्यात भीमराव नागनाथ याचे पद ''सुभेदार माहालानिहाये ताा हिसार धारवाड'' (म्हणजे हिसार धारवाड ताफेतील महालांचा सुभेदार) असे नमूद केले आहे.[४७] तो मुलूख त्या सुमारास जमशीदखान याच्याकडे मुकासा म्हणून होता. त्याच्या वतीने भीमराव नागनाथ त्या परिसरावर सुभेदार म्हणून होता असे उपलब्ध पुराव्यांवरून दिसते.[४८]

शिवाजी महाराजांची अशाच पद्धतीने परगण्याच्या वरच्या पातळीवरचा सुभा नावाचा प्रादेशिक प्रशासकीय विभाग स्वराज्यात तयार केला होता. असे अनेक सुभे स्वराज्यात होते. अशा सुभ्यावरील प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्याला सुभेदार म्हणत. हे सुभेदार स्वतः शिवाजी महाराजांनी, म्हणजेच मध्यवर्ती सरकारने, नेमलेले सुभेदार असत आणि आदिलशाहीतील दादाजी कोंडदेव, एसू पंडित, इत्यादी वरील उदाहरणांमधील सुभेदार हे मुकासदारांनी नेमलेले सुभेदार असत म्हणजेच त्या मुकासदारांचे खाजगी नोकर असत, हा त्यांच्यातील मूलभूत फरक आहे. शिवशाहीत सुभा हा परगण्याच्या वरच्या पातळीचा सरकारने तयार केलेला मुलकी प्रादेशिक प्रशासकीय विभाग होता, आदिलशाहीत तसा काही प्रशासकीय विभाग नव्हता. मुघल साम्राज्यात अनेक परगण्यांचे सरकार होई आणि अनेक सरकारांचा सुभा होई; शिवशाहीत अनेक परगण्यांचा सुभा होई.

शिवशाहीतील काही सुभ्यांची उदाहरणे पुढे देतो : (१) मावळे – ''महादाजी सामराज सुबेदार व कारकून सुबा महालानिहाये ताा मावले'' याने ''माहादाजी नरस परभू हवालदार व कारकून ताा कर्याती मावल'' याला पाठविलेले ७ ऑक्टोबर १६७५ या तारखेचे पत्र उपलब्ध आहे.[४९] तेव्हा माहादाजी नरस प्रभू हा कर्याती (किंवा कर्यात) मावल तरफेचा हवालदार होता आणि महादाजी सामराज हा सुभा माहालानिहाये तर्फ मावले या सुभ्याचा सुभेदार होता असे त्यावरून दिसून येते. सुभा माहालानिहाये तर्फ मावले म्हणजे मावळे तर्फेच्या महालांचा सुभा. त्यात कर्यात मावळ तरफेचा समावेश होता हे वरील पत्रावरून दिसून येते. या सुभ्याचा उल्लेख सुबा ताा मावल, सुबा ताा मावले, प्रांत मावळ, इत्यादी प्रकारे होत असे अणि त्यात शिरवळ परगणा आणि रोहिडखोरे, गुंजण मावळ, मोसे खोरे, मुठे खोरे व आधीच्या पुणे परगण्यातील कर्यात मावळ अशा निदान सहा उपविभागांचा समावेश होत होता, असे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते.[५०] त्या सुभ्याचा उल्लेख असलेले जुन्यातले जुने पत्र २७ ऑक्टोबर १६६७ या तारखेचे आहे.[५१] तत्पूर्वी केव्हा तरी हा सुभा निर्माण केला गेला असला पाहिजे.

(२) सुभा परगणे कुडाळ व महालानिहाय. मइसा २०, लेखांक २८० (२४

मार्च १६८०); शिचसा १२, लेखांक १२२ (१६६६).

(३) सुबा ताा गदग. शिचसा ६, लेखांक ६७ (१६७५).

(४) सुभा संमत जुन्नर व माहालहाय. शिचसा ४, लेखांक ६८४ (पृ. १५, १६७६); मइसा १८, लेखांक

स्पष्टीकरण टीप क्र. ५ – नारो भिकाजी, सुभेदार, सरदेशमुखी सरकार महालहाय, तलकोकण. (वरील यादीतील क्र. १८७.)

शिवाजी महाराजांना त्यांचा जो मुलूख पुरंदरच्या तहाने (१६६५) औरंगजेबाला द्यावा लागला होता त्या मुलखात औरंजेबाने त्यांचा सरदेशमुखीचा हक्क मान्य केला होता.[५२] सरदेशमुखी हे एक वतन होते. सरदेशमुखाला त्या वतनापोटी काही जमिनी इनाम असत आणि निरनिराळ्या गावांमधून धान्य वगैरे वस्तू, काही रोख रक्कम, इत्यादी स्वरूपांचे हक्क असत.[५३] सरदेशमुखीचे वतन हे सामान्यतः एखाद्या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून दिले जाई; कारभाराची काही जबाबदारी सरदेशमुखावर नसे. महाराजांनी पुरंदरच्या तहाने औरंगजेबाला जो मुलूख दिला होता त्या मुलखातही सरदेशमुखीचे हक्क वसून करण्याकरिता त्यांच्या वतीने त्यांचे अधिकारी रहात असत. नारो भिकाजी हा असाच महाराजांचे तळकोकणातील सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याकरिता नेमलेला महाराजांचा अधिकारी होता. महालहाय तलकोकण म्हणजे तळकोकणातील महाल म्हणजे तळकोकणातील मुलकी प्रशासकीय प्रदेश. सरदेशमुखी सरकार म्हणजे सरदेशमुखीचे खाते. नारो भिकाजी हा तळकोकणातील महालांमधून महाराजांचे सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याच्या खात्याचा प्रमुख प्रशासक म्हणजे सुभेदार होता. त्याचप्रमाणे विसाजी बल्लाळ हा पुणे तर्फेच्या महालांमधून महाराजांचे सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याच्या खात्याचा सुभेदार होता. त्याचेही नाव महाराजांच्या हिंदू सेवकांच्या यादीत आहे.

शिवाजी महाराजांचे मुसलमान सेवक

शिवाजी महाराजांच्या नोकरीत जे मुसलमान होते त्यांची चार गटांमध्ये विभागणी करता येते म्हणून त्यांची नावे मी वर्णानुक्रमे न देता गटांनुसार दिली आहे.

त्यांपैकी पहिल्या गटात पाच नावे आहेत, दुसऱ्यात तीन नावे आहेत, तिसऱ्यात दोन नावे आहेत, आणि चौथ्यात दोन नावे आहेत. तेरावे नाव शेवटी दिले आहे यादी पुढीलप्रमाणे :

१. जैनाखान पीरजादे, सरहवालदार, परगणा पुणे. *RSP,* letter no. 17 (1653-54); पेद ३१, लेखांक २३ (१६५५).

२. नूरबेग, सरनौबत, पाऊलोक. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २१२–१३ (२१ मार्च १६५७).

३. बहिलीमखान, हवालदार, तर्फ बारामती प्रांत सुपे. शिचसा ७, लेखांक ३२ (१६४३).

४. सिद्दी अंबर बगदाद. शिचसा २, लेखांक १२९.

५. कासिब बे, हवालदार, पेठ शिवापूर. पुद ३, पृ. १३० (१६५२).

६. काजी हैदर, पारसनीस. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पत्र क्र. ३२ (पृ. १०६–०७, १६६९–७०). पर्णाल २.५२–५४. *Maasir-i-Alamgiri*, p. 143.

७. दर्यासारंग. मइसा ८, लेखांक ३१ (१६७५). हा मुसलमान असल्याचे सभासद बखरीत (पृ. ६५) सांगितले आहे. दर्यासारंग व त्याचा मुलगा यांना (शिवाजी) राजाच्या हुकुमावरून कैद करून त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आली आहे असे राजापूरहून सुरतेला पाठविण्यात आलेल्या ६ नोव्हेंबर १६७८ या तारखेच्या पत्रात म्हटले आहे. (*ERS,* Vol. II, No. 341.) त्यानंतर त्याचा उल्लेख कुठे आढळत नाही.

८. दौलतखान. मइसा ८, लेखांक ३१ (१६७५).

९. नूरखान. तारीखे दिल्कशाचा लेखक भीमसेन सक्सेना याने त्या ग्रंथात सांगितलेली एक हकिगत अशी आहे : तो दख्खनमध्ये दाऊदखान या मुघल मनसबदाराच्या पथकात हिशोब तपासणे इत्यादी कामांच्या खात्यात नोकरी करत असताना १६७० मध्ये साल्हेरला कुमक करण्यासाठी निघालेल्या दाऊदखानाच्या फौजेत होता. तो वाटेत एकटाच मागे पडला आणि शत्रूच्या [म्हणजे मराठ्यांच्या] घोडेस्वारांच्या एका तुकडीशी त्याची गाठ पडली. त्या तुकडीतील एका

घोडेस्वाराने त्याला ओळखले. इतरांना मागे थांबण्यास सांगून तो भीमसेनाजवळ आला. त्याने भीमसेनाला सांगितले की त्याचे नाव नूरखान असून तो भीमसेनाच्या वडिलांना ते औरंगाबाद येथे असताना ओळखत होता आणि विवंचनांमुळे व बेरोजगारीमुळे त्याने शिवाजीकडे नोकरी पत्करली आहे. त्याने भीमसेनाला मुघल छावणीपाशी पोचवले. भीमसेनाच्या सांगण्यावरून तो शस्त्रे बाजूला ठेवून भीमसेनाबरोबर छावणीत गेला आणि तिथे पाचसहा तास राहून परतला. (English translation : *Tarikh-i-Dilkasha*, pp. 79-80.) नूरखानाला कसल्या विवंचना होत्या आणि तो का बेरोजगार होता ते भीमसेनाने नमूद केलेले नाही; कदाचित नूरखानाने त्याला ते सांगितले नसेल. महाराजांच्या सैन्यात त्याला नोकरी मिळाली त्या अर्थी तरे मुळात सैनिक असला पाहिजे. मुघलांकडे काहीतरी बिनसल्यामुळे तो महाराजांकडे आला असेल.

१०. सिद्दी हिलाल. अफजलखानाच्या फौजेत होता. तो खेळोजी भोसल्याचा क्रीतपुत्र (म्हणजे विकत घेऊन स्वतःच्या मुलाप्रमाणे वाढविलेला मुलगा) होता असे शिवभारतात (२३.५५) सांगितले आहे. अफजलखानवधानंतर नाईकजी पांढरे, नाईकजी खराडे व कल्याणजी यादव हे त्याच्या सैन्यातील सरदार सिद्दी हिलाल याला पुढे करून व अभय मिळवून शिवाजी महाराजांना सामील झाले. पन्हाळ्याचा वेढा उठविण्याकरिता नेतोजी पालकराने जो हल्ला केला त्यात सिद्दी हिलाल सामील होता. तेव्हा त्याचा मुलगा सिद्दी वाहवाह (सिद्दी यह्या) जखमी होऊन कैद झाला.[५४] सिद्दी हिलाल पुढे मुघलांना मिळाला असे दिसते कारण १६७२ मध्ये जाधवराव, सिद्दी हिलाल व इतर दोघे मुघलांची चाकरी सोडून शिवाजी महाराजांकडे आले असे दोन इंग्रजी पत्रांवरून दिसून येते. (*ERS,* Vol. I, Nos. 314, 322. शिवाय पहा पर्णाल २.४४.) उमराणीच्या लढाईत तो प्रतापरावाच्या सैन्यात होता. (पर्णाल ५.५६, ७७.) सिद्दी हिलालच्या पाच पुत्रांचा उल्लेख त्याच्याबरोबरच एका ठिकाणी आला आहे पण त्यांची नावे तिथे दिलेली नाहीत त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. म्हणून त्यांचा आणि त्यांच्यापैकी सिद्दी वाहवाहचाही समावेश मी या यादीत केलेला नाही. ते सिद्दी हिलालचे कुटूंबीय

म्हणून त्याच्याबरोबर आहेत. (सिद्दी वाहवाह करिता शिभा २६:३३.)

११. शामाखान. सभासद बखर, पृ. ९८.

१२. इब्राहीम, अंगरक्षक, शिभा २१.७२ (१६५९). शिवभारतात याला इब्राहीम बर्बर म्हटले आहे. अर्थात तो सिद्दी असला पाहिजे. शिवाजी महाराजांनी फोंड्याचा कोट वेढा घालून काबीज केला ''तेव्हा राजियाकडील सरदार इभ्रामखान मुसलमान मोठा धारकरी, लष्कराचा हजारी, बरोबरी होता, त्याने कष्ट मेहनत बहुत केली'' असे सभासद बखरीत (पृ. ६७) म्हटले आहे. त्याला ''मोठा धारकरी'' म्हटले आहे त्यावरून तो आणि शिवभारतात अफजलखानवधाच्या प्रसंगी महाराजांच्या अंगरक्षकांमध्ये गणलेला इब्राहीम बर्बर हे एकच असावेत असे वाटते.[५५] शिवाजी महाराजांच्या आरमारी सरदारांमध्ये दौलतखान, दर्यासारंग आणि मायनाक भंडारी अशी फक्त तीन नावे इतर साधनांवरून ज्ञात आहेत. सभासद बखरीत (पृ.९९) महाराजांचे आरमारी सरदार म्हणून इब्राइमखान, दर्यासारंग आणि मायनाईक अशी तीन नावे आहेत, पण दौलतखानाचे नाव मात्र त्या बखरीत कुठेच नाही.[५६] त्यावरून, सभासदाने दौलतखानाऐवजी चुकून इब्राइमखान असे नाव दिले असले पाहिजे असे दिसते.

१३. अली वलद बुऱ्हान *Selected Documents of Aurangzeb's* या पुस्तकात पृ. ३५-३६ वर (A.R.No. 4991) ५ सफर, जुलूस सन ५ (१० सप्टेंबर १६६२) या तारखेचा एक फार्सी दस्तऐवज छापला आहे. त्यात शिवाजी महाराजांच्या नोकरीतून आलेला अली वलद बुऱ्हान आणि विजापूरहून (म्हणजे आदिलशाहीतून आलेला) मुहम्मद अमान अशा दोघाजणांना मनसबी दिल्याचे नमूद केले आहे.

वरील पुस्तकातच पृ. १६-१७ वर (A. R. No. 4964) ११ शाबान, जुलूस सन ३ (१ एप्रिल १६६१) या तारखेचा एक फार्सी दस्तऐवज छापला आहे. ''सीवाच्या [म्हणजे शिवाजी महाराजांच्या] मुलखातून आलेल्या'' (''अज़ मुल्क सीवा आमदे'') चारजणांना मनसबी दिल्याचे नमूद केले आहे त्या चारजणांची त्या दस्तऐवजात दिलेली माहिती अशी आहे: १) ''शंकर नव-मुसलमान'' –

माहुलीचा किल्लेदार आका रिज़वान याच्याकडे होता. २) शाह वलद आलिमखान – तळकोकणचा फौजदार खान मुहम्मद याच्याकडे होता. ३) फत्ह मुहम्मद वलद बाकीखान – माहुली किल्ल्यावर हशमांचा दारोगा होता. ४) नारो पंडित – आका रिज़वान याचा कब्ज़नवीस (म्हणजे पावत्या लिहिणारा) होता. हा सर्व तपशील त्या दस्तऐवजाच्या फार्सी पाठात आहे. त्याच्या शेवटी दिलेल्या अगदी त्रोटक इंग्रजी सारांशात त्यांच्याविषयी "formerly in the service of Shivaji" असे चुकीचे विधान केले आहे. ते चारजण 'सीवा'च्या (म्हणजे शिवाजी महाराजांच्या) ताब्यात आलेल्या मुलखातून आले होते; ते शिवाजी महाराजांच्या नोकरीत होते असे त्या दस्तऐवाजात म्हटलेले नाही. शिवाजी महाराजांनी जानेवारी १६५८ मध्ये आदिलशाहीकडून माहुलीचा किल्ला काबीन केला. तेव्हा बेरोजगार होऊन परागंदा झालेले ते लोक आहेत. अर्थात ते चारजण आणि आका रिज़वान व खान मुहम्मद हे आदिलशाही नोकर होते. त्यांपैकी शेवटचे दोनजण कदाचित मारले गेले असतील, त्यांचे नेमके काय झाले ते समजण्यास काही साधन नाही.

शिवाजी महाराजांचा मुसलमान सेवक म्हणून मदारी मेहतर असे एक नाव सांगितले जाते. त्याची सांगितली जाणारी गोष्ट कशी काल्पनिक आहे ते मी पुढे सांगणार आहे. तत्पूर्वी वर दिलेल्या याद्यांमधून काय निष्पन्न होते ते थोडक्यात सांगतो. त्या याद्यांमध्ये ४४१ हिंदू आणि १३ मुसलमान मिळून ४५४ सेवक आहेत. त्या आहेत तशा स्वीकारल्या तर एकूण संख्येत मुसलमानांचे प्रमाण २.८५ टक्के येते. पण हे प्रमाणही फसवे आहे, वास्तविक प्रमाण त्यापेक्षाही कमी आहे. कसे ते पुढे सांगतो.

शाहजी महाराजांनी नेमलेले मुसलमान सेवक

पुण्याच्या परिसरात शाहजी महाराजांचे जे मुकासे (जहागिरी) होते त्यांचा कारभार त्यांच्या वतीने त्यांचा सेवक दादाजी कोंडदेव करीत असे. तो १६४६–४७ मध्ये मृत्यू पावला. त्याच्या मृत्यूनंतर त्या मुकाशांचा कारभार शिवाजी महाराज करू लागले — अर्थात शाहजी महाराजांचे प्रतिनिधी म्हणून. २५ जुलै १६४८ रोजी मुस्तफाखानाने मुहम्मद आदिलशाहाच्या हुकुमावरून शाहजी महाराजांना अटक

केली. त्या पाठोपाठ मुदम्मद आदिलशाहाने शिवाजी महाराजांविरुद्ध फतहखानास रवाना केले. शिवाजी महाराजांनी त्याला प्रतिकार केला. हा प्रतिकार म्हणजे आदिलशाहीविरुद्ध केलेले युद्धच असले तरी त्यांनी ते स्वतः होऊन आदिलशाहीवर केलेले आक्रमण नव्हते, आत्मरक्षणार्थ केलेले युद्ध होते. पुढे १६ मे १६४९ रोजी शाहजी महाराजांची कैदेतून सुटका झाली. पण त्या बदल्यात कोंढाणा, बंगलोर व कंदर्पी हे किल्ले आणि शिरवळ परगणा व खेडेबारे तरफ हा मुलूख आदिलशाहाच्या ताब्यात देणे शाहजी महाराजांना भाग पडले. नाखुशीने का होईना पण शिवाजी महाराजांनी वडिलांच्या सुटकेकरिता कोंढाणा किल्ला, शिरवळ परगणा आणि खेडेबारे तरफ यांच्यावरील ताबा सोडला आणि ते प्रकरण मिटले.[५७] पुरंदरचा किल्लेदार महादाजी नीलकंठराव ७ मे १६५४ च्या काही दिवस पूर्वी मृत्यू पावला आणि त्यानंतरच लवकरच शिवाजी महाराजांनी नीलकंठरावाच्या मुलांकडून पुरंदर किल्ल्याचा जबरदस्तीने ताबा घेतला. पण ती कृती हे आदिलशाहीवरील आक्रमण नव्हते, कारण पुरंदर किल्ला पुणे परगण्याच्या कऱ्हेपठार तरफेत होता आणि मुकासदार या नात्याने शाहजी महाराजांचा, आणि त्यांचे प्रतिनिधी या नात्याने शिवाजी महाराजांचा, पुरंदरवर वरिष्ठाधिकार होता.[५८] त्यामुळे, शिवाजी महाराजांनी त्या किल्ल्याचा घेतलेला ताबा हा शाहजी महाराजांच्या मुकाशातील अंतर्गत मामला होता. १६५६ च्या जानेवारीत शिवाजी महाराजांनी चंद्ररावाकडून जावळी काबीज केली. जावळीचा मुलूख काही शाहजी महाराजांच्या मुकाशांमध्ये मोडत नव्हता. त्यामुळे, शिवाजी महाराजांचे जावळीवरील आक्रमण हे आदिलशाहीवरील आक्रमण म्हणता आले असते, पण त्यात थोडी संदिग्धता होती, कारण चंद्रराव स्वतःच आदिलशाहाला जुमानत नव्हता म्हणजेच बंडखोर होता.[५९] १६५६ च्या सप्टेंबरात शिवाजी महाराजांनी सुपे परगणा संभाजी मोहित्याकडून जबरदस्तीने ताब्यात घेतला. पण त्यांची ती कृती हे आदिलशाहीवरील आक्रमण नव्हते कारण सुपे परगणा शाहजी महाराजांच्या मुकाशांमध्ये मोडत होता आणि त्यांनी आपला मेहुणा संभाजी मोहिते याला त्या परगण्याचा कारभार पाहाण्याकरिता सरहवालदार म्हणून नेमलेले होते.[६०] त्यामुळे

शिवाजी महाराजांनी संभाजी मोहित्याकडून त्या परगण्याचा जबरदस्तीने घेतलेला ताबा हा देखील शाहजी महाराजांच्या मुकाशातील अंतर्गत मामला होता. जुलै १६५७ च्या सुमारास शिवाजी महाराजांनी आदिलशाहीकडून कोंढाणा किल्ला काबीज केला आणि त्या पाठोपाठ कोकणात आक्रमण करून पूर्वीचा जो निजामशाही मुलूख आदिलशाहीच्या ताब्यात होता त्या मुलखातील, कोकणातील व घाटावरील मिळून, पंचवीसतीस किल्ले काबीज केले.[६१] शिवाजी महाराजांची १६५७–५८ मधील ही मोहीम हे त्यांनी आदिलशाहीविरुद्ध केलेले उघड उघड आक्रमण होते. म्हणून, शाहजी महाराज हे आदिलशाही वजीर असल्यामुळे, शिवाजी महाराजांनी त्यांच्या ताब्यात शाहजी महाराजांचे जे मुकासे होते त्या मुकाशांवरील शाहजी महाराजांचा अधिकारही १६५७ च्या उत्तरार्धात झुगारून दिला असे म्हणणे प्राप्त आहे. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांच्या कृत्यांचे उत्तरदायित्व नाकारणे शाहजी महाराजांना भागच होते. तसे त्यांनी केले होते आणि अली आदिलशाहानेही शिवाजी महाराजांच्या कृत्यांबद्दल शाहजी महाराजांना जबाबदार न धरण्याचे मान्य केले होते, असे त्याच्या पुढील फर्मानावरून दिसून येते.[६२]

अली आदिलशाह → शाहजी महाराज

२७ मे १६५८

‘‘महाराज फर्जंद शाहजी भोसले याने जाणावे की : शिवाजी भोसल्याचा राज्यद्रोह व उन्मतपणा यांमुळे तुझे मनात सध्या भय उत्पन्न झाले आहे की कदाचित त्याचे कसुरीचा दोष आपल्या माथी लादला जाईल. परंतु तू असे समजावे की शिवाजीचे अयोग्य आविष्कार व कार्ये आम्हास पूर्ण माहीत आहेत. म्हणून शिवाजीच्या कसुरीशी तुझा काहीही संबंध नाही. त्याची कसूर व गुन्हे यांची जिम्मा त्याजवर आहे. एतदर्शी तुझे मनास पूर्ण समाधान असू द्यावे.

तुजवर पूर्वीपेक्षाही अधिक कृपा आहे. याचे गमक म्हणून पूर्वीची सर्व जागीर तुला बहाल करतो. तीमध्ये थोडाही बदल होऊ नये. बंगलूर किल्ल्याच्या आसपासचे मनेवारांनी तुजबरोबर संबंध ठेवावे असेही फर्मावितो.[६३]

तुजविषयी कोणी कमजास्त सांगेल त्यावर आमचा गहजब होईल.''

शाहजी महाराज आणि शिवाजी महाराज यांच्यात राजकीय दृष्ट्या फारकत झाली असल्याचे अली आदिलशाहानेही मान्य केले होते असे वरील फर्मानावरून दिसून येते. फर्मान २७ मे १६५८ चे आहे, पण ही फारकत वर दाखवून दिल्याप्रमाणे जुलै १६५७ पासून झाली असली पाहिजे. अली आदिलशाहाने शाहजी महाराजांना शिवाजी महाराजांच्या कृत्यांबद्दलच्या जबाबदारीतून मुक्त केले होते म्हणजेच त्यांच्यात राजकीय दृष्ट्या फारकत असल्याचे मान्य केले होते असे दाखविणारे आणखीही पुरावे आहेत. शाहजीचा मुलगा शिवाजी हा शाहजीला जुमानत नाही असा उल्लेख गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरांनी पोर्तुगालच्या राजाला पाठविलेल्या १५ मे १६५८ (नवी पद्धत) या तारखेच्या पत्रात केला आहे.[६४] अली आदिलशाहाने १६५९ मध्ये अफजलखानास शिवाजी महाराजांविरुद्ध रवाना केले. त्या प्रसंगाचे वर्णन करताना शिवभारतात आदिलशाहाच्या तोंडी अफजलखानास उद्देशून केलेले एक भाषण घातले आहे. त्यात ''त्याचा पिता शाहजी राजा हाही त्या उद्धटास [म्हणजे शिवाजी महाराजांना] शिकविण्यास समर्थ नाही'' असे एक वाक्य आहे. (शिभा १७.२४) शिवाजी महाराजांच्या कृत्यांना शाहजी महाराज जबाबदार राहिलेले नाहीत असा अर्थ त्यातून ध्वनित होतो.

म्हणून, १६५७ चा उत्तरार्ध हा शिवचरित्रातील अत्यंत महत्त्वाचे वळण घेणारा कालखंड आहे. तेव्हापासून शिवाजी महाराजांनी शाहजी महाराजांचा त्यांच्यावरील वरिष्ठाधिकार झुगारून दिला. त्यामुळे, शाहजी महाराजांच्या पुण्याच्या परिसरातील ज्या मुकाशांचा कारभार शिवाजी महाराज करीत होते त्या मुकाशांवर शाहजी महाराजांचाच काय पण आदिलशाहीचाही काही अधिकार राहिला नाही. तत्पूर्वी त्या मुकाशांवर शाहजी महाराजांचा नाममात्र का होईना अधिकार चालत होता. त्या काळात त्या मुकाशांवर नेमलेले अधिकारी हे शाहजी महाराजांनी नेमलेले अधिकारी होते. उदाहरणार्थ : शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांची जी यादी वर दिली आहे तिच्यात तिसरे नाव बहिलीमखान असे आहे. तो १६४३ मध्ये सुपे परगण्याच्या बारामती तर्फेचा हवालदार होता. शिवाजी महाराज तेव्हा

अवघे तेरा वर्षांचे होते आणि नुकतेच बंगलोरहून पुण्याला आले होते. अर्थात बहिलीमखानाची नेमणूक त्यांनी केली असणे शक्य नाही. ती शाहजी महाराजांनी किंवा त्यांचा प्रतिनिधी असलेल्या दादाजी कोंडदेवाने केली असली पाहिजे. पहिले नाव जैनाखान पीरजादे याचे आहे. तो शाहजी महाराजांचा नोकर होता. शाहजी महाराजांनी पुणे व सुपे परगण्यांमधील इनामांविषयी त्या परगण्यांच्या कारकुनांना व देशमुखांना पाठविलेल्या निदान पाच पत्रांच्या शेवटी जैनाखान परिजादे याची परवानगी घातलेली आहे.[६५] मुकासदारांच्या पत्रांवर त्यांच्या एखाद्या अधिकाऱ्याने शेवटी परवानगी घातल्याची काही उदाहरणे आढळतात. मालक अन्यत्र असताना त्याच्या कचेरीतील एखाद्या विश्वासू अधिकाऱ्याने मालकाचे नाव प्रेषक म्हणून घालून आणि मालकाचा शिक्का उठवून जे पत्र लिहिलेले असते त्या पत्राच्या शेवटी त्या अधिकाऱ्याची परवानगी घातलेली असते असा याचा अर्थ दिसतो.[६६] शाहजी महाराजांनी सुपे परगण्याच्या देशमुखीविषयी सुपे परगण्याच्या कारकुनांना पाठविलेल्या २ एप्रिल १६५१ या तारखेच्या पत्राच्या अखेरीस ''पाा राजश्री रघुनाथ नारायेण'' असा शेरा आहे.[६७] हा रघुनाथ नारायण म्हणजे रघुनाथ नारायण हणमंते असावा. शिवाजी महाराजांनी पुणे परगण्याच्या हवेली तर्फेतील एका इनामाविषयी त्या तर्फेच्या कारकुनाना पाठविलेल्या एका पत्राच्या अखेरीस ''परवानगी हुजर राजश्री पंताजी गोपीनाथ चिटणीस'' अशी परवानगी घातलेली आहे.[६८] शाहजी महाराजांच्या पत्रांवर परवानग्या घालणारा जैनाखान पीरजादे हा त्यांच्या विश्वासातील नोकर असला पाहिजे आणि त्याची पुणे परगण्यावर सरहवालदार म्हणून नेमणूक शाहजी महाराजांनी केली असली पाहिजे, शिवाजी महाराजांनी नव्हे. त्याने पुणे परगण्याचा सरहवालदार म्हणून त्या परगण्यातील काही इनामांविषयी लिहिलेले ६ मे १६५५ या तारखेचे पत्र उपलब्ध आहे.[६९] उपलब्ध कागदपत्रांमध्ये पुणे परगण्याचा सरहवालदार म्हणून असलेला त्याचा तो शेवटचाच उल्लेख आहे; त्यानंतर त्याचा उल्लेख आढळत नाही. चौथे नाव सिद्दी अंबर (किंवा सिद्दी अंबर बगदाद) याचे आहे. त्याने पुणे परगण्याचा हवालदार म्हणून पुणे कसब्याचे हुद्देदार व मोकदम यांना त्या कसब्यातील एका इनामाविषयी लिहिलेले १

फेब्रुवारी १६५४ चे पत्र हे त्याचा उल्लेख असलेले शेवटचे पत्र आहे;[७०] त्यानंतर त्याचा उल्लेख आढळत नाही. पाचवे नाव कासिब बे याचे आहे. खेडेबाऱ्याच्या देशपांड्यांच्या करिन्यात त्याचा उल्लेख शिवापूर पेठेचा हवालदार म्हणून आला आहे.[७१] त्याचा तो एकमेव उल्लेख आहे. तिथल्या संदर्भावरून तो १६५२ च्या सुमारास त्या पेठेचा हवालदार होता असे दिसते. ती पेठ दादाजी कोंडदेवाने वसविली होती. बहुधा त्यानेच कासिब बे याची त्या पेठेचा हवालदार म्हणून नेमणूक केलेली असेल. पहिल्या गटातील पाच मुसलमानांपैकी एकट्या नूर बेगाचा उल्लेख २१ मार्च १६५७ च्या महजराच्या हाजिर मजालसीत आहे; बाकीचे चारजण कागदपत्रांमधून त्या पूर्वीच अदृश्य होतात. नूर बेग याचे पद त्या महजरात ''सरनौबत पाऊलोक'', म्हणजे पायदळाचा सरनौबत असे दिले आहे.[७२] तोच त्याचा एकमेव उल्लेख आहे. त्याचा त्यापूर्वी आणि त्यानंतर कुठेही उल्लेख नाही. त्या महजरातील उल्लेखावरून तो शिवाजी महाराजांच्या राज्यात सेनापती होता अशी काही लोकांची समजूत झालेली दिसते. ती अगदी चुकीची आहे. शिवाजी महाराजांच्या सेनानायकांमध्ये सेनापती म्हणून एक सरनौबत असे. महाराजांच्या सैन्यात अनुक्रमे तुकोजी चोर, माणकोजी दहातोंडे, नेतोजी पालकर, प्रतापराव गुजर आणि हंबीरराव मोहिते हे त्या पदावर होते. महाराजांना राज्याभिषेक झाला तेव्हा त्यांनी त्यांच्या अष्टप्रधानांच्या पदांची फार्सी नावे बदलून संस्कृत केली. तेव्हा सरनौबत या पदाचे नाव सेनापती असे केले. सेनापती असलेल्या या सरनौबताखेरीज महाराजांच्या सैन्यात पायदळाचा एक वेगळा सरनौबत असे. नूर बेग हा तसा सरनौबत होता. त्याचे नाव ज्या महजराच्या हाजिर मजालसीत आहे त्यातच त्याच्यावर माणकोजी दहातोंडे याचे नाव असून त्याचे पद सरनौबत असे दिले आहे. तोच तेव्हा महाराजांच्या सैन्याचा सरनौबत ऊर्फ सेनापती होता. नूर बेग सेनापती नव्हता. शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांपैकी पहिल्या गटातील पाचजणांचा एकमेव किंवा शेवटचा उल्लेख कधीचा आहे ते वर सांगितले आहे. त्यांच्यापैकी नूर बेग याचा उल्लेख सर्वात शेवटचा आहे. तो आहे २१ मार्च १६५७ या तारखेच्या महजराच्या हाजिर मजालसीमधील. वर दाखवून दिल्याप्रमाणे शाहजी

महाराज आणि शिवाजी महाराज यांच्यात राजकीय फारकत झाली जुलै १६५७ च्या सुमारास. त्यानंतर त्या पाचजणांपैकी एकाचाही उल्लेख शिवचरित्राशी संबंधित अशा कोणत्याही साधनात नाही आणि त्यांच्यापैकी कोणाच्याही जागी दुसऱ्या कोणा मुसलमानाची नेमणूक झाल्याचेही दिसत नाही. दुसरीही एक बाब लक्षणीय आहे. त्या पाचांपैकी नूर बेग वगळून बाकीचे चारजण मुलकी प्रशासकीय अधिकारी होते. पण त्या चारजणांनंतर शिवाजी महाराजांच्या राजवटीत एकही मुसलमान मुलकी प्रशासकीय पदावर दिसत नाही. माझे निष्कर्ष असे आहेत की ते चारजण निवृत्तीमुळे, शाहजी महाराजांनी परत बोलावून घेतल्यामुळे, मृत्यूमुळे किंवा इतर कोणत्या कारणामुळे दूर झाल्यावर शिवाजी महाराजांनी त्यांच्या जागी कोणा मुसलमानाची नेमणूक केली नाही. दुसरा निष्कर्ष असा की त्यानंतर जरी काही खास कारणांमुळे त्यांनी आपल्या सेनादलांमध्ये मोजकेच मुसलमान राहू दिले तरी मुलकी प्रशासनामध्ये मात्र त्यांनी कोणा मुसलमानाची नेमणूक केली नाही, कारण प्रामुख्याने मुलकी प्रशासकांचाच रयतेशी संबंध येतो आणि तसा संबंध त्यांना यावयास नको होता. पहिल्या गटातील पाच मुसलमान अधिकारी हे शाहजी महाराजांनी नेमलेले असल्यामुळे ते शिवाजी महाराजांच्या सेवकांमधून वगळले — महाराजांनीच त्यांना वगळलेले दिसतेच — की त्यांच्या सेवकांची आपल्याला ज्ञात असलेली संख्या उरते ४४१ हिंदू आणि ८ मुसलमान मिळून ४४९. म्हणजे त्या संख्येत मुसलमानांचे प्रमाण येते १.७८ टक्के. जर शाहजी महाराजांनी नेमलेले मुसलमान सेवक वगळले तर त्यांनी नेमलेले हिंदू सेवकही वगळले पाहिजेत असा युक्तिवाद कोण केलाच तरी तो टिकणारा नाही, कारण असे हिंदू सेवक शिवाजी महाराजांच्या सेवेत त्यांची शाहजी महाराजांशी राजकीय फारकत झाल्यावरही कायम राहिलेले दिसतात. उदाहरणार्थ, शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत २१ मार्च १६५७ रोजी झालेल्या महजराच्या हाजिर मजालसीत जे लोक आहेत त्यांत सोनाजी विश्वनाथ दबीर (डबीर), माहादाजी सामराज सुरनीस आणि बाबाजी नाईक पुंडे आहेत. ते तिघेही पुढे महाराजांच्या सेवेत होते हे वरील यादीत त्यांच्या नावांपुढे दिलेल्या आधारांवरून दिसून येते. तरीदेखील वादाकरिता असे काही हिंदू

अधिकारी वगळण्याचे ठरविले तरी त्यांची संख्या पंधरापलीकडे जात नाही. ते वगळले तर हिंदू सेवक उरतात ४२५ आणि मुसलमान सेवक उरतात ८. या ४३३ सेवकांमध्ये मुसलमानांचे प्रमाण येते १.८४ टक्के. म्हणजे मी आधी दिलेल्या १.७८ टक्के या मुसलमानांच्या प्रमाणात फक्त सहा शतांश टक्के एवढीच वाढ होते. ती दुर्लक्षणीय आहे.

काज़ी हैदर, दर्यासारंग आणि दौलतखान

मुसलमानांच्या दुसऱ्या गटात काजी हैदर, दर्यासारंग आणि दौलतखान हे तीनजण आहेत. त्यांपैकी दर्यासारंग आणि दौलतखान हे दोघे प्रथम विचारात घेतो. ते दोघेही आरमारी अधिकारी होते. निजामशाही आणि आदिलशाही सैन्यांमध्ये हिंदू पुष्कळ होते. त्यामुळे जमिनीवरील युद्धाचा अनुभव असलेले हिंदू मिळणे शिवाजी महाराजांना सहज शक्य होते. पण नाविक युद्धाचा काहीच अनुभव त्या काळातील हिंदूंना नव्हता. त्यामुळे नाविक युद्धाचा अनुभव असणारे मुसलमान अधिकारी आरमारात घेणे महाराजांना भागच होते. हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी आधुनिक काळातले भारताच्याच इतिहासातले एक उदाहरण देतो. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा ब्रिटिशांच्या राजवटीतील भारतीय भूसेनेत ब्रिगेडिअर हुद्द्यापर्यंत पोचलेले काही भारतीय अधिकारी होते. त्यामुळे स्वतंत्र भारताच्या भूसेनेकरिता पुरेसा अनुभव असलेले भारतीय अधिकारी उपलब्ध होते. नौसेना आणि वायुसेना यांची गोष्ट वेगळी होती. ब्रिटिश राजवटीतील भारतीय नौसेनेत व वायुसेनेत वरच्या हुद्द्यापर्यंत पोचलेले भारतीय अधिकारी नव्हते. त्यामुळे स्वतंत्र भारताच्या नौसेनेचे प्रमुख पद आणि वायुसेनेचेही प्रमुख पद काही वर्षे ब्रिटिश अधिकाऱ्यांना द्यावे लागले. वास्तविक कोणत्याही राष्ट्राच्या सेनेत प्रवेश मिळण्याचा मूलभूत निकष त्या राष्ट्राचे नागरिकत्व हा असला पाहिजे. पण वरील कारणामुळे स्वतंत्र भारताच्या सुरुवातीच्या काळात नौसेनेचे व वायुसेनेचे प्रमुख भारतीय नागरिक नव्हते, ब्रिटिश नागरिक होते. त्यांची यादीच त्यांच्या कारकीर्दीच्या कालखंडासह पुढे देतो.

भारतीय नौसेनेचे प्रमुख

१. Admiral Sir Edward Parry १९४८-५१.

२. Admiral Sir Charles Pizey १९५१-५५.

३. Vice-Admiral Stephen Hope Carlill १९५५-५८.

भारतीय नौसेनेचे पहिले भारतीय प्रमुख व्हाइस ॲडमिरल रामदास कटारी यांनी नौसेनेची सूत्रे १९५८ मध्ये हाती घेतली. स्वतंत्र भारताची पहिली अकरा वर्षे भारतीय नौसेनेचे प्रमुख ब्रिटिश होते.

भारतीय वायुसेनेचे प्रमुख

१. Air Marshal Sir Thomas Elmhirst १९४८-५०.

२. Air Chief Marshal Ronald Irelaw-Chapman १९५०-५१.

३. Air Marshal Sir Gerald Gibbs १९५१-५४.

भारतीय वायुसेनेचे पहिले भारतीय प्रमुख एअर मार्शल सुब्रतो मुकर्जी (Subroto Mukerjee) यांनी वायुसेनेची सूत्रे १९५४ मध्ये हाती घेतली. स्वतंत्र भारताची पहिली सात वर्षे भारतीय वायुसेनेचे प्रमुख ब्रिटिश होते.

शिवाजी महाराजांना त्यांच्या आरमारावर मुसलमान अधिकारी नेमणे का भाग होते हे यावरून अधिक स्पष्ट होईल. याच कारणामुळे महाराजांनी त्यांच्या आरमारावर दौलतखान आणि दर्यासारंग यांची नेमणूक केली असली पाहिजे. त्यापैकी दर्यासारंगाला त्याच्या मुलासह १६७८ मध्ये महाराजांच्या हुकुमावरून कैद करून त्यांची मालमत्ता जप्त करण्यात आली हे वर सांगितलेच आहे. अर्थात दर्यासारंगाचा गुन्हाही तेवढाच गंभीर असला पाहिजे. फितुरी असेल का?

दुसऱ्या गटातील काजी हैदर हा पारसनीस म्हणजे फार्सी लेखनिक होता. शिवाजी महाराजांच्या काळातील आदिलशाही, कुत्बशाही आणि मुघल या राज्यांची सरकारी भाषा फार्सी होती. त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यासाठी, त्यांच्यातील जे उमराव आपल्याला फितूर झाले असतील त्यांच्याशी संपर्क ठेवण्यासाठी, शत्रूचा जो पत्रव्यवहार आपल्या हाती लागेल तो वाचून त्यातील माहिती मिळविण्यासाठी, फार्सी जाणणाऱ्या मुनष्याची महाराजांना आवश्यकता होती. त्यांच्याकडे काजी हैदर आणि नील प्रभू असे दोन पारसनीस होते. नील

प्रभूचा मुलगा गोविंद प्रभू याने दुर्ज उल–गवाहिर (रत्नांचा करंडा) या नावाचा फार्सी पत्रांच्या मसुद्यांचा एक संग्रह संकलित केला आहे. त्याच्या प्रास्ताविकात गोविंद प्रभूने आपला पिता ''नील प्रभू मुन्शी वलद एसाजी प्रभू'' आणि आपला भाऊ छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारात मुन्शी म्हणून नोकरी करीत होते असे नमूद केले आहे.[७३] दरबारी शैलीत फार्सी पत्रव्यवहार करणे हे कौशल्याचे काम आहे आणि नील प्रभू हा ते काम करणारा त्या घराण्यातील पहिला मनुष्य असावा. त्यामुळे फार्सी पत्रव्यवहाराच्या कामासाठी शिवाजी महाराजांना एखाद्या अधिक अनुभवी मनुष्याची गरज असावी आणि म्हणून त्यांनी काजी हैदर याला आपल्या नोकरीत घेतले असावे. दौलतखान आणि दर्यासारंग यांच्याप्रमाणेच काजी हैदर हा विशेष कौशल्याच्या कामाकरिता महाराजांच्या नोकरीत होता. अशा विशेष कौशल्याच्या कामाकरिता मनुष्य हवा असेल तर त्याचे केवळ राष्ट्रीयत्व पाहून चालत नाही, त्याची क्षमता पहाणे महत्त्वाचे असते. दर्यासारंग, दौलतखान आणि काजी हैदर हे दुसऱ्या गटातील तिघेही मुसलमान सेवक महाराजांच्या पदरी अशी विशेष कौशल्याची कामे करत होते. मुसलमान सेवकांच्या पहिल्या गटातील पाचजणांप्रमाणेच दुसऱ्या गटातील तीनजण वगळले तर महाराजांच्या सेवकांची आपल्याला ज्ञात असलेली संख्या उरते ४४१ हिंदू आणि ५ मुसलमान मिळून ४४६. त्या संख्येत मुसलमानांचे प्रमाण आहे १.१२टक्के किंवा गोळाबेरजेने सांगायचे तर एक टक्का.

शत्रूंकडून फुटून आलेले सरदार

मुसलमानांच्या तिसऱ्या गटात दोनचजण आहेत : सिद्दी हिलाल आणि नूरखान. सिद्दी हिलाल आदिलशाहीतून, आणि नूरखान मुघलांकडून, शिवाजी महाराजांकडे आला होता. शत्रूकडून जे अधिकारी काही ना काही असंतोषामुळे आपल्याकडे येतील त्यांना आश्रय देणे हा सर्वसामान्य राजनीतीचा भाग आहे. अशा अधिकाऱ्यांकडून शत्रूविषयी महत्त्वाची माहिती मिळू शकते आणि शत्रूकडील इतर अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा मार्ग उपलब्ध होतो. त्यातून सिद्दी हिलाल हा तर शाहजी महाराजांचा चुलत भाऊ खेळोजी भोसले याचा क्रीतपुत्र होता, म्हणजे

खेळोजीने त्याला विकत घेऊन स्वतःच्या मुलाप्रमाणे वाढवले होते. राजनीतीचा भाग म्हणून शिवाजी महाराजांनी ज्यांना आपल्याकडे ठेवून घेतले असले पाहिजे ते दोघेजण पहिल्या दोन गटांमधील आठजणांप्रमाणे वगळले तर महाराजांच्या सेवकांची आपल्याला ज्ञात असलेली संख्या उरते ४४१ हिंदू आणि ३ मुसलमान मिळून ४४४. त्या संख्येत मुसलमानांचे प्रमाण आहे ०.६८ टक्के.

इतर मुसलमान सेवक

चौथ्या गटातील शामाखान आणि इब्राहीम किंवा इब्राहीमखान या दोन मुसलमानांपेकी शामाखान याच्याविषयी त्याचा सभासद बखरीत उल्लेख आहे यापलीकडे काहीच माहिती उपलब्ध नाही. इब्राहीम हा मात्र महाराजांच्या अत्यंत विश्वासू सेवकांपैकी एक असला पाहिजे. अर्थात तो त्याच्या स्वतःच्या धर्माशी एकनिष्ठ नव्हता. काफिरांशी मैत्री करू नका आणि त्यांच्याविरूद्ध जिहाद करा असे कुराणात सांगितले आहे. उदाहरणार्थ,

सूरा ४, आयत क्र. १४४ : ''श्रद्धावंतांनो [म्हणजे मुसलमानांनो] मूमिनांना [म्हणजे मुसलमानांना] सोडून काफिरांना आपले मित्र करू नका. काय तुम्ही अल्लासमोर स्वतःविरुद्ध स्पष्ट पुरावा देऊ इच्छिता का?''

अफजलखानाविरुद्ध शिवाजी महाराजांच्या अंगरक्षकांमध्ये असलेला इब्राहीम इस्लामशी उघड उघड द्रोह करीत होता. महाराज मुसलमान नव्हते, म्हणजेच ते इस्लामच्या दृष्टीने काफिर होते. इतकेच नव्हे तर ते ख्रिश्चन किंवा ज्यू नव्हते म्हणजे ज्यांना ईश्वरी ग्रंथ लाभला आहे अशा समाजांपैकी नव्हते. इस्लामच्या दृष्टीने सर्वात तिरस्करणीय लोक म्हणजे मूर्तिपूजक आणि अनेकेश्वरवादी. महाराज मूर्तिपूजक होते आणि इस्लामच्या दृष्टीने अनेकेश्वरवादीही होते. तेव्हा त्यांच्याविरुद्ध जिहाद करणे हे सच्च्या मुसलमानाचे कर्तव्य होते. कुराणातील पुढील आयत पहा :

सूरा ९, आयत क्र. ७३ : ''हे नबी! काफिरांविरुद्ध आणि मुनाफिकांविरुद्ध जिहाद करा आणि त्यांच्याशी कठोरपणे वागा. त्यांचे स्थान नरक हे आहे आणि ते फार वाईट ठिकाण आहे.''

जो आपण मुसलमान आहोत असे वरकरणी भासवतो पण प्रत्यक्षात इस्लामशी प्रामाणिक नसतो त्याला इस्लामच्या परिभाषेत मुनाफिक (दांभिक, ढोंगी) म्हणतात. अफजलखानवधाच्या प्रसंगी महाराजांच्या अंगरक्षकांमध्ये असलेला इब्राहीम हा इस्लामशी द्रोह करत होता म्हणजे मुनाफिकच होता. म्हणून मला वाटते, सिद्दी हिलालप्रमाणे त्याच्यावरही हिंदू संस्कार झालेले असावेत आणि हिंदू धर्माचा पगडाही असावा. तेराव्या क्रमांकावरील अली वलद् बुऱ्हान याच्याविषयी तो शिवाजी महाराजांकडून फुटून मुघलांना मिळाला होता यापेक्षा अधिक काहीच माहिती नाही.

सारांश, महाराजांच्या सेवेत मुसलमानांचे प्रमाण अत्यंत कमी होते. कशीही मोजणी केली तरी ते २.८६ टक्क्यांपेक्षा अधिक भरत नाही. शाहजी महाराजांनी नेमलेले पण शिवाजी महाराजांनी नोकरीत न ठेवलेले मुसलमान त्यांतून वगळले तर ते प्रमाण घसरून १.७८ टक्क्यांवर येते. जे मुसलमान काही कौशल्यांच्या हिंदूमधील उणिवा भरून काढण्याकरिता महाराजांना सेवेत घेणे भाग होते तेही त्यांतून वगळले तर ते प्रमाण १.१२ टक्क्यावर येते आणि शत्रूकडून काही ना काही असंतोषामुळे महाराजांच्या आश्रयाला आलेले मुसलमानही वगळले तर ते प्रमाण पाऊण टक्क्याच्याही खाली जाते.

मदारी मेहतराची गोष्ट

मदारी मेहतर याची सांगितली जाणारी गोष्ट काल्पनिक आहे असे मी वर म्हटले आहे. तिचे परीक्षण पुढे करतो. ही गोष्ट प्रथम भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिक, वर्ष ४, अंक १ ते ४ (एकत्र) मधील श्री. आबा चांदोरकर यांच्या 'श्री शिवाजीमहाराज व मदारी मेहेतर' या लेखात (पृ. ३४ ते४०) प्रकाशित झाली. त्यांना सातारा येथील राजोपाध्ये घराण्याच्या कागदपत्रांमध्ये पोर्तुगिजी कागदाच्या चार बंदांवर (म्हणजे तावांवर) लिहिलेले एक 'पत्र' सापडले असे प्रारंभी नमूद करून व थोडे प्रास्ताविक करून पुढे त्यांनी ते पत्र उद्‌धृत केले आहे (पृ. ३७ ते ३९). त्या पत्रातील हकिगत तिच्यातील महत्त्वाचा भाग शब्दशः उद्‌धृत करून पुढे देतो.

''सेवेसी विज्ञापना ल्याहावया कार(ण) यैस जेः प्रथमचे पादशाईपासून चालत अले विज्यापूरच्या पातशाचे वजीर शाहाजीराजे हे विज्यापुरात पातशाहसंनिध होते आणि सिवाजीराजे हे रायेगडास होते तेव्हा दिल्ली हस्तनापूरच्या पातशहान देशमुखी सिवाजी महाराजास देतो मणऊन आपले तरफेने सवाई जैसिंग राजे व मिराजीराजे जैनगरवाले व दलेलखान या त्रिवर्गास पातशाहानी महाराजाकडे रवाना केले. तेव्हा तिघे उमराव सिवाजीराजे याजपासी येऊन हकीकत जाहीर केली कीः 'तुम्हावर मेहेरबान होऊन तुम्हास देशमुखी द्यावी यैसा निश्चय केला आणि आम्हास साहेबाकडे रवाना केले. त्यास आपण अले पाहिजे.' ते समई महाराजांनी खुशाली मानून तिघा उमराव याजबराबर दिलीस गेले. पातशाची भेट घेतली. पातशाहानी माहाराजाचा बहुत सन्मान केला. तो काही दिवस विसरा पाडून ++++ माहाराजास अटकेत ठेविले.''

त्यानंतर महाराजांनी बादशाहाच्या परवानगीने मिठाईच्या डाल्या [म्हणजे टोपल्या] उमरावांना पाठविण्यास सुरुवात केली. असे सहा महिने गेले. सुरुवातीला चौकीदार झडत्या घेत पण मग हिरोजी फर्जंद याने पहारेकऱ्यांच्या दारोग्यास इतबार [म्हणजे विश्वास, भरवसा] देऊन ती पद्धत बंद पाडली.

''तेव्हा हिरोजीस महाराजांनी बोलाविले आणि विचारले की, 'ये समई संकट पडले आहे, तर माजे जिवाचे सारथी कोण कोण आहेत?' तेव्हा हिरोजी फरजंद बोलिला की, 'साहेब जे समई आज्ञा करतील ते समई हिरोजी फरजंद व मदारी मेहेतर फरास हाजर होऊ, हुकूम करावा.' यैसे म्हणताच हिरोजी फरजंदास आपला अंगचा पोशाख दिल्हा तेव्हां सर्व गोस्टीचा प्रकार महाराजांनी हिरोजीस निरऊन सांगित(त)ला जे, 'आम(चे) स्वरूप होत तेणेप्रमाणे तुम्ही रूप पालटून आमचे पलंगावर निजणे' आणि मदारी मेहेतर यास सांगितले की, 'हा मनसुभा तीं सिवाये [म्हणजे तिघांशिवाय] फूट पडू न देणे.' यैसे बोलून दोघांपासून महाराजांनी क्रिया [म्हणजे शपथ] घेतली.''

त्यानंतर महराज एका डालीत बसून निघून गेले. पुढे बादशाहाने दारोग्यास विचारले की, महाराज काय करतात? ''तेव्हा मदारी मेहेतर बोलिला की,

राजयाच्या जिवास समाधान वाटत नाही.'' त्यावर बादशाहाने मोठे उमराव महाराजांच्या समाचारास पाठविले. तेव्हा महाराजांच्या जागी हिरोजी झोपला असल्याचे उघडकीस आले.

''तेव्हा हिरोजीस पाछायाजवल नेले. तेव्हा पाछाया पुसो लागला की 'महाराज काये जाले?' तेव्हा हिरोजी म्हणू लागला की ''साहा महिने जाले, माहाराज आपले देशास गेले.''

त्यावर बादशाहाने संतापून ''हिरोजीची गरदन मारा'' असा हुकूम केला. त्यावर हिरोजी म्हणाला, ''हजरतांनी सुखरूप सिरछेद करावा, ही जीव महराजावरून सतका केला [म्हणजे ओवाळून टाकला].'' तेव्हा बादशाह खूश होऊन म्हणाला 'इनामी चाकर आहेस... . काये मागतोस ते मागणे.' ''तेव्हा हिरोजीने सांगितले की मदारी मेहेतर व मजला यैसे दोघांस जीव माफ करून [जाण्याची] आज्ञा द्यावी.'' त्यावर बादशाहाने त्यांना जाण्याची अनुज्ञा दिली.

''तेव्हा समस्त निघोन रायेगडास आले. माहाराजांस मुजरे केले. ते समई माहाराजे मेहेरबान जाले. सिरपाव देऊन हिरोजीस अवघे किल्याच्या इमारतीचा हावाला दिला व मदारी मेहेतर यास पोशाख व सोन्याच्या कड्यासुधा इनाम दिल्हा. ते समई तख्ताची पूजा, भरजरी बादली चादर व मोहरा ५ पाच व ताडपत्री पासोडी १ यैसे कानू करून मेहेरबान होऊन बकसीस केले.''

पुढे संभाजी महाराजांबरोबर मदारी मेहेतर याचा मुलगा ''सादुला मेहेतर फरास'' हा होता. संभाजी महाराजांचे सावत्रभाऊ राजारामसाहेब यांनी ''चंदीचे व पनाल्याचे राज्य केले'' तेव्हा सादुला मेहेतर याचा चुलतभाऊ ''आमदखान मेहेतर फरास'' त्यांच्याबरोबर गेला. संभाजी महाराजांना औरंगजेब बादशाहाने धरून नेले तेव्हा ''सादुला मेहेतर सांगाते नौकरीस गेले होते. तेथून संभाजी महाराजांस देवाज्ञा जाली.'' शाहू महाराज बादशाहाच्या कैदेत असताना जमण मेहेतर त्यांची सेवा करीत होता.

''पुढे [शाहू] महाराज येऊन तख्तावर बैसले ते समई महाराजांनी मेहेरबान होऊन जमण मेहेतर यास तक्ताची पूजा व इनाम इक्राम दिल्हे... . त्याजमागे

आईसाहेब व रामराजे याणी राज्य केले. त्याजपासी महमदखान फरास होते. आजपर्यंत सुदामत चालत आले असे श्रृत होय हे विज्ञापना.''

श्री. आबा चांदोरकर यांनी त्यांच्या लेखात उद्धृत केलेले पत्र वरीलप्रमाणे आहे. ते कोणी व कोणाला लिहिले आहे हे त्यात नमूद केलेले नाही. पण ते महमदखान फरास याच्या मुलाने धाकट्या शाहू महाराजांना लिहिले असावे असा अंदाज श्री. चांदोरकर यांनी लेखात व्यक्त केला आहे. ''मदारीचा वंशज १०/१२ वर्षांपूर्वी साताऱ्यास महाराजांच्या वाड्यास फरासच होता असे समजले, हल्ली तो माणदेशात कोठेसा गेला आहे'' असेही श्री. चांदोरकर यांनी म्हटले आहे, पण त्या वंशजाचे नाव त्यांनी दिलेले नाही आणि ती माहिती त्यांना कोणाकडून मिळाली तेही सांगितलेले नाही. लेखाच्या शेवटी ते म्हणतात :

''वर दिलेले पत्र अस्सल नाही; परंतु बनावटही असण्यास काही कारण दिसत नाही. तरी पण खऱ्याखोट्याचा निर्णय (आणीक दुसऱ्या पुराव्याच्या साह्याने) होण्यासाठी आज हे प्रसिद्ध करीत आहे.''

श्री. आबा चांदोरकर यांनी ज्याला पत्र म्हटले आहे त्याचा प्रारंभ व शेवट पत्राप्रमाणे केला असला तरी ते तथाकथित पत्र कोणाला अनुलक्षून कोणी लिहिले आहे ते त्यात कुठेच सांगितले नसल्याने मी त्याला निवेदन म्हणतो. पण ते पत्र आहे असे जरी कोणी मानले तरी मी पुढे केलेल्या त्याच्या परीक्षणात काही फरक पडणार नाही.

मदारी मेहतराच्या गोष्टीचे परीक्षण

या निवेदनात सहज लक्षात येण्याजोग्या अनेक चुका आहेत. वास्तविक महाराज औरंगजेबाला भेटायला आग्ऱ्याला गेले होते, पण ते दिल्लीला गेले होते असे या निवेदनात म्हटले आहे. पण मी ती इथे फार मोठी चूक मानत नाही. औरंगजेबाची राजधानी दिल्ली असल्यामुळे तशी चूक होणे शक्य आहे. सभासद बखरीतही (पृ.४३) ती चूक झाली आहे. पण निवेदनातील इतर चुका व त्रुटी फार मोठ्या आहेत, क्षुल्लक नाहीत.

शाहजीराजे विजापुरात बादशाहाजवळ असताना आणि शिवाजी महाराज

रायगड येथे असताना दिल्लीच्या बादशाहाने महाराजांना देशमुखी देतो असे सांगण्याकरिता सवाई जयसिंग, मिर्झा राजे जयनगरवाले आणि दलेलखान (दिलेरखान) यांना महाराजांकडे पाठविले अशी दिव्य माहिती निवेदनाच्या पहिल्याच वाक्यात सांगितली आहे! या वाक्यात एवढ्या चुका आहेत की दोनचार शब्द बदलून ते वाक्य दुरुस्त करता येणार नाही, संपूर्ण इमारतच पाडावी लागेल. शिवाजी महाराज आग्र्याला गेले १६६६ मध्ये; शाहजीराजे तेव्हा विजापुरात नव्हते, ते १६६४ मध्ये निधन पावले होते. महाराज आग्र्याला गेले तेव्हा त्यांची राजधानी राजगड येथे होती, रायगड येथे नव्हती. दिल्लीच्या बादशाहाने महाराजांना देशमुखी देतो असे सांगण्यासाठी कोणालाही पाठवले नव्हते. सवाई जयसिंग हा मिर्झा राजा जयसिंगाचा पणतू होता. त्याचा जन्म १६८८ मध्ये झाला. मिर्झा राजा जयसिंग हा जयनगरवाला नव्हता; जयनगर ऊर्फ जयपूर तेव्हा अस्तित्वातच नव्हते. त्या नगराची स्थापना सवाई जयसिंगाने केली. मिर्झा राजा जयसिंग आणि दिलेरखान महाराजांवर स्वारी करायला दक्षिणेत आले होते, महाराजांना बादशाहाचा निरोप सांगायला आले नव्हते. महाराज आग्र्याला गेले तेव्हा त्यांच्याबरोबर संभाजीराजेही होते या गोष्टीचा वरील निवेदनात उल्लेखच नाही. बादशाहाने महाराजांना अटकेत का ठेवले ते निवेदनात सांगितलेले नाही. महाराज सहा महिने मिठाईच्या डाल्या उमरावांना पाठवीत होते असे निवेदनात सांगितले आहे. महाराज आग्र्याला मुलुकचंदाच्या सराईत ११ मे १६६६ रोजी पोहोचले आणि आग्र्याहून १७ ऑगस्ट १६६६ रोजी निसटले. म्हणजे आग्र्याला ते तीन महिने सहा दिवस होते. महाराज निसटून गेल्याचे बादशाहाला समजल्यावर हिरोजीला बादशाहाकडे नेण्यात आले. तेव्हा महाराज निघून गेल्याला सहा महिने झाल्याचे हिरोजीने बादशाहाला सांगितले असे निवेदनात म्हटले आहे. प्रत्यक्षात महाराज कैदेतून निसटून गेल्याचे बादशाहाला दुसऱ्याच दिवशी म्हणजे १८ ऑगस्ट १६६६ रोजी समजले. हिरोजीला बादशाहाकडे नेण्यात आले नव्हते; महाराज निसटून गेल्याचे बादशाहाला समजण्यापूर्वीच हिरोजीही गायब झाला होता. ‘‘संभाजी महाराजांस अवरंगजीब पातशहांनी धरून नेले ते समई सादुला मेहेतर

सांगाते नौकरीत गेले होते, तेथून संभाजी महाराजांस देवाज्ञा जाली'' असे निवेदक सांगतो. हा सादुल्ला मेहेतर मदारी मेहेतराचा लेक होता असे त्याने तत्पूर्वी सांगितले आहे. संभाजी महाराजांना कैद केले तेव्हा कैदेत त्यांची सेवा करण्याकरिता या सादुल्लाला औरंगजेबाने संभाजी महाराजांबरोबर राहू दिले होते असे निवेदकाचे म्हणणे आहे. ''संभाजी महाराजांस देवाज्ञा जाली'' असे तो म्हणतो! जणू काही संभाजी महाराज अंथरुणात पडून निधन पावले!

असे हे इथून तिथून चुकांनी भरलेले निवेदन आहे. मदारी मेहेतर या खऱ्या किंवा काल्पनिक व्यक्तीचा फक्त या निवेदनात उल्लेख आहे, अन्यत्र कुठेही नाही. तरीही अशा या भाकडकथेच्या बळावर मदारी मेहेतर शिवचरित्रात घुसून ठाण मांडून बसला आहे. त्यातून महाराजांना तथाकथित 'सर्वधर्मसमभाव' आणि एका मुलाची — नुसत्या मुलाची नव्हे, मुसलमान मुलाची — महाराजांवरील निष्ठा, अशा एक सोडून दोन हृद्य बाबी या भाकडकथेत गुंफलेल्या आहेत. त्यामुळे हिंदी चित्रपटाच्या पटकथालेखकालाही कदाचित सुचणार नाही इतका हा हृदयंगम प्रसंग शिवचरित्रातून काढून टाकणे कोणाला अवघड वाटले तर त्यात काही आश्चर्य नाही. पण शिवचरित्र ही अशा भाकडकथांची गोधडी बनावयास नको असेल तर त्या काढून टाकणे आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे एखादे पत्र बनावट असल्याचे समजले तरी ते कोणी तयार केले आणि ते करण्यामागील हेतू काय होता ते समजतेच असे नाही त्याप्रमाणेच अशा खोट्या आणि काल्पनिक कथाही कोणी तयार केल्या आणि त्या करण्यामागील हेतू काय होता ते समजतेच असे नाही. पण ही कथा कोणत्या हेतूने तयार केली गेली असावी याची एक खूण त्या कथेत राहून गेली आहे. ती खूण आणि तिच्यावरून मी केलेला अंदाज पुढे सांगतो.

शिवाजी महाराज आग्र्याहून पेटाऱ्यात बसून निसटले तेव्हा हिरोजी फर्जंद त्यांच्या जागी पलंगावर पांघरूण घेऊन निजला, एक पोरगा त्याचे पाय रगडत बसला आणि दुसऱ्या दिवशी हिरोजीही महाराजांचे डोके दुखत आहे, म्हणून मी औषध घेऊन येतो, असे चौकीदारांना सांगून त्या पोरग्याला बरोबर घेऊन निघून

गेला, अशा आशयाची हकिगत सभासद बखरीत व एक्याण्णव कलमी बखरीच्या काही प्रतींमध्ये आहे.[७४] पोरग्याचे नाव कुठेच सांगितलेले नाही. चिटणीस बखरीतील हकिगतीत 'पोरगा' नाही; महाराजांच्या सांगण्यानुसार हिरोजी फर्जंद पलंगावर त्यांच्या जागी रजईची वळकटी करून ठेवून तिच्यावर बुक्क्या मारीत बसला आणि जरा वेळाने तोही तिथून निघून गेला असे त्या हकिगतीत सांगितले आहे.[७५] एक्याण्णव कलमी बखरीच्या काही प्रतींमध्ये हिरोजी फर्जंद आहे, पण पाय चेपणारा पोर नाही.[७६] सारांश, हिरोजी फर्जंद तिन्ही बखरींमध्ये आहे, पाय चेपणारा पोरगा मात्र सभासद बखरीत व एक्याण्णव कलमी बखरीच्या काही प्रतींमध्ये आहे, पण चिटणीस बखरीत व एक्याण्णव कलमीच्या काही प्रतींमध्ये नाही. आग्रा प्रकरणात मदारी मेहतराचे नाव घुसडून देणारे जे एकमेव निवेदन आहे ते लिहिण्याऱ्याला हिरोजी फर्जंद त्या प्रकरणात होता हे बखरींवरून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या ठाऊक होते, पाय चेपणारा पोरगाही त्या प्रकरणात होता हे मात्र त्याला ठाऊक नसावे असे दिसते कारण मदारी मेहतराला त्याने त्याच्या निवेदनात पाय चेपण्याची भूमिका दिलेली नाही. पण सभासद बखरीतला पाय चेपणारा मुलगा म्हणजेच त्या निवेदनातला (किंवा पत्रातला) मुलगा असा तर्क श्री. आबा चांदोरकर यांनी त्यांच्या लेखात केला आहे. ते लिहितात :

''... या पत्रातील हकीकतीवरून व सभासदाच्या म्हणण्यावरून असे वाटते की, जो पोर हिरोजीचे पाय चेपण्यास बसविला होता ताच हा मदारी मेहेतर असावा. कारण, सभासद त्या रात्री दिवाणखान्यात हिरोजी व पोर अशी दोनच माणसे असल्याचे सांगतो. येथेही पत्रात, त्या वेळी हिरोजी व मदारी दोघेच होते असे म्हटले आहे. दुसरे, पहारेकरी त्या पोराला प्रकृतीबद्दल विचारीत, तेव्हा तो सांगे की शिर दुखते. पत्रातही पहारेकरी मदारीलाच विचारीत व मदारीही समाधान वाटत नाही असेच सांगे. याप्रमाणे दोन्ही हकीकतींत जे साम्य आढळते ते हे असे आहे. आता यात एक शंका घेण्यास जागा आहे ती म्हणजे, सभासद पोराचे नाव मदारी असे देत नाही व पत्र मदारी हा हिरोजीचे पाय रगडत होता असे म्हणत नाही. एवढे सोडल्यास बाकी मजकूर हे दोघे एकच असावेत हे ठरविते.''[७७]

मी म्हणतो ती खूण हिरोजी फर्जंदाचा उल्लेख ही नाही, ती पुढे आहे. हिरोजी व मदारी रायगडाला आल्यावर शिवाजी महाराजांनी त्यांना काय बक्षिसे दिली ते सांगताना ''हिरोजीस अवघे किल्ल्याच्या इमारतीचा हावाला दिला'' असे निवेदनात म्हटले आहे. हीच ती खूण होय. एक ''हिरोजी'' रायगडावरील इमारतींचा सुभेदार होता हे खरेच आहे. मात्र तो ''हिरोजी'' म्हणजे हिरोजी फर्जंद नव्हता, हिरोजी इंदलकर होता. त्याचे नाव असलेले एक मराठी व एक संस्कृत असे दोन शिलालेख रायगडवर आहेत. मराठी शिलालेख जगदीश्वराच्या मंदिराच्या पायरीला लावलेला असून ''सेवेचे ठाई तत्पर। हिरोजी इंदळकर'' एवढाच मजकूर त्यात आहे.[७८] संस्कृत शिलालेख त्या मंदिराभोवतीच्या भिंतीवर असून तो श्लोकबद्ध आहे.[७९] जगदीश्वराचा प्रासाद हिराजी याने बांधला असा त्या श्लोकाचा मतलब आहे. श्लोकात हिरोजीला हिराजी म्हटले आहे. जगदीश्वराचा प्रासाद म्हणजे जगदीश्वराचे मंदिर. ते हिरोजी इंदलकर याने, अर्थात महाराजांच्या हुकुमावरून, बांधले हे या शिलालेखांवरून स्पष्टच आहे. रायगड किल्ला फार जुना आहे. त्यावरील सर्वच बांधकामे शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत झाली असतील असे नाही. पण जी कामे त्यांच्या कारकीर्दीत झाली असतील ती हिरोजी इंदलकर याच्या देखरेखीखाली झाली असली पाहिजेत कारण, वर सांगितल्याप्रमाणे तो रायगडावरील इमारतींचा म्हणजे बांधकामांचा सुभेदार होता. ती कामे त्याच्या देखरेखीखाली झाली ही गोष्ट वरील दोन शिलालेखांमुळे आणि परंपरेने चालत आलेल्या तोंडी माहितीमुळे रायगडावरील लोकांना ठाऊक असली पाहिजे. वरील पत्राच्या किंवा निवेदनाच्या लेखकाने हिरोजी इंदलकर आणि हिरोजी फर्जंद यांच्या गल्लत करून ''हिरोजीस [म्हणजे हिरोजी फर्जंद यास] अवघे किल्ल्याच्या [म्हणजे रायगडाच्या] इमारतीचा हावाला [म्हणजे हवाला, जबाबदारी]'' त्याच्या निवेदनात महाराजांकरवी बहाल केला आहे. ज्या निवेदकाला मिर्झा राजा जयसिंग म्हणजे सवाई जयसिंग नव्हे ही सामान्य माहिती देखील नाही, ज्याचे शिवचरित्राचे दारुण अज्ञान त्याच्या निवेदनाच्या पहिल्याच वाक्यात उघड झाले आहे, त्याला रायगडावरील बांधकामाची जबाबदारी कोणत्या

का होईला हिरोजीकडे होती ही शिवचरित्रातील तुलनेने सूक्ष्म माहिती कशी काय समजली असेल? मला वाटते, तो रायगडावर काही काळ तरी राहात असावा आणि त्यामुळे त्याला ती माहिती असावी किंवा रायगडावर राहाणाऱ्या किंवा राहिलेल्या कोणा व्यक्तीशी त्याचा निकटचा संबंध असावा आणि त्या व्यक्तीकडून त्याला ही माहिती मिळाली असावी. त्याचा रायगडाशी असलेला हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध (Raygad connection) त्याने केलेल्या निवेदनामागील त्याच्या हेतूविषयी अंदाज करण्यास फार उपयोगी आहे. हिरोजी आणि मदारी यांना औरंगजेबाने जाण्याची परवानगी दिल्यावर ते रायगडावर आले असे निवेदक सांगतो तेही हिरोजीला रायगडावरील इमारतींचा हवाला निवेदनात द्यायचा होता म्हणून. पुनरागमन रायगडला करायचे असे ठरल्यावर प्रस्थानही रायगडहून ठेवणे क्रमप्राप्तच होते.

रायगडावर दोन कबरी आहेत. नाणे दरवाजाच्या आत तिथून तीनशे फूट वर जी कबर आहे तिला म्हणतात मदनशहाची कबर आणि महादरवाजाच्या आत सुमारे पाऊण मैल चढण चढून गेल्यावर जी कबर लागते तिला म्हणतात मदारशहाची कबर.[८०] निवेदकाने हिरोजीबरोबर असलेल्या पोरग्याचे नाव मदारी मेहेतर असे दिले आहे तो काही केवळ योगायोग असेल असे नाही. ते नाव त्याला या मदारशहाच्या कबरीवरून सुचले असले पाहिजे. इथेही त्याचा रायगडाशी असलेला संबंध दिसून येतो. मदनशहा आणि मदारशहा हे काणेत्या काळात होऊन गेले ते ज्ञात नाही. रायगड पूर्वी निजामशहाच्या ताब्यात होता. पुढे तो चंद्ररावाने ताब्यात घेला आणि त्याच्याकडून शिवाजी महाराजांनी काबीज केला. मदनशहा आणि मदारशहा यांच्या कबरी निजामशहाच्या काळातील असाव्यात. उत्तर पेशवाईत मदारशहाच्या कबरीचा दर्गा झालेला होता, त्याचा उरूस (उत्सव) चालू होता आणि त्या उरुसाकरिता पेशवे सरकारकडून अनुदानही मिळत होते.[८१] नुसत्या कबरीभोवती इमारत बांधली आणि तिथे उरूस चालू केला की तिचा दर्गा होतो. मदारशाह कदाचित सूफी धर्मोपदेशक असेल आणि त्याच्या मृत्यूनंतर लगेच त्याचा दर्गा तयार झाला असेल किंवा कदाचित कबरीचे नंतर केव्हातरी दर्ग्यात रूपांतर झाले

असेल. निवेदक कदाचित खरोखरच मदारशहाचा वंशज असेल किंवा कदाचित त्याने त्याला कल्पनेने आपला पूर्वज ठरविला असेल. मदारी मेहेतर नावाचा आपला पूर्वज छत्रपती शिवाजी महाराजांचा एकनिष्ठ सेवक होता आणि त्याच्या पुढील पिढ्याही छत्रपतींची सेवा करीत आल्या होत्या असे दाखूवन छत्रपतींकडून काही इनाम मिळवावे अशा हेतूने हे निवेदन तयार करण्यात आले आहे असा माझा अंदाज आहे. तो बरोबर असो अथवा नसो, निवेदन खोटे किंवा काल्पनिकच आहे; ते खरे मानावे असे कोणतेही चिन्ह त्यात नाही. हे निवेदन मदारी मेहतर याचा पणतू महमदखान याच्या मुलाने धाकट्या शाहू छत्रपतींच्या कारकीर्दीत लिहिले असावे असा अंदाज श्री. आबा चांदोरकर यांनी त्यांच्या लेखात व्यक्त केला आहे.[८२] धाकट्या शाहू छत्रपतींची कारकीर्द १७७७ पासून १८०८ पर्यंत झाली. हे निवेदन त्या काळात लिहिले गेले असणे शक्य आहे.

श्री. आबा चांदोरकर यांचा वरील लेख प्रकाशित झाला तेव्हा, म्हणजे एप्रिल १९२४ नंतर, मदारी मेहतर हे नाव प्रथम उजेडात आले. तत्पूर्वी ते नाव कोणत्याही साधनात आलेले नव्हते आणि रायगडावरील मदारशहाची कबर ही कोणा मदारी मेहेतराची किंवा शिवाजी महाराजांच्या कोणा सेवकाची कबर आहे असेही विधान कोणी केलेले नव्हते. रायगडावरील मदारशहाची कबर ही मदारी मेहतर याची कबर आहे असे श्री. आबा चांदोरकर यांनीही म्हटलेले नाही; ती कोणा मदारी मेहतराची कबर आहे असे म्हणण्यास काही पुरावाही नाही. पण एकदा मदारी मेहतर हे व्यक्तिमत्त्व उदयाला आल्यावर रायगडावरील मदारशहाची कबर ही त्या मदारी मेहतराचीच कबर असावी असे वाटू लागण्यास फार मोठ्या कल्पनाशक्तीची आवश्यकता नव्हती. इतके सर्व छान जुळून आल्यावर 'असावी' चे 'आहे' होण्यास किती उशीर लागणार? तसे ते झालेही आहे. रायगडची जीवनकथा या पुस्तकात या कबरीबद्दल किंवा दर्ग्याबद्दल पुढील विधान केले आहे : ''शिवाजीच्या शय्यागारावरील सेवक फरास मदारशहा, ज्याने आगऱ्यास शिवाजीचे प्राण वाचविले त्याचा हा दर्गा होय.''[८३] मदारीचा इथे मदारशहा झाला आहे आणि शिवाजी महाराजांचे प्राण वाचविल्याचे श्रेयही त्याला बहाल करण्यात

आले आहे!

आता तयार झालेला इतिहास असा आहे : 'रायगडावरील मदारशहाचा दर्गा हा शिवाजी महाराजांबरोबर जो आग्ऱ्याला होता त्या मदारी मेहतराचा दर्गा आहे.' कोणी विचारेल : याला आधार काय? उत्तर मिळेल : 'आबा चांदोरकरांच्या लेखात उद्धृत केलेले पत्र.' पुन्हा कोणी विचारेल : त्या तथाकथित पत्रातील माहिती खरी आहे याला आधार काय? उत्तर मिळेल : 'राजगडावरील मदारशहाचा — नव्हे, मदारी मेहतराचा — दर्गाच त्या पत्राच्या खरेपणाची साक्ष देत उभा आहे!' छान! म्हणजे दर्ग्याला आधार त्या तथाकथित पत्राचा आणि त्या पत्राला आधार दर्ग्याचा. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, दर्गा पत्रावर उभा आहे आणि पत्र दर्ग्यावर उभे आहे! अशी ही कसरत एखाद्या नामवंत सर्कशीतही पाहायला मिळणार नाही!

शेवटी इतकेच सांगतो की त्या तथाकथित पत्रातली किंवा निवेदनातली बहुतांश माहिती खोटी किंवा काल्पनिक आहे; तिच्या आधारे शिवचरित्रात कोणा मदारी मेहतराचे अस्तित्व सिद्ध होत नाही. त्यातूनही कोणी हट्टाने शिवाजी महाराजांच्या सेवकांमध्ये त्याचा समावेश केलाच तरी देखील त्यांच्या सेवेतील मुसलमानांच्या प्रमाणात म्हणण्यासारखी काहीच वाढ होणार नाही.

शिवाजी महाराजांनी वाल्ह्याच्या पाटीलकीविषयी 'ठाणेदार हजरतखान' याला लिहिलेले २७ ऑक्टोबर १६५७ या तारखेचे पत्र म्हणून एक कागद उपलब्ध आहे; तो अस्सल म्हणून केलेला नाही, पत्राची नकल म्हणून केलेला आहे. ते तथाकथित पत्र बनावट आहे हे मी श्री राजा शिवछत्रपती, भाग २ मधील परिशिष्ट ३९ मध्ये (पृ. १००७ ते १०१०) दाखवून दिले आहे. अशा बनावट पत्राच्या आधारे हजरतखानाचा समावेश शिवाजी महाराजांच्या सेवकांमध्ये करता येणार नाही; त्याचा इतरत्र कुठेही असा उल्लेख नाही.

जदुनाथ सरकार यांचे विधान

सर जदुनाथ सरकार यांनी शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांविषयी पुढील विधान केले आहे :

"He was himself a Hindu, sincere in belief and orthodox in practice, and yet he employed a number of Muhammadan officers in the highest positions, such as Munshi Haidar (who became chief justice of the Mughal Empire on entering Aurangzib's service), Siddi Sambal, Siddi Misri and Daulat Khan (admirals), besides commanders like Siddi Halal and Nur Khan (Dil.i.100.) He gave legal recognition to the Muslim qazis in his dominions."[८४]

वरील उताऱ्यात Dil.i.100 असा जो आधार दिला आहे तो फक्त नूरखानापुरता मर्यादित आहे. Dil. हा तारीखे दिल्कुशाचा संक्षेप आहे. त्या नूरखानाचा समावेश शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांच्या यादीत मी केला आहे आणि तिथे त्या ग्रंथाचा आधारही दिला आहे; सरकार यांनी फार्सी हस्तलिखित वापरले आहे, मी इंग्रजी भाषांतर वापरले आहे.[८५] तारीखे दिल्कुशात सिद्दी हलाल खान (म्हणजेच सिद्दी हिलाल) याचाही उल्लेख आहे, पण तो सरकार यांनी दिलेल्या पृष्ठावर नाही, ११६ व्या पृष्ठावर आहे.[८६] सिद्दी संबल, सिद्दी मिस्री आणि दौलतखान हे शिवाजी महाराजांचे admirals (नौसेनेतील उच्च अधिकारी) होते असे जदुनाथ सरकारांचे म्हणणे आहे. त्या तिघांचाही उल्लेख तारीखे दिल्कुशात नाही. दौलतखानाचा उल्लेख मी शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांमध्ये केला आहे. सिद्दी संबल आणि सिद्दी मिस्री हे कधी शिवाजी महाराजांच्या आरमारात किंवा अन्य कोणत्याही सेवेत होते असे म्हणण्यास काहीही पुरावा नाही आणि जदुनाथ सरकार यांनी दिलेलाही नाही. मुन्शी हैदर किंवा काझी हैदर याचे नाव मी महाराजांच्या मुसलमान सेवकांच्या यादीत दिलेले आहे. तो महाराजांकडे पारसनीस (फार्सी लेखनिक) होता. त्या पदाचा समावेश अत्युच्च पदांमध्ये होत नाही. शिवाजी महाराजांनी अनेक मुसलमान अधिकारी अत्युच्च पदांवर नेमले होते या सरकार यांच्या विधानाची उदाहरणे म्हणून त्यांनी मुन्शी हैदर, सिद्दी संबल, सिद्दी मिस्री आणि दौलतखान अशी चार नावे दिली आहेत. त्यांपैकी मुन्शी हैदर शिवाजी महाराजांच्या नोकरीत असला तरी अत्युच्च पदावर नव्हता

आणि सिद्दी संबल व सिद्दी मिस्री हे महाराजांच्या नोकरीत होते असे म्हणण्यास काही पुरावा नाही. म्हणजे त्यांनी दिलेल्या चार उदाहरणांपैकी फक्त एक उदाहरण बरोबर आहे; त्या एकाला अनेक म्हणता येणार नाही.

काझीपणाचे वतन

शिवाजी महाराजांनी त्यांच्या राज्यात मुसलमान काझींना कायदेशीर मान्यता (legal recognition) दिले असे वरील उताऱ्यातील शेवटच्या वाक्याता जदुनाथ सरकार यांनी म्हटले आहे. महाराजांनी मुसलमानांना नोकरीत ठेवले होते या त्यांच्या विधानाच्या संदर्भातील हे वाक्य आहे. त्या वाक्यावरून काझींना — हो! मुसलमान काझींना — पूर्वी कायदेशीर मान्यता नव्हती आणि महाराजांनी तशी मान्यता देणारे एक परिपत्रक काढले किंवा तसा हुकूम जारी केला, अशी एखाद्याची समजूत होण्याचा संभव आहे. म्हणून त्याविषयी पुढे खुलासा करतो. काझी हे मुसलमानाच असत, हिंदू काझी नव्हते आणि नसतात. इतर वतनांप्रमाणे काझीपण हे महाराष्ट्रात वतन होते, म्हणजेच वंशपरंपरा अधिकारपद होते. घर, जमीन यांसारखी वंशपरंपरा मालमत्ता वंशजांमध्ये विभागली जाते त्याप्रमाणे वतनदेखील वतनदाराच्या वंशजांमध्ये विभागले जाई. पाटील, कुलकर्णी, चौगुला व महार हे गावाचे आणि देशमुख (ऊर्फ देसाई) व देशकुलकर्णी (ऊर्फ देशपांडे) हे परगण्याचे, प्रमुख वतनदार होते. हे वतनदार हा कर गोळा करण्याकरिता सरकार व रयत यांच्यामधील दुवा होता. गावच्या वतनदारांपैकी महार हा अर्थात महार जातीतीलच असावा लागे. चौगुला हा सामान्यतः मराठा जातीचा असला तरी तो त्याच जातीचा असला पाहिजे असा निर्बंध नव्हता. कुलकर्णी हा ब्राह्मण किंवा प्रभू जातीतील असे. मोकदम (म्हणजेच पाटील) हा सामान्यतः मराठा जातीचा असे. पण तो एखाद्या विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा असला पाहिजे असा काही निर्बंध नव्हता. देशमुख हाही सामान्यतः मराठा जातीचा असे, पण तो एखाद्या विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा असला पाहिजे असा काही निर्बंध नव्हता. देशकुलकर्णी किंवा देशपांडे हा ब्राह्मण किंवा प्रभू जातीचा असे. या वतनांखेरीज आणखीही काही वतने होती. सामान्यतः कसब्याच्या ठिकाणी पेठ (म्हणजे बाजारपेठ) वसविलेली असे.

पेठेची म्हणून वेगळी वतने असत. मोकदम आणि कुलकर्णी या गावाच्या वतनदारांप्रमाणे शेट्या आणि महाजन हे पेठेचे वतनदार असत. समान्यतः प्रत्येक परगण्यात काझीपणाचे वतन असे. काझी म्हणजे मुसलमान धर्मशास्त्रानुसार न्याय देणारा न्यायाधीश. तो अर्थातच मुसलमानच असे. मुसलमानांची लग्ने लावण्याचे काम काझीच करतो. एखाद्याला एखाद्या अस्सल दस्तऐवजाची प्रमाणित नक्कल करून हवी असेल तर त्या दस्तऐवजाच्या नकलेवर ती मुळाबरहुकूम असल्याचा शेरा व शिक्का करून देणे हेही काम काझी करत असे. महाराष्ट्रात परगण्यातील तंट्यांचे निवाडे ज्या सभेत केले जात तिला गोत म्हणत. सामान्यतः अशा गोतात (किंवा गोतसभेत) परगण्याचा हवालदार किंवा तत्सम अधिकारी व त्याच्या हाताखालील अधिकारी, परगण्याचे देशमुख, देशकुलकर्णी, इत्यादी वतनदार आणि परगण्यातील काही गावांचे मोकदम व निरनिराळ्या गावांमधील बलुती उपस्थित असत. गोतात उपस्थित राहाण्याकरिता जातीचा कोणताच निर्बंध नव्हता. परगण्याच्या ठिकाणी होणाऱ्या गोतसभेला काझी हजर असल्याची पुष्कळ उदाहरणे आढळतात. अशा गोतसभांमध्ये झालेले निर्णय ज्या दस्तऐवजात लिहिले जात त्याला महजर म्हणत असत. महजरांमध्ये सभेची जी हाजिर मजालस (म्हणजे सभेला उपस्थित असलेल्या व्यक्तींची यादी) प्रारंभी लिहिली जाई तिच्यात सामान्यतः काझीचे नाव सर्वांत वर लिहिले जाई. पण गोतात होणारे निवाडे इस्लामी कायद्यानुसार म्हणजे शरीअतनुसार होत नसत. ते निवाडे स्थानिक रीतिरिवाजांनुसार होत आणि प्रसंग पडलाच तर हिंदू धर्मशास्त्रानुसार दिव्य करून केले जात; क्वचित विज्ञानेश्वरी या हिंदू धर्मग्रंथाचा आधार घेतला जाई. शिवशाहीत तर नाहीच पण निजामशाहीत आणि आदिलशाहीतही गोतांमध्ये होणाऱ्या निवाड्याच्या बाबतीत काझीला काही विशेष अधिकार असल्याचे किंवा काझीने कधी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसत नाही. गोत सभेला काझी हजर असला पाहिजे असाही काही नियम नव्हता; महजरांच्या हाजिर मजालसीत काझी हजर नसल्याची पुष्कळ उदाहरणे आढळतात.[८७]

वतनदार जी कामे करीत त्यांचा मोबदला म्हणून त्यांना वंशपरंपरेने जमिनी इनाम

दिलेल्या असत आणि त्या जमिनींवर काही कर आकारले जात नसत. काही वतनदारांना स्थानिक रिवाजानुसार चांभार, कुंभार, तेली, न्हावी, सुतार, इत्यादी बलुत्यांकडून ठरावित प्रमाणात वस्तू किंवा सेवा मिळत असत. काझीला त्याच्या कामाबद्दल इनाम जमीन किंवा रोख रक्कम अशा स्वरूपात मोबदला दिला जाई. वतनदारांना दिलेले इनाम ते जी कामे करीत त्या कामांचा मोबदला म्हणून दिलेले असे. त्याशिवाय मशिदींचे किंवा देवळांचे सेवेकरी, वैद्य, यांनाही वंशपरंपरेने इनामे दिली जात. युद्धात बजावलेल्या कामगिरीबद्दलही वंशपरंपरा इनाम दिल्याची उदाहरणे आढळतात. अशी इनामे ही सामान्यतः मुकासदाराच्या म्हणजेच जहागीरदाराच्या हुकुमाने मिळत असत.

मुकासदार बदलला की जुन्या मुकासदाराच्या अधिकाऱ्यांच्या जागी नवीन मुकासदारांचे अधिकारी मुकाशाचा, म्हणजेच जहागिरीचा कारभार पाहाण्याकरिता येत. वतनदारांखेरीज इतर इनामदारांची इनामे हे अधिकारी आपल्या मालकाच्या म्हणजे नवीन मुकासदाराच्या हुकुमाखेरीज चालू ठेवत नसत. त्यामुळे अशा इनामदारांना मुकासदाराकडे समक्ष जाऊन किंवा आपला प्रतिनिधी म्हणून कोणालातरी पाठवून आपले इनाम चालू ठेवण्याविषयीचा त्याचा हुकूम आणावा लागे. अशा हुकुमाला खुर्दखत म्हणत असत. युद्धामुळे, इनामदार यात्रेला गेल्यामुळे किंवा इतर काही कारणामुळे इनामाचा भोगवटा तुटला, म्हणजेच इनामदाराने इनामाचा लाभ घेण्यात खंड पडला तर, किंवा असे कोणतेही कारण नसताना मुकासदाराच्या अधिकाऱ्यांनी इनामदाराकडे नव्या खुर्दखताची मागणी केली तर, इनामदाराला मुकासदाराकडून पुन्हा खुर्दखत आणावे लागे. क्वचित, वतनदारांखेरीज इतरांची इनामे मुकासदार रद्द किंवा कमी करत असे.

वतनदार हे वंशपरंपरेने असत. मुकासदार बदलला तरी त्यांना त्यांच्या वतनाकरिता किंवा वतनामुळे मिळणाऱ्या इनामाकरिता खुर्दखत आणावे लागत नसे. राजवट बदलली तरीही वतनदार कायमच राहात. प्रामुख्याने महसूल गोळा करण्याची व इतरही स्थानिक कामांची वतनदारी यंत्रणा नवीन राज्यकर्ताही जशीच्या तशी कायम ठेवत असे. उदाहरणार्थ, शिवाजी महाराजांनी

आदिलशाहीकडून किंवा मुघलांकडून काही मुलूख जिंकून घेतला तरी ते त्या मुलखातील वतनदार जसेच्या तसे कायम ठेवत. याउलट आदिलशाहीने किंवा मुघलांनी शिवाजी महाराजांकडून काही मुलूख जिंकून घेतला तरी त्या मुलखातील वतनदार तसेच कायम रहात, बदलले जात नसत. मुकासदार ऊर्फ जहागीरदार येत आणि जात, राज्यक्रांती होई, एक बादशहा मरण पावून किंवा पदभ्रष्ट केला जाऊन त्याच्या जागी दुसरा बादशहा येई, एक राजवट बदलून दुसरी किंवा दुसरी जाऊन तिसरी राजवट येई, पण वतनदार आपल्या जागी कायम राहात.

शिवाजी महाराजांच्या राज्याचा हेतू हिंदू धर्माचे म्हणजे पर्यायाने हिंदू धर्मीयांचे रक्षण करणे असा होता आणि ते राज्य हिंदूंचे पक्षपाती होते हे सप्रमाण दाखवून दिले आहे. पण मुहम्मद पैगंबरांनी ज्याप्रमाणे मुसलमान धर्मीयांखेरीज इतर धर्मीयांना अरबस्तानात राहू देऊ नका असा हुकूम दिला होता त्याप्रमाणे हिंदूंखेरीज इतर धर्मीयांची आपल्या राज्यातून हकालपट्टी करावी आणि त्यांची मालमत्ता जप्त करावी असा काही हुकूम शिवाजी महाराजांनी दिलेला नव्हता. त्यांच्या राज्यात इतर वतनदार जसे पूर्वीप्रमाणे आपापल्या वतनांवर कायम होते तसेच काझीही त्यांच्या वतनांवर कायम होते. याचा अर्थ शिवाजी महाराजंनी काझींना काही वेगळी कायदेशीर मान्यता दिली होती असा होत नाही.

वतनदार हे राज्यनिरपेक्ष असल्यामुळे, म्हणजे राजवट बदलली तरी ते बदलत नसल्यामुळे, मी त्यांची गणना शिवाजी महाराजांच्या सेवकांमध्ये केलेली नाही. काझी हे वतनदार होते त्यामुळे शिवाजी महाराजांच्या राज्यातील काझींची गणना त्यांच्या सेवकांमध्ये करण्याचे कारण नाही. पण तरीही त्यांची गणना शिवाजी महाराजांच्या सेवकांमध्ये करण्याचे कोणी ठरविले तर इतर वतनदारांचीही गणना त्यांच्या सेवकांमध्ये करावी लागेल आणि मग त्यांच्या सेवकांमधील मुसलमानांचे प्रमाण आणखी खाली घसरेल. उदाहरणार्थ : १६५६ मध्ये शाहजी महाराजांच्या मुकाशांपैकी ज्या मुकाशांचा कारभार शिवाजी महाराज पाहात होते त्यांत पुणे, सुपे (सासवड कर्यातीसह), इंदापूर व चाकण हे चार परगणे आणि हिरडस मावळ, वेळवंड खोरे, गुंजण मावळ, कानद खोरे, मोसे खोरे, मुठे खोरे व पौड खोरे यांचा

समावेश होता.[८८] त्यांच्यातील गावांची संख्या होती ८८१.[८९] प्रत्येक गावात पाटील, चौगुला, कुलकर्णी व महार, प्रत्येक पेठेत शेट्ये, महाजन, इत्यादी आणि प्रत्येक परगण्यात, मावळात व खोऱ्यात देशमुख व देशकुलकर्णी इत्यादी मिळून या मुलखात गोळाबेरजेने निदान ३४०० वतनदार होते. क्वचित एखाद्या गावात मोकदम मुसलमान होता, पण अशी उदाहरणे अगदी अपवादात्मक आहेत. या मुलखापैकी पुणे, सुपे, इंदापूर व चाकण या चार परगण्यामध्ये काझी होता. म्हणजे कशीही मोजणी केली तरी या मुलखातील वतनदारांमध्ये मुसलमानांचे प्रमाण पाव टक्क्यापेक्षा अधिक भरत नाही.

सिद्दी संबुल आणि सिद्दी मिस्त्री

सिद्दी संबुल आणि सिद्दी मिस्त्री यांचा उल्लेख वर आला आहे. त्यांच्याविषयी आणखी थोडी माहिती पुढे देतो. मुघल आणि आदिलशाही यांच्यात १६३६ मध्ये झालेल्या तहाने निजामशाही कोकण आदिलशाहीच्या ताब्यात आले. तो मुलूख शिवाजी महाराजांनी १६५७ च्या उत्तरार्धात काबीज केला. त्यानंतर शिवाजी महाराजांपुढे टिकाव धरणे जंजिऱ्याच्या सिद्दींना दिवसेंदिवस अवघड होऊ लागले. त्यामुळे पोर्तुगिजांचा पाठिंबा मिळावा म्हणून जंजिरेकर सिद्दीने १६६८ च्या प्रारंभी पोर्तुगालच्या राजाचे मांडलिकत्व पत्करले.[९०] हे मांडलिकत्व नाममात्रच होते. शिवाजी महाराजांविरुद्ध टिकाव धरण्याकरिता सिद्दीला कोणाच्या तरी पाठिंब्याची गरज होती आणि शिवाजी महाराजांसारख्या प्रबळ व महत्त्वाकांक्षी शेजाऱ्याच्या वाढत्या सामर्थ्याला आळा घालण्याकरिता सिद्दीला मदत करण्याचे पोर्तुगिजांचे धोरण होते. सिद्दी आपला मांडलिक झाला की आपण त्याला उघडपणे मदत करू शकू असे पोर्तुगिजांना वाटत होते. पण फेब्रुवारी १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी पोर्तुगिजांशी जो तह केला त्या तहात पोर्तुगिजांनी सिद्द्यांना मदत न करण्याचे मान्य केले.[९१] त्यानंतरही पोर्तुगीज सिद्दीला गपचूप मदत करीत असत.[९२] पण केवळ तेवढ्या मदतीवर शिवाजी महाराजांविरुद्ध टिकाव धरणे सिद्दीला अशक्य झाले असले पाहिजे. म्हणून १६७२ मध्ये तो मुघल बादशाहाचा अंकित झाला.[९३] त्यानंतरही सिद्दी बऱ्याच अंशी स्वतंत्रच होता. मुघलांकडे आरमार नव्हते आणि

शिवाजी महाराजांना तोंड देण्यासाठी सिद्दीला एखाद्या प्रबळ सत्तेच्या पाठिंब्याची गरज होती.

सिद्दी मुघलांचा मनसबदार झाल्यापासून अधूनमधून आपले आरमार घेऊन सुरतेला जाई. तिथून निघून तो इंग्रजांच्या ताब्यातील मुंबई बेटात आश्रय घेत असे आणि शिवाजी महाराजांच्या किनारपट्टीवरील मुलखात आपल्या गलबतांमधून सैनिक उतरवून लुटालूट व जाळपोळ करीत असे. १६७२ पासून १६७६ पर्यंत सिद्दी संबुल या आरमाराचा प्रमुख होता.[९४] १६७६ मध्ये मुघल आरमाराचा प्रमुख म्हणून सिद्दी संबुलच्या जागी सिद्दी कासिम याची नेमणूक झाली.[९५] ही गोष्ट सिद्दी संबुलला पसंत पडणे शक्यच नव्हते. १६७७ मध्ये सिद्दी संबुल आणि सिद्दी कासिम हे दोघेही मुंबई बंदरात दाखल झाले. त्यांच्यात मुंबई बेटात एक चकमक होऊन तिच्यात आठदहाजण ठार झाले. शेवटी इंग्रजांनी ती चकमक थांबवली आणि त्यांच्या प्रयत्नांनी त्या दोघा सिद्द्यांमध्ये तडजोड झाली व आरमार सिद्दी कासिमच्या हवाली करून स्वतः सुरतला निघून जाण्याचे सिद्दी संबुलने कबूल केले.[९६]

सिद्दी संबुलच्या एका मेव्हण्याचे नाव होते सिद्दी मिस्री.[९७] हा सिद्दी मिस्री पूर्वी मुघलांच्या नोकरीतच होता. सिद्दी कासिम, सिद्दी मिस्री व इतर दोनजण यांना हुद्द्यात बढती द्यावी अशी शिफारस करणारे खानजहान बहादुराचे पत्र मिळाल्याची नोंद औरंगजेबाच्या दरबारच्या ११ जुलै १६८१ या तारखेच्या अखबारात आहे.[९८] पत्र पोचण्यास लागणारा वेळ विचारात घेतला तर जून १६८१ पर्यंत तरी सिद्दी मिस्री मुघल आरमारात असला पाहिजे. मुंबईहून सुरतला पाठविण्यात आलेल्या १२ ऑक्टोबर १६८१ या तारखेच्या पत्रातील उल्लेखावरून सिद्दी मिस्री तेव्हा छत्रपती संभाजी महाराजांच्या आरमारात होता असे दिसून येते.[९९] तेव्हा जून ते सप्टेंबर १६८१ या दरम्यान, बहुधा जून १६८१ नंतर लवकरच, सिद्दी मिस्री मुघलांकडील नोकरी सोडून संभाजी महाराजांच्या आरमारात दाखल झाला असला पाहिजे. सिद्दी संबुलचा एक मुलगा आणि स्वतः सिद्दी संबुल हे देखील संभाजी महाराजांच्या आरमारात असल्याचे १६८२ मधील उल्लेख मिळतात.[१००] बहुधा तेही सिद्दी

मिस्रीबरोबरच संभाजी महाराजांकडे आले असतील. ते तिघे आणि, कदाचित, त्यांच्या गोतावळ्यातील आणखी कोणी संभाजी महाराजांकडे आले तेव्हा संभाजी महाराजांनी काय करायला हवे होते? त्यांनी असे म्हणायला हवे होते का की : ''अरे सिद्दी संबुल! तू मुसलमान आहेस. माझे वडील मुसलमान नव्हते, म्हणजेच इस्लामच्या दृष्टिकोनातून काफिर होते आणि मी देखील मुसलमान नाही म्हणजेच काफिर आहे. म्हणून तर इस्लामचा बादशाह औरंगजेब आणि विजापूरचा आदिलशाह माझ्या वडिलांना उद्देशून मक्हूर (ज्याच्यावर [अल्लाचा] कोप झाला आहे असा), मलऊन (शापित), बी-आकिबत (हतभागी, मुसलमान नाही म्हणून), काफिर, अशी विशेषणे वापरत असत.[१०१] मी असे ऐकले आहे की, ''श्रद्धावंतांनो [म्हणजे मुसलमानांनो] मूमिनांना [म्हणजे मुसलमानांना] सोडून काफिरांना आपले मित्र करू नका'' असा अल्लाचा हुकूम कुराणात सांगितला आहे.[१०२] तू त्या हुकुमाचे उल्लंघन करतो आहेस. औरंगजेब मूमिन आहे, म्हणजेच मुसलमान आहे आणि मी तर मुसलमान नाही, म्हणजेच काफिर आहे. असे असूनही तू औरंगजेबासारख्या कट्टर मूमिनाला सोडून माझ्यासारख्या काफिराला सामील होऊ पहात आहेस! याचा अर्थ तू इस्लामशी प्रतारणा करतो आहेस, म्हणजेच मुनाफिक (दांभिक, ढोंगी) आहेस, असा होतो. काफिरांचे आणि मुनाफिकांचे स्थान नरक हे आहे असे अल्लाने सांगून ठेवले आहे ना?[१०३] अजूनही वेळ गेलेली नाही. आल्या पावली परत जा आणि सिद्दी कासिमला सामील होऊन माझ्याविरुद्ध जिहाद कर, कारण काफिरांविरुद्ध जिहाद करा असा हुकूम अल्लाने मूमिनांना दिला आहे. तू लगेच परत गेला नाहीस तर मीच तुला कैद करून औरंगजेबाच्या हवाली करीन.'' असे म्हणून छत्रपती संभाजी महाराजांनी शत्रूकडून फुटून त्यांच्याकडे आलेल्या सिद्दी संबुल याला परत पाठवायला हवे होते का?

संभाजी महाराजांनी तसे काहीही केले नाही. सिद्दी हा तर औरंगजेबाच्या आरमाराचा कणाच होता. तेव्हा सिद्द्यांमध्ये दुफळी माजणे संभाजी महाराजांच्या फायद्याचेच होते. शत्रूच्या सामर्थ्यातील वजावट ही अप्रत्यक्षपणे आपल्या सामर्थ्यातील वाढच असते. शिवाय संभाजी महाराजांचे आरमार पुरेसे प्रबळ नव्हते.

त्यांना कुशल, अनुभवी अशा आरमारी अधिकाऱ्यांची गरजही होती. औरंगजेबाकडून फुटून त्यांच्याकडे आलेल्या तिघाही सिद्द्यांना त्यांनी आपल्याकडे ठेवून घेतले आणि आपल्या आरमारात अधिकाराच्या जागा दिल्या. त्यांचा दृष्टिकोन सर्वधर्मसमभावाचा होता, हिंदू व मुसलमान यांच्यात ते काही भेदभाव करीत नव्हते, असा निष्कर्ष त्यांच्या त्या कृतीतून निघत नाही. ती कृती ही तेव्हाची व्यावहारिक गरज होती.

सिद्दी मिस्रीचे पुढे काय झाले याची हकिगत मुंबईहून सुरतेला पाठविण्यात आलेल्या ५ ऑक्टोबर १६८२ या तारखेच्या पत्रातून समजते. ती थोडक्यात अशी आहेः संभाजी महाराजांच्या आरमारातील ३० गलबते ४ ऑक्टोबर १६८२ रोजी नागोठण्याच्या खाडीतून बाहेर पडली. मुघल आरमाराचा प्रमुख सिद्दी कासिम याने १६ गलबतांनिशी त्यांच्याशी लढाई केली. संभाजी महाराजांच्या आरमाराचा पराभव झाला. सिद्दी मिस्रीचे गलबत आणि इतर सहा गलबते सिद्दी कासिमने काबीज केली. सिद्दी मिस्री व इतर सुमारे चाळीसजण कैद झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी सिद्दी कासिमने त्यांना मुंबई बंदरात आणले. मुंबईच्या इंग्रज डेप्युटी गव्हर्नरने त्या कैद्यांना मुंबई बेटात उतरविण्यास मनाई केली. तरीही सिद्दी कासिमने सिद्दी मिस्री व इतर दोन युद्धकैदी, त्यांच्या जखमांवर उपचार करून उद्या त्यांना सुरतेस पाठवतो असे म्हणून, बेटात उतरवलेच. सिद्दी मिस्री त्याच्या जखमांमुळे त्याच दिवशी मरण पावला.[१०४]

या हकिगतीत सिद्दी संबुलचा उल्लेख नाही. पण या लढाईत तोही युद्धकैदी झाला होता असे औरंगजेबाच्या दरबारच्या ४ नोव्हेंबर १६८२ या तारखेच्या अखबारातील पुढील नोंदीवरून दिसते.

‘‘सुरतेचा मुत्सद्दी (अधिकारी) कारतलबखान याला पुढील आशयाचा हस्बुल–हुक्म सादर झालाः याकूतखानाचा मानलेला मुलगा सिद्दी संबुल आणि संभा मकहूर याचा चाकर सिद्दी मिस्री हे ४५ जणांसह कैद केले आहेत. सिद्दी मिस्री जखमी आहे. फुरसत होईल तेव्हा त्यांना हुजूर पाठवावे. त्याच्या सोबत्यांपैकी जे मुसलमान असतील त्यांना जिवे मारावे आणि हिंदूंपैकी जो मुसलमान होईल त्याला

कैदेत ठेवावे आणि न झाल्यास त्यालाही ठार मारावे.''[१०५]

मुंबईहून बातमी सुरतेला पोचून तिथून औरंगजेबाच्या छावणीपर्यंत पोचायला एक महिना लागला. सिद्दी मिस्री आधीच मरण पावला होता. सिद्दी संबुलचे काय झाले ते उपलब्ध अखबारांमध्ये नमूद केलेले नाही. बहुधा औरंगजेबाच्या हुकुमानुसार त्याला ठार मारले असेल.

काझी हैदर

काझी हैदर शिवाजी महाराजांकडे पारसनीस (फार्सी लेखनिक) म्हणून नोकरी करीत होता. शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांच्या यादीत मी त्याचे नाव दिले आहे. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत, औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या २६ व्या वर्षी, १६८३ मध्ये तो औरंगजेबाकडे गेला. त्यासंबंधी मआसिर-इ आलमगीरीतील नोंद अशी आहे : ''सीवाचा मुन्शी (पत्र लेखनिक) काझी हैदर सेवेच्या हेतूने [बादशाहांकडे] आला. खिल्‌अत, दहा हजार रुपये आणि दोन हजारी मनसब यांनी सन्मानित झाला.''[१०६]

हा मुन्शी हैदर (म्हणजेच काझी हैदर) औरंगजेबाच्या सेवेत गेल्यावर मुघल साम्राज्याचा मुख्य न्यायाधीश झाला असे जदुनाथ सरकार यांनी वर उद्‌धृत केलेल्या उताऱ्यात म्हटले आहे. त्या विधानाला त्यांनी काही आधार दिलेला नाही. इतरही काही लेखकांनी, बहुधा जदुनाथ सरकार यांचे अनुकरण करून, काझी हैदर (किंवा मुन्शी हैदर) हा मुघल साम्राज्याचा मुख्य न्यायाधीश झाला असे म्हटले आहे.[१०७] वास्तविक काझी हैदर मुघल साम्राज्याचा मुख्य न्यायाधीश झाला नाही, जो १७०६ मध्ये मुघल साम्राज्याचा मुख्य न्यायाधीश झाला त्याचे नाव होते मुल्ला हैदर. काझी हैदर आणि मुल्ला हैदर हे एकच होते असे मानण्याचे काहीही कारण नाही. मुल्ला हैदर याच्याविषयीची मआसिर-इ आलमगीरीतील औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या ५० व्या वर्षातील, १७०६ मधील, नोंद अशी आहे : ''शाहजादा मुहम्मद अझीम याचा शिक्षक मुल्ला हैदर याच्यावर खिलाफतीच्या राजधानीच्या [म्हणजे दिल्लीच्या] न्यायाधीशीची सेवा सोपविलेली होती. बादशाही छावणीची

न्यायाधीशी देण्याकरिता त्याला हुजूर बोलाविले होते. तो या वेळी दरबारी पोहोचला आणि त्या उच्च पदावर उन्नती पावला.''[१०८]

काझी हैदर शिवाजी महाराजांच्या नोकरीत असताना त्यांनी त्याला तहाची बोलणी करण्याकरिता वकील म्हणून बहादुरखानाकडे पाठविले होते, आणि बहादुरखानाने त्याला पायात बेड्या घालून परांडा किल्ल्यावर कैदेत ठेवले होते, अशी हकिगत पर्णाल पर्वतग्रहणाख्यानात (२:५१-५४) सांगितली आहे. पण त्याची तिथून सुटका झाली असली पाहिजे कारण पुढे संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत तो औरंगजेबाकडे गेला.

काही थापांचे परीक्षण

अलीकडे शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांची माहिती म्हणून अनेक निराधार व खोटी विधाने विविध माध्यमांमधून प्रसृत केली जात आहेत. त्यांचा भडिमार इतक्या मोठ्या प्रमाणावर व सातत्याने केला जात आहे की त्या सर्वांचे परीक्षण व खंडन करणे शक्य नाही. ती एक पद्धतशीरपणे राबविली जात असलेली प्रचार मोहीम आहे. त्याच मोहिमेत व्हॉट्स ॲपवर टाकण्यात आलेली एक पोस्ट मला एका मित्राने पाठविली.[१०९] नमुन्यादाखल तिच्यातील काही विधानांचे परीक्षण पुढे करीत आहे. पोस्टमधील विधाने अवतरण चिन्हांमध्ये दिली आहेत.

(१) ''शिवाजी महाराजांच्या तोफखान्याचा प्रमुख कोण होता? ... इब्राहीमखान.''

शिवाजी महाराजांच्या सैन्यात तोफखान्याचा प्रमुख असे काही पद होते असे म्हणण्यास काहीही पुरावा नाही. त्यांच्या सैन्यात इब्राहीमखान नावाचा एक सरदार होता; त्याचे नाव त्यांच्या मुसलमान सेवकांच्या यादीत मी दिलेही आहे. पण तो तोफखान्याचा प्रमुख होता असे म्हणण्यास काहीही पुरावा नाही.

(२) ''शिवाजी महाराजांच्या घोडदलाचा प्रमुख कोण होता? सिद्दी हिलाल.''

सिद्दी हिलाल महारजांच्या घोडदलाचा प्रमुख होता हे विधान निराधार आहे. महाराजांच्या लष्कराचे (घोडदळाचे) सरनौबत कालानुक्रमे पुढीलप्रमाणे होते :

तुकोजी चोर, माणकोजी दहातोंडे, नेतोजी पालकर, प्रतापराव गुजर आणि हंबीरराव मोहिते.[११०] सिद्दी हिलालचे नाव मी महाराजांच्या सेवकांच्या यादीत दिले आहे आणि तिथे त्याच्याविषयी काही माहितीही दिली आहे.

(३) ''शिवाजी महाराजांचा पहिला सरसेनापती कोण होता? ... नूरखान.''

शिवाजी महाराजांच्या सैन्यात सरसेनापती अशा नावाचे पद होते असे म्हणण्यास काहीही पुरावा नाही. एक नूरखान मुघलांकडून निघून महाराजांकडे आला होता आणि त्याचे नाव मी महाराजांच्या मुसलमान सेवकांच्या यादीत दिलेही आहे. पण तो काही सेनापती नव्हता. ''नूरबेग सरनौबत पाऊलोक'' असे एक नाव शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत झालेल्या २१ मार्च १६५७ या तारखेच्या महजराच्या हाजिर मजालसीत, म्हणजे सभेला उपस्थित असलेल्या लोकांच्या यादीत, आहे. तो तेव्हा पाऊलोकांचा म्हणजे पायदळाचा सरनौबत होता. त्याचे नाव मी महाराजांच्या सेवकांच्या यादीत दिले आहे. वरील तारखेनंतर त्याचे नाव कधीही आढळत नाही. त्याविषयीचा माझा अंदाजही मी वर दिला आहे.

(४) ''शिवाजी महाराजांबरोबर आग्र्याला गेलेला मदारी मेहतर ... मुसलमान...!''

मदारी मेहतराची गोष्ट खोटी किंवा काल्पनिक आहे तिचे सविस्तर परीक्षण मी वर केले आहे.

(५) ''शिवाजी महाराजांचा एकमेव वकील ... काझी हैदर हाही मुसलमान.''

पुन्हा एकदा काझी हैदर

काझी हैदर हा शिवाजी महाराजांचा फार्सी लेखनिक होता. पुढे संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत १६८३ मध्ये तो औरंगजेबाला जाऊन मिळाला. एका प्रसंगी महाराजांनी त्याला बहादुरखानाकडे वकील म्हणून पाठविले होते. पण तो महाराजांचा एकमेव वकील (राजदूत) होता असा त्याचा अर्थ होत नाही. महाराजांच्या राज्ययंत्रणेत परराज्यांशी संपर्क ठेवण्याचे काम डबिराकडे असे. दबीर हा फार्सी शब्द आहे, म्हणून महाराजांनी त्या पदाला पुढे सुमंत असे नाव ठेवले.

महाराजांचे डबीर कालानुक्रमे पुढीलप्रमाणे होतेः सोनाजी विश्वनाथ, त्याच्यानंतर त्याचा पुत्र त्र्यंबक सोनदेव, त्यानंतर त्याचा पुत्र रामचंद्रपंत.[१११] वकिलीकरिता प्रत्येक वेळी डबीर स्वतःच जाई असे नाही. महाराजांतर्फे वकील म्हणून निरनिराळे लोक निरनिराळ्या सत्तांकडे गेलेले होते. वर महाराजांच्या हिंदू सेवकांची जी यादी मी दिली आहे तिच्यात वकील म्हणून ज्यांची नोंद आहे अशा अकराजणांची नावे प्रथम देतो.

(१) अंताजी पंडित. सुरतेत वकील. १६७०. वरील यादीतील क्र.३.

(२) आवजीपंत. पोर्तुगिजांकडे वकील. १६७७. वरील यादीतील क्र.१२.

(३) जिवाजी शेणवी. पोर्तुगिजांकडे वकील. १६७८. वरील यादीतील क्र.१०७.

(४) पितांबर शेणवी. पोर्तुगिजांकडे वकील. १६७८ वरील यादीतील क्र.२०५.

(५) प्रतापजी. मुंबईकर इंग्रजांकडे वकील. वरील यादीतील क्र.२१२.

(६) बाबाजी नाईक पुंडे. विजापूरला वकील. १६७२. वरील यादीतील क्र.२४०.

(७) भीमाजी पंडित. मुंबईकर इंग्रजांकडे वकील. १६७३. वरील यादीतील क्र.२६३.

(८) महादजीपंत. मद्रासकर इंग्रजांकडे वकील. १६७७. वरील यादीतील क्र.२७४.

(९) विठ्ठलपंत. पोर्तुगिजांकडे वकील. १६७०. वरील यादीतील क्र.३६१.

(१०) सखोपंत. पोर्तुगिजांकडे वकील. १६६७. वरील यादीतील क्र.३८८.

(११) सुंदरजी प्रभू. मुंबईकर इंग्रजांकडे वकील. १६७३. वरील यादीतील क्र.४१०.

आणखी काही नावे त्यांच्या वकिलीच्या आधारांसह पुढे देतो.

(१२) करमाजी (गिरमाजी?). जयसिंगाकडे वकील. हफ्त अंजुमन (*House of Shivaji* ed. of 1940, p.104).

(१३) निराजी रावजी. कुत्बशाहाकडे वकील. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २६, १६७२). वरील यादीतील क्र.१९१.

(१४) पंताजी गोपीनाथ. अफजलखानाकडे वकील. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २०, १६५९). वरील यादीतील क्र.२००.

(१५) रघुनाथ पंडित. जयसिंगाकडे वकील. सभासद बखर, पृ. ३९. शिवाय पहा – हफ्त अंजुमन (*House of Shivaji,* ed. of 1940, p.107); आलमगीर नामा, पृ. ९००. वरील यादीतील क्र.३१८.

(१६) शामजी नाईक. विजापुरास वकील. जेधे शकावली (शिचप्र, पृ. ३०, १६७९). वरील यादीतील क्र.३८१.

(१७) सोनाजी (सोनाजी विश्वनाथ). औरंगजेबाकडे वकील, १६५७, १६५८–५९ (श्री राजा शिवछत्रपती, पृ.८२०, ८७९). शायिस्ताखानाकडे वकील. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २१, १६६०). वरील यादीतील क्र.४२०.

या यादीत आणखीही तीनचार नावांची भर घालता येईल, पण काझी हैदर हा 'शिवाजी महाराजांचा एकमेव वकील' होता ही थाप आहे हे दाखवून देण्यास एवढी नावे पुरेशी आहेत. काझी हैदर हा शिवाजी महाराजांनी वकिलीच्या कामावर पाठविलेला एकमेव मुसलमान होता असे मात्र म्हणता येईल. त्यालाही तशा कामगिरीवर फक्त एकदाच पाठविले होते.

(६) ''शिवाजी महाराजांचे एकमेव चित्र उपलब्ध आहे त्या चित्रकाराचे नाव मीर मोहम्मद. हा ही मुसलमान.''

शिवाजी महाराजांचे चित्र आणि मीर मुहम्मद

हे विधान वाचून एखाद्याची अशी समजूत होईल, किंबहुना तशी समजूत व्हावी असाच ते विधान करण्यामागील हेतू असावा, की मीर मुहम्मदाने मोठ्या आस्थेने शिवाजी महाराजांचे ते चित्र काढले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की मीर मुहम्मदाने प्रत्यक्ष शिवाजी महाराजांचे चित्र काढलेलेच नाही, त्याने शिवाजी महाराजांच्या चित्राचे चित्र काढले आहे म्हणजे चित्राची नक्कल केली आहे. ते चित्र मानुचीच्या चित्रसंग्रहातील आहे.[११२] त्या संग्रहातील प्रत्येक चित्रासमोर त्या चित्राचे वर्णन फ्रेंच भाषेत लिहिलेले आहे. या वर्णनांच्या प्रास्ताविकात तो लिहितो:

''मी मुघल मुलूख सोडण्यापूर्वी [म्हणजे १६८६ पूर्वी] माझ्या कुतूहलशमनार्थ

तैमूरलंगापासून औरंगजेबापर्यंतचे सर्व बादशाह व शाहजादे, औरंगजेबाचे मुलगे व नातू, विजापूर व गोवळकोंड्याचे बादशाह, प्रमुख हिंदू राजे व इतर प्रसिद्ध सेनापती यांची चित्रे रंगवून घेतली. [ही चित्रे काढणारा] कलाकार मीर मुहम्मद हा माझा मित्र होता. तो शाहजादा शाह आलम याच्या पदरी अधिकारी होता. ही सर्व चित्रे [त्याने] बादशाही महालातील मूळ चित्रांवरून नकललेली आहेत.... ती मिळविण्याकरिता मी खर्चाची पर्वा केली नाही आणि अनेक भेटवस्तू दिलेल्या आहेत. हे सर्व काम अत्यंत अवघड परिस्थितीत पार पाडण्यात आले कारण माझ्याकडे नकला घेत असल्याच्या बाबतीत अत्यंत गुप्तता पाळण्याचे बंधन माझ्यावर होते.... ज्या व्यक्तिचित्रांमध्ये [व्यक्तीच्या डोक्याभोवती] प्रभावळ आणि डोक्यावर छत्र दाखविले आहे ती सर्व चित्रे राजघराण्यातील व्यक्तींची आहेत.''[११३]

या चित्रसंग्रहात ४१ चित्रे विशिष्ट व्यक्तींची आहेत. त्यांत औरंगजेबाची दोन चित्रे आहेत, शिवाजी महाराजांचे एक चित्र आहे आणि मुरादबख्श, औरंगजेबाचे मुहम्मद सुलतान, शाह आलम (मुहम्मद मुअज़्ज़म), मुहम्मद आज़म, मुहम्मद अकबर व कामबख्श हे पाच मुलगे, शायिस्ताखान, राजा जसवंतसिंह, राजा जयसिंह, बहादुरखान, दिलेरखान, शर्जाखान, मादण्णा इत्यादी शिवकालीन व्यक्तींची चित्रे आहेत. सर्व आदिलशाहांचे एकत्र असे एक चित्र आहे आणि सर्व कुत्बशाहांचे एकत्र असे एक चित्र आहे. वर सांगितल्याप्रमाणे ही जी चित्रे उपलब्ध आहेत ती मूळ चित्रांवरून नकललेली आहेत. मूळ चित्रे कोणी व कधी काढली ते ज्ञात नाही. त्या चित्रांच्या नकला मीर मुहम्मद याने मानुचीने मुघल मुलूख सोडण्यापूर्वी, म्हणजे १६८६ पूर्वी, केलेल्या आहेत. नकला करण्याचे काम मानुचीने मीर मुहम्मदावर सोपविले होते आणि त्याकरिता बराच खर्चही केला होता. उघडच आहे की मीर मुहम्मदाने हे काम शिवाजी महाराजांच्या प्रेमापोटी केलेले नाही आणि फुकटही केलेले नाही.

शिवाजी महाराजांच्या चित्राची मीर मुहम्मदाने केलेली ही नक्कल आणि महाराजांची आणखी दोन जुनी चित्रे अशा तीन चित्रांची माहिती माझ्या *Shivaji : His Life and Times* या पुस्तकाच्या Appendix X : 'Portraits of

Shivaji' (pp. 714-16) मध्ये दिली आहे. अलीकडे त्यांची आणखीही काही जुनी चित्रे उजेडात आली आहेत.

रुस्तुम–इ ज़मान

(७) ''शिवाजी महाराजांना अफजलखानाचा वध करण्यासाठी वाघनख्या पाठवून देणारा ... रुस्तुमे जमान हाही मुसलमान.''

शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध वाघनखांनी केला, कट्यारीने केला, की तलवारीने केला, हा मुद्दा बाजूला ठेवू. पण त्याचा वध करण्यासाठी रुस्तुम–इ ज़मान याने वाघनखे पाठविली होती हे विधान निराधार आहे. जणू अफजलखानाच्या वधासाठी रुस्तुम–इ ज़मानकडून वाघनखांचे पार्सल येण्याची महाराज वाट पहात होते!

रुस्तुम–इ ज़मानचा विषय निघालाच आहे म्हणून सांगतोः तो आतून शिवाजी महाराजांना सामील होता, म्हणजेच फितूर होता, अशा प्रवादाचे उल्लेख केस्मिद ग्वार्दचे शिवचरित्र, आबे कारेचे प्रवासवृत्त, शिवकालीन इंग्रजी व डच पत्रे अशा विविध साधनांमध्ये १६६० पासून येत होते.[११४] रुस्तुम–इ ज़मानने अंतस्थ रीतीने रांगणा किल्ला रावजी पंडिताच्या हवाली केला अशी बातमी हुबळीहून सुरतला पाठविण्यात आलेल्या ५ सप्टेंबर १६६६ या तारखेच्या पत्रात आहे. तिच्यात कितपत तथ्य आहे ते सांगता येत नाही.[११५] पण त्या सुमारास रांगणा मराठ्यांच्या हाती गेला होता ही गोष्ट खरीच आहे. जेधे शकावलीत शक १५८९ खाली पुढील नोंद आहे :

''वैशाख मासी [१४ एप्रिल ते १२ मे १६६७] बहलोळखान व राजश्री येकोजीराजे रांगणियास वेढा घातला. राजश्रींनी [म्हणजे शिवाजी महाराजांनी] वेढा मारून काढला. मग भाद्रपद मासी [१० ऑगस्ट ते ८ सप्टेंबर १६६७] येदिलशाहाचा व राजश्री सिवाजीराजे यांचा सला [म्हणजे तह] झाला.''[११६]

रुस्तुम–इ ज़मानची फितुरी आदिलशाहाच्या लक्षात आलेली होती. त्याने १६७१ मध्ये रुस्तुम–इ ज़मानची जहागीर जप्त केली. तेव्हा रुस्तुम–इ ज़मानने बंड पुकारले. शिवाजी महाराजांनी त्याला गुप्तपणे मदत केली.[११७] पण शेवटी

आदिलशाही सैन्याने रुस्तुम-इ ज़मानचा पराभव केला. रुस्तुम-इ ज़मान एकतर कैद झाला किंवा आदिलशाहाने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून दरबारी गेला. तिथे आदिलशाहाने त्याचा शिरछेद करविला. पण रुस्तुम-इ ज़मानच्या जहागिरीचा काही भाग त्याचा मुलगा अबूखान याला आदिलशाहाने बहाल केला. हा अबूखानही रुस्तुम-इ ज़मान या किताबाने ओळखला जात असे.[११८]

एखादी व्यक्ती फितुरी करते तेव्हा त्या कृतीमागे द्रव्यलोभ, तत्त्वज्ञानावरील श्रद्धेपोटी परदेशाविषयी प्रेम (उदाहरणार्थ, एखाद्या भारतीय नागरिकाला चीन किंवा पाकिस्तानविषयी प्रेम), व्यक्तिगत कारणांमुळे स्वकीयांविरुद्ध सूडबुद्धीची भावना, परदेशी किंवा फितूर व्यक्तीशी प्रेमप्रकरण आणि ब्लॅकमेल अशी एखादी प्रेरणा असते. रुस्तुम-इ ज़मान आदिलशाहाविरुद्ध फितुरी करून शिवाजी महाराजांना अंतस्थपणे मदत करीत होता त्यामागे कोणतातरी स्वार्थ असला पाहिजे हे उघड आहे.[११९] अशी फितूर व्यक्ती ज्याच्याकरिता फितुरी करीत असते त्याच्याही दृष्टीने तिरस्करणीयच असते. तो फक्त आपले उद्दिष्ट साध्य करण्याकरिता अशा फितुराचा उपयोग करून घेत असतो इतकेच. शिवाजी महाराजही रुस्तुम-इ ज़मानचा असाच उपयोग करून घेत होते. पण म्हणून रुस्तुम-इ ज़मानचे उदात्तीकरण करण्याचे काही कारण नाही.

(८) ''शिवाजी महाराजांचे ३१ बॉडीगार्ड होते. त्यांपैकी १० मुसलमान होते.''
लोणकढी थाप आहे. आकडे अर्थातच काल्पनिक आहेत. दुर्लक्ष करणे चांगले.

(९) ''शिवाजी महाराजांनी एकही मस्जिद पाडली नाही.''
शिवाजी महाराजांनी मशिदी पाडल्याचे पुरावे श्री राजा शिवछत्रपती, भाग २, परिशिष्ट ६८ (पृ. १२६८ ते १२७८) मध्ये मी दिले आहेत. त्यांची पुनरावृत्ती येथे करत नाही. तो या पुस्तिकेचा विषय नाही.

रायगडावरील मशीद

(१०) ''रायगड किल्ला राजधानी बांधल्यानंतर तेथे जगदीश्वराचे मंदिर बांधले. महाराजांनी मंत्र्याला विचारले जगदीश्वराचे मंदिर बांधले पण माज्या

मुसलमान सैनिकांसाठी मस्जिद कुठे आहे... मंत्र्याने विचारले महाराज जागा दाखवा... महाराजांनी आपल्या राजवाड्यासमोरील जागा दाखवली आणि तेथे आपल्या मुसलमान सैनिकांसाठी मस्जिद बांधून घेतली.''

वरील संवाद काल्पनिक आहे, निराधार आहे आणि तो झाल्याचे सांगणारा वृत्तान्त खोटा आहे. शिवाजी महाराजांनी रायगडावर किंवा अन्यत्र कुठेही ''आपल्या मुसलमान सैनिकांसाठी'', किंवा इतर कोणासाठीही, मशीद बांधून घेतली असे म्हणण्यास काहीही पुरावा नाही. असे असूनही रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी त्यांच्या *New History of the Marathas* या ग्रंथात पुढील विधान केले आहे :

"At his capital Raigad he erected a special mosque for Muslim devotees in front of his palace in the same way, that he built there the temple of Jagadishvar for his own daily worship."[१२०]

(त्याची राजधानी रायगड येथे त्याने त्याच्या स्वतःच्या दैनंदिन उपासनेकरिता जगदीश्वराचे मंदिर बांधले त्याचप्रमाणे मुसलमान भक्तांकरिता त्याच्या राजवाड्यासमोर एक विशेष मशीद उभारली.)

हे विधान कशाच्या आधारे केले आहे ते सरदेसाई यांनी सांगितलेले नाही आणि त्यांना सांगता आलेही नसते, कारण ते निराधार आहे. या निमित्ताने सरदेसाई यांच्या इतिहास लेखन पद्धतीविषयी थोडी माहिती देतो. प्रथमच खुलासा करतो की त्यांच्याविषयी मला नितांत आदर आहे तो त्यांनी मराठी रियासत लिहिण्याकरिता केलेल्या कष्टांबद्दल आहे, तिच्या गुणवत्तेविषयी नाही. ज्याला मराठ्यांच्या इतिहासाविषयी सर्वसाधारण माहिती हवी आहे त्याला सरदेसायांची मराठी रियासत उपयोगी आहे, पण बारकाईने पहायचे झाल्यास तिच्यातील कोणत्याही तपशिलावर भरवसा ठेवता येत नाही. साधन कितपत विश्वसनीय आहे, खरे आहे की बनावट आहे, याचा काही विचार न करता हाती लागला तो तुकडा पाहिजे तिथे जोडून, आणि त्यात स्वतःच्या कल्पनांची मनमुराद भर घालून, शिवलेली ती गोधडी आहे. त्यांच्या या कृतीत भेसळ इतकी आहे की ती सर्व काढून त्यांचे इतिहास लेखन शुद्ध

करणे जवळ जवळ अशक्य आहे. रायगडावर शिवाजी महाराजांनी एक special mosque बांधली असे सरदेसाई म्हणतात! Special mosque म्हणजे कोणत्या प्रकारची mosque ते सरदेसायांना विचारणे आता शक्य नाही. रायगडावर महाराजांनी मशीद बांधली ही कल्पना तरी सरदेसायांच्या डोक्यात कशी स्फुरली असावी याविषयीही आता केवळ अंदाज करणेच शक्य आहे. माझा अंदाज पुढे सांगतो. रायगडावर नाणे दरवाजाच्या आत मशीद मोर्चा म्हणून एक जागा आहे. त्याच्या जवळ एक पडीक व ओसाड मशीद पूर्वी होती. अलीकडे काही वर्षांपूर्वी तिचे नूतनीकरण करण्यात आले आहे. मुळातील मशीद कोणी व केव्हा बांधली याविषयी काहीही पुरावा नाही. रायगडावरील सर्वच बांधकाम छत्रपती शिवाजी महारजांच्या कारकीर्दीत झाले असे नाही. तो किल्ला पूर्वीपासून होताच. त्यावरील काही बांधकाम त्यांच्या कारकीर्दीच्या पूर्वीचे आहे. खुद्द महाराजांच्या कारकीर्दीत रायगडावर पूर्वीपासूनची किंवा नव्याने बांधलेली मशीद होती असे म्हणण्यासही काही पुरावा नाही. १६८९ पासून १७०७ पर्यंत रायगड मुघलांच्या ताब्यात होता आणि त्यापुढे १७३३ पर्यंत तो सिद्दीच्या ताब्यात होता. १७३३ मध्ये तो मराठ्यांच्या ताब्यात आला. रायगडावरील मशीद १६८९ ते १७३३ या कालखंडात बांधली गेली असणेही शक्य आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत रायगडचा किल्लेदार अरब होता.[१२१] ती मशीद तेव्हाही बांधली गेली असणे शक्य आहे. पण रायगडावर जे जे बांधकाम झाले ते सर्व शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतच झाले असे एखाद्याला वाटू लागल्यास नवल नाही. माझा अंदाज असा आहे की रायगडावर एक मशीद आहे हे सरदेसायांना समजले असावे आणि त्यावरून ती शिवाजी महाराजांनी बांधली असली पाहिजे असा तर्क त्यांनी केला असावा. माझा अंदाज बरोबर असो अथवा नसो, किंवा कोणाला पटो अथवा न पटो, रायगडावर शिवाजी महाराजांनी मशीद बांधली होती हे सरदेसायांचे विधान निराधारच आहे. एकवेळ सर्वसामान्य विधानाला पुरावा न दिला तरी चालू शकेल पण असामान्य विधानाला पुरावा दिलाच पाहिजे. उदाहरणार्थ, अकबर बादशाह सूर्योपासना करीत असे हे विधान घ्या. ते विधान असामान्य आहे खरे, पण त्याला उत्तम पुरावे आहेत.

ते पुरावे कदाचित कोणाला विश्वसनीय वाटणारही नाहीत, पण त्या विधानाला पुरावेच नाहीत असे नाही. समजा, पुण्यातील कसबा गणपतीचे औरंगजेबाने दर्शन घेतले, आणि त्या देवळाला काही इनाम दिले, असे एखाद्याला म्हणावेसे वाटले तर त्याचे ते विधान असामान्य म्हणावे लागेल आणि त्याला पुरावा द्यावा लागेल. तो पुरावा विश्वसनीय आहे का, खरा आहे की बनावट आहे, याचे परीक्षण करणे ही नंतरची गोष्ट आहे, पण पुरावा देणे आवश्यक आहे. त्याच न्यायाने जर एखाद्याने 'शिवाजी महाराजांनी मशीद बांधली किंवा चर्च बांधले' असे विधान केले तर त्याला पुरावा दिलाच पाहिजे; दिला नसेल तर ते विधान विचारात घेता येणार नाही, किंबहुना त्याज्यच मानावे लागेल.

अफजलखानाची कबर

वर उल्लेखिलेल्या पोस्टमधील शेवटचे विधान शिवाजी महाराजांच्या मुसलमान सेवकांविषयी नाही, पण ते त्याच पोस्टमधील विधान असल्याने त्याचेही परीक्षण इथेच करतो. विधान असे आहे :

(११) ''अफजल खानाला मारल्यानंतर शिवाजी महाराज प्रतापगडावर गेले. जिजाऊनी विचारलेः अफजल खानाचे काय झाले? महाराज उत्तरलेः मासाहेब अफजल खान मारला गेला. त्याचं प्रेत कुठे आहे? प्रतापगडच्या पायथ्याशी. काय म्हणाल्या जिजाऊ? शिवबा अफजल खान जिवंत असेपर्यंत त्याच्याशी वैर होते. अफजल खान संपला (मेला) आता वैरही संपले. अन तुज्या राज्यात कोण्या प्रेताला कोल्ह्या-कुत्र्याने तोडावे हे शोभणार नाही. त्याच्या प्रेताचे सन्मानाने दफन कर आणि तुज्या विजयाचे प्रतीक म्हणून तेथे स्मारक बांध. शिवाजी महाराजांनी अफजल खानाच्या प्रेताचे प्रतापगडाच्या पायथ्याशी दफन केले व तेथे त्याची कबर बांधली. शिवाजी महाराजांनी ती कबर बांधली.''

वरील सर्व हकिगत धादांत खोटी आहे. अफजल खानाच्या मृत्यूनंतर प्रेताचे काय झाले ते मी पुढे सांगणार आहे, तत्पूर्वी एका गैरसमजुतीचे निराकरण करतो. शिवाजी महाराज आपल्या आईला मांसाहेब म्हणत असत असे बरेचदा कथाकादंबऱ्यांमध्ये दाखवले जाते आणि तशी गैरसमजूतही आहे. शिवाजी

महाराजांच्या विश्वसनीय पत्रांमध्ये त्यांच्या आईचा उल्लेख येतो तेव्हा ते तो मातुश्री साहेब किंवा आऊसाहेब किंवा आईसाहेब असा करतात, कधीही मांसाहेब असा करत नाहीत.[१२२] उदाहरणार्थ :

१. ''सौभाग्यवती मातुश्री साहेबांच्या पायांची आण असे.'' शिचसा १, लेखांक ८८ (१६५४).

२. ''व मातुश्रीसाहेबांची आण असे.'' शिचसा २, लेखांक २५३ (१६७१-७२).

३. ''पूर्वी मातुश्री आऊसाहेबी मजरा करावयाविषई सांगितले होते.'' पेद ३१, पत्र क्र. ४१ (१६७९).

४. ''व आईसाहेबांची आण असे.'' शिचसा २, लेखांक २५३ (१६७१-७२).

प्रत्यक्ष आपल्या आईशी बोलताना ते तिला कसे संबोधीत असत ते समजण्यास काही मार्ग नाही. पण पत्रांमध्ये जर ते आपल्या आईचा उल्लेख वरीलप्रमाणे करीत होते तर तिच्याशी बोलताना ते तिचा उल्लेख आई, आऊ, आईसाहेब किंवा आऊसाहेब असाच करीत असले पाहिजेत असे समजण्यास हरकत नाही. ते आपल्या आईला मांसाहेब म्हणत असत असे मानण्यास तर काहीच पुरावा नाही.

आता अफजल खानाच्या कबरीविषयी सांगतो. कोणत्याही शिवकालीन पत्रांमध्ये, शिवभारत, शिवराजभूषण, अलीनामा, तारीख-इ अली आदिलशाही, आलमगीरनामा, इत्यादी शिवकालीन ग्रंथांमध्ये आणि जेधे शकावलीसारख्या विश्वसनीय साधनांमध्ये अफजल खानाच्या कबरीचा उल्लेख नाही. अफजलखानवधाची हकिगत सभासद बखरीत (पृ. १६) आहे, पण त्याची कबर बांधली असा काही उल्लेख त्या बखरीत नाही. शिवाजी महाराजांनी पोलादी वाघनखांनी अफजल खानाची आतडी बाहेर काढल्यावर खानाच्या पालखीचे भोई खानाला पालखीत घालून पळवू लागले तेव्हा जीवा महाला वगैरेंनी भोयांच्या पायांच्या शिरा कापल्या, पालखी पडली आणि ''राजश्री स्वामी [म्हणजे शिवाजी महाराज] आलियावरी अफजलखानाचे सीर कापविले'' असे वर्णन जेधे करिन्यात

केले आहे.[१२३] त्यात सांगितलेली अफजल खानाच्या शवाविषयीची पुढील हकिगत अशी आहे : ''अफजल खानाच्या सिरास पिंजरा करून त्यात घालून राजगडच्या बालेकिलाच्या दरवाजियावरी कोनाडियात ठेवावयास पाठविले. पूजा नैवेद्य चालविला.''[१२४] अफजलखानाच्या धडाचे काय झाले ते जेधे करिन्यात सांगितलेले नाही आणि त्याची कबर बांधण्यात आली असाही काही उल्लेख त्यात नाही. अफजलखानाचा देह भोई पालखीत घालून नेत होते तेव्हा तो मेलेला असेल किंवा निदान आसन्नमरण तरी असेल. अशा स्थितीत त्याचे मुंडके कापविणे हा काही त्याचा सन्मान नव्हता. नंतर ते राजगडला बालेकिल्ल्याच्या दरवाजावर कोनाड्यात ठेवण्यास पाठविण्यात आले. त्याच्या मुंडक्याचे असे प्रदर्शन ही एक प्रकारे त्याच्या प्रेताची विटंबनाच म्हटली पाहिजे. जेधे करिन्यात राजाराम महाराज जिंजीला जातात आणि शाहू महाराज कैद होतात इथपर्यंतची हकिगत आहे. तो १७०० सालानंतर लिहिलेला असावा. त्याच्या लेखकाने जेधे शकावलीतील माहितीत जागोजागी स्वतःच्या कल्पनेने भर घातली आहे.[१२५] अफजलखानाचे मुंडके राजगडावर पाठविण्यात आले ही करिन्यातील हकिगतही बहुधा कपोलकल्पितच असावी. ती खरी मानली तरी त्याचे मुंडके ज्या कोनाड्यात ठेवण्यात आले तिथे पूजा नैवेद्य चालविण्यात आला यात काही आश्चर्य नाही. हिंदू लोक देवदेवतांना नैवेद्य ठेवतात तसाच वेताळ, खवीस, समंध, भुतेखोते यांच्यासारख्या त्यांच्या कल्पनेतील दुष्ट शक्तींनाही ठेवतात.

शिवाजी महाराजांनी अफजलखानास ठार मारल्याचे सांगितल्यावर चिटणीस बखर पुढे काय म्हणते पहा :

''भोई व खिजमतगार यांणी जलदी करून खानाचा मुर्दा पालखीत घालून चालविला. हे पाहून येसाजी कंक व तानाजी मालुसरे यांणी जलदी करून, महाराजांस [भेटीच्या जागेतून] बाहेर काढून देऊन भोयांच्या कुच्या केल्या आणि खानाचे डोचके कापून रुमालात घेऊन आले.''[१२६]

''याप्रमाणे महाराजांनी यश घेऊन मातुश्रींचे दर्शनास गेले. मातुश्रींनी पोटाशी धरून 'संभाजीचा सूड घेतलास, माझे डोळ्याचे पारणे फेडिले व शिपाईगिरीची शर्त

केली आणि देवांनी खैर केली, भेटी जाली, आजचा दिवस सोन्याचा उगवला!' ऐसे बोलली आणि महाराजांवरून लिंबलोण करून सतका करविला.''[१२७]

''महाराजांनी किल्ल्याचे खाली अफजल बुडविला. त्या बुरजाचे नाव अफजल बुरूज ठेविले. अफजल याचे डोचके त्या बुरजाखाली पुरविले.''[१२८]

अफजलखानाची कबर बांधली असा उल्लेख चिटणीस बखरीत नाही.

अफजलखानाची कबर बांधली असा उल्लेख एक्याण्णव कलमी बखरीच्या कोणत्याही प्रतीत नाही, उलट खानाने तुळजापूरच्या भवानीस उपद्रव केला होता म्हणून त्याच्या प्रेताची विटंबना करण्यात आली अशाच आशयाचे वर्णन त्या बखरीत आहे. पुढील उतारे पहा :

भारतवर्ष प्रत : ''त्यानंतर पालखीत खानाचा मुर्दा गडावर आणिला. श्री तुळजापुरास उपद्रव श्री भवानीस केला म्हणोन xxx लोखंडाची मेख मारून शिर दरवाजावर बांधले.[१२९]

राजवाडे प्रत : ''त्याउपर पालखीसमेत मुर्दा खानाचा गडावर आणिला. तुळजापुरास उपद्रव श्री भवानीस केला म्हणून xxx मेख लोखंडाची ताऊन सीर दर्वजियावर बांधले.''[१३०]

लोखंडाची मेख मारल्याचा उल्लेख वरील दोन प्रतींमध्ये आहे. साने प्रत, फॉरेस्ट प्रत आणि सरकार प्रत या प्रतींमध्ये 'खानाने तुळजापूरच्या देवीस उपद्रव दिला असल्याने त्याचे मुंडके किल्ल्याच्या दरवाजावर टांगण्यात आले' अशा आशयाची हकिगत आहे.

अफजलखानाची कबर बांधल्याचा जुन्यातला जुना उल्लेख शेडगावकर बखरीत आहे.[१३१] तो असा आहे : ''शिवाजीराजे प्रतापगडावर गेले नंतर अफजलखान याचे शिर बुरुजात पुरून टाकविले. त्या दिवसापासून बुरजाचे नाव आबदुल्या बुरूज ठेविले. त्याचे धड कचेरीलगत दफणाऊन कबर बांधविली व सैर बंडा पटाईत [म्हणजे दांडपट्टेवाला] यास दफणाऊन टाकिला.''[१३२]

अफजलखानाची कबर बांधल्याचा त्या बखरीतील उल्लेख कदाचित काल्पनिक असेल. सातारा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरच्या १८८५ च्या आवृत्तीत

प्रतापगडाचे जे वर्णन दिले आहे (पृ. ५४५-४७) त्यात अफजल खानाच्या थडग्याचा उल्लेख नाही. त्याच गॅझेटिअरच्या १९६३ च्या आवृत्तीत (पृ. ८७५) मात्र अफजल खानाच्या दर्ग्याचा (म्हणजे कबरीचा) उल्लेख आहे. तो दर्गा कोणी व केव्हा बांधला ते तिथे नमूद केलेले नाही. सय्यद बंडाच्या थडग्याचा उल्लेख त्याही आवृत्तीत नाही.

अफजल खानाचे म्हटले जाणारे एक थडगे प्रतापगड ज्या डोंगरावर आहे त्या डोंगराच्या पायथ्यापासून वर एका सपाटीवर आहे. श्री. द.ब. पारसनीस यांच्या १९१६ मध्ये प्रकाशित झालेल्या Mahabaleshvar या इंग्रजी पुस्तकात पृ. १४४ समोर त्या थडग्याचे छायाचित्र छापले आहे. तेव्हा त्या थडग्याच्या भोवती सहा वासे पुरून वर नळ्याच्या कौलांचे एक छप्पर तेवढे होते, भोवताली भिंती किंवा अन्य बांधकाम नव्हते. त्यानंतर केव्हातरी थडग्याभोवती इमारत बांधण्यात आली आहे आणि सय्यद बंडाचे थडगे म्हणून एक नवीनच थडगे मूळ थडग्याशेजारी उगवले आहे.

सारांश, अफजलखानवधानंतर शिवाजी महाराजांनी जिजामातेच्या सांगण्यावरून अफजलखानाचे सन्मानपूर्वक दफन करून त्याची कबर बांधली हे वरील पोस्टमधील विधान कपोलकल्पित आहे. उलट, त्याने तुळजापुरास उपद्रव दिला होता म्हणून त्याच्या प्रेताची विटंबनाच करण्यात आली असे उपलब्ध पुरावे सांगतात.

शिवाजी महाराजांचे ख्रिस्ती सेवक

शिवकालात भारतातील निरनिराळ्या राज्यकर्त्यांकडे युरोपच्या विविध देशांमधील माणसे, विशेषतः विशेषज्ञ (specialists) म्हणून नोकरीला असत. उदाहरणार्थ फ्रांस्वा बर्निए हा फ्रेंच डॉक्टर थोडे दिवस दादा शुकोहकडे, नंतर औरंगजेब बादशाहाकडे, आणि मग दानिश्मंदखान नावाच्या मुघल मनसबदाराकडे, नोकरीस होता. इटलीतील व्हेनिस या नगरराज्यातून भारतात आलेला निकोलाओ मानुची याने प्रथम मुघल शाहजादा दादा शुकोहकडे, नंतर काही काळाने मिर्झा राजा

जयसिंगाकडे, त्यानंतर जयसिंगाचा मुलगा कीरतसिंग याच्याकडे, पुढे मुघल शाहजादा शाह आलम याच्याकडे (१६७८–१६८१, १६८४–८५), आणि मग कुत्बशाहाकडे नोकरी केली होती.[१३३] मानुचीला दारा शुकोहकडे नोकरी मिळाली ती दाराच्या तोफखान्यात नोकरीला असलेल्या क्लोद मेले नावाच्या फ्रेंच इसमाच्या ओळखीने.[१३४] मानुची कुत्बशाहाकडे गेला तेव्हा कुत्बशाहाचा फ्रेंच डॉक्टर द एस्त्रेमोंत नुकताच मरण पावला होता असा उल्लेख त्याने केला आहे.[१३५]

शिवाजी महाराजांच्या ख्रिस्ती सेवकांपैकी दोघांचीच नावे ज्ञात आहेत : रुय लैतांव व्हियेगश आणि त्याचा मुलगा फेर्नांव व्हियेगश. महाराजांनी १६५७–५८ च्या उत्तर कोकणातील मोहिमेत जो मुलूख काबीज केला त्यामुळे सुमारे शंभर किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा त्यांच्या ताब्यात आला आणि त्यांनी आरमार बाधंण्यास सुरुवात केली. मागे सांगितल्याप्रमाणे नाविक युद्धाचा काहीच अनुभव त्या काळातील हिंदूंना नव्हता आणि अर्थातच युद्धनौका बांधण्याचाही नव्हता. त्यामुळे, त्यांनी कल्याण, भिवंडी व पेण येथे युद्धनौका बांधण्याचे जे काम सुरू केले त्याची जबाबदारी त्यांनी रुय लैतांव व्हियेगश आणि त्याचा मुलगा फेर्नांव व्हियेगश यांच्यावर सोपविली होती असे तत्कालीन पोर्तुगीज कागदपत्रांवरून दिसून येते. त्यांच्या हाताखाली सुमारे तीनशेचाळीस पोर्तुगीज व टोपॅझ (म्हणजे एतद्देशीय ख्रिस्ती किंवा पोर्तुगीज पुरुष व एतद्देशीय स्त्रिया यांच्यापासून झालेले मिश्रवंशीय ख्रिस्ती अथवा त्यांचे वंशज) काम करीत होते आणि त्यांपैकी काही पोर्तुगिजांच्या नोकरीतून पळून आले होते. त्या लोकांची बायकामुले व नोकरी मिळून ती चारशेपेक्षा अधिक माणसे होती. वसईचा पोर्तुगीज कॅप्टन आंतोनियु द मेलु द काश्त्रु याला त्या गोष्टीची कल्पना होती. ''रुय लैतांव (व्हियेगश) याने त्या झेंतीऊला [म्हणजे हिंदूला, शिवाजी महाराजांना] सोडून द्यावे आणि स्वतःच्या टोळीतील इतर सर्व लोकांसह या शहरास [म्हणजे वसईला] यावे याकरिता त्याला देव व राजा यांच्या सेवेची सोईस्कर कारणे सांगून योग्य मार्गावर'' आणण्याकरिता द काश्त्रु याने जुआंव द सालाझार द व्हाश्कोंसेलुश याला कल्याणला पाठविले. त्याने ती कामगिरी चोख बजावली. त्या सर्वांनी शिवाजी महाराजांची नोकरी सोडून

पोर्तुगालच्या राजाची सेवा करण्यास यावे म्हणून त्याने त्यांचे मन वळविले आणि ती सर्व माणसे पळून पोर्तुगिजांच्या ताब्यातील मुलखात गेली. हा प्रसंग १६५९ मधील आहे.[१३६] ही माणसे फार तर वर्ष–दीड वर्ष शिवाजी महाराजांच्या नोकरीत असावीत असे या हकिगतीवरून दिसते. ती महाराजांच्या नोकरीत होती याचा अर्थ ती शिवाजी महाराजांकरिता युद्धनौका बांधण्याचे काम करीत होती इतकाच आहे; ती सर्व महाराजांकडील हजेरी पटावर होती आणि त्या सर्वांना थेट महाराजांकडून पगार मिळत होता असे नाही. महाराजांनी युद्धनौका बांधण्याचे काम रुय लैतांव व्हियेगश याला मक्त्याने दिले होते आणि ते काम पार पाडण्याकरिता तो ती माणसे घेऊन आला होता असे दिसते. तो केवळ भाडोत्री इसम होता. त्याची शिवाजी महाराजांवर निष्ठा नव्हती हे उघडच आहे. महाराजांनीही धर्मनिरपेक्षता किंवा सर्वधर्मसमभाव अशा काही कल्पनेतून त्याच्यावर काम सोविले होते असा काही निष्कर्ष काढणेही गैरवाजवी होईल. तो तत्रज्ञ होता आणि महाराजांना तंत्रज्ञाची गरज होती. तो त्याची माणसे घेऊन पळून गेला तरी महाराजांनी त्यांचा आरमारी उद्योग चालूच ठेवला.

पुढेही शिवाजी महाराजांकडे काही पोर्तुगीज नोकरीला होते असे गोव्याच्या विजरईने मिर्झा राजा जयसिंग याला पाठविलेल्या ३१ मार्च १६६५ या तारखेच्या पत्रावरून दिसते. त्या पत्रातील जरुरीपुरता उतारा असा आहे :

''त्याने [म्हणजे शिवाजी महाराजांनी] काही पोर्तुगीज नोकरीस ठेवले आहेत एवढ्यावरून माझी त्या गोष्टीस संमती आहे असे सिद्ध होत नाही. माझ्या परवानगीशिवाय अनेक पोर्तुगीज मुघल बादशाहाच्या मुलखात [म्हणजे नोकरीस] आहेत. काहीजण त्यांनी केलेल्या गुन्ह्यांमुळे [तिथे पळून गेले आहेत] आणि इतर कर्तव्याच्या जाणिवेच्या अभावामुळे. त्यांना प्रतिबंध करणे माझ्या हातात नाही. त्याचप्रमाणे आदिलशाहाच्या राज्यात, गोवळकोंड्यात आणि कॅनरात अनेक पोर्तुगीज आहेत ते तुम्हाला ठाऊक असेल. त्यावरून हे दिसून येईल की [मला शक्य असते तर] एवढे सैनिक मी माझ्या हातून जाऊन दिले नसते कारण माझ्या शत्रूंना शिक्षा करण्याकरिता मला त्यांचा उपयोग करता आला असता.''[१३७]

शिवाजी महाराजांनी काही पोर्तुगीज नोकरीस ठेवले आहेत अशी तक्रार जयसिंगाने पोर्तुगीज विजरईकडे केली होती आणि ती खरी होती असे वरील पत्रावरून दिसून येते. या पोर्तुगिजांविषयी अधिक काही तपशील ज्ञात नाही. किल्ल्यांवर ठेवण्याकरिता तोफा ओतणे, तोफा चालविणे, युद्धनौका बांधणे, अशी काही तांत्रिक स्वरूपाची कामे त्यांच्यावर सोपविली असावीत असे वाटते.

शिवाजी महाराजांकडे युरोपीय तंत्रज्ञ नोकरीला होते अशा आशयाचा उल्लेख त्यांनी त्यांच्या कर्नाटक मोहिमेत फोर्ट सेंट जॉर्जचा, म्हणजेच मद्रासचा, इंग्रज गव्हर्नर विल्यम लँगहॉर्न याला पाठविलेल्या २२ सप्टेंबर १६७७ या तारखेच्या पत्रातही आला आहे. मूळ पत्र उपलब्ध नाही, पण इंग्रजांनी त्याचा त्याच वेळी करून घेतलेला इंग्रजी अनुवाद उपलब्ध आहे. त्याचा मराठी अनुवाद असा आहे :

‘‘मी कर्नाटक प्रदेशात आल्यापासून अनेक किल्ले व कोट जिंकले आहेत आणि अनेक किल्लेकोटांमध्ये नवीन बांधकामे करण्याचा माझा बेत आहे. तोफांकरिता मोठे गाडे कसे तयार करावेत आणि सुरुंग कसे तयार करावेत हे जाणणारी माणसे बहुधा तुमच्याकडे असतील. आम्हाला सध्या अशा माणसांची, विशेषतः सुरुंग कसे तयार करावेत आणि दगडी भिंती कशा उडवून द्याव्यात हे जाणणाऱ्या माणसांची, गरज आहे. गोव्याकडून आणि वेंगुर्ल्याकडून आलेली अशी माणसे माझ्याकडे आहेत आणि त्या सर्वांना माझ्या अनेक किल्लेकोटांमध्ये कामावर ठेवण्यात आले आहे. अशा आणखी माणसांकरिता मी त्यांच्याकडे चौकशी केली तेव्हा ती सर्व चिनापट्टणला व पुलिकतला गेल्याचे त्यांनी मला सांगितले. म्हणून मी आपल्याला लिहितो आहे की आपल्याकडे सुरुंग कसे तयार करावेत हे जाणणारी माणसे आहेत का याची कृपया चौकशी करावी आणि अशी २०–२५ किंवा निदान ५–१० माणसे [माझ्याकडे] पाठवावीत. मी त्यांना चांगला पगार देऊन माझ्या अनेक किल्लेकोटांमध्ये ठेवीन आणि आपलाही आभारी होईन. म्हणून आपण सर्व प्रकारे अशा माणसांविषयी चौकशी करावी आणि जेवढी मिळतील तेवढी इकडे पाठवावीत.’’[१३८]

ज्या प्रकारच्या तंत्रज्ञांचा या पत्रात उल्लेख आहे ते युरोपीय होते असे त्यात स्पष्ट म्हटलेले नाही, पण तिथे युरोपीय तंत्रज्ञच अभिप्रेत होते असे संदर्भावरून दिसते. या तंत्रज्ञांविषयी अधिक काही तपशील उपलब्ध नाही.

संदर्भ टीपा

१. अशी फुगवून टक्केवारी सांगितल्याची अनेक उदाहरणे आहेत. स्थलाभावास्तव फक्त एकच उदाहरण देतो. एका दैनिकाच्या २० एप्रिल २०१८ च्या अंकात एका व्याख्यानाची बातमी आहे. तिच्यात व्याख्यानाचा जो गोषवारा दिला आहे त्यात पुढील उल्लेख आहे. ''महाराजांच्या स्वराज्यातील प्रशासनातील ९० टक्के मुस्लिम होते.'' त्यानंतर त्याच वृत्तपत्राच्या २३ एप्रिल २०१८ च्या अंकात पुढील खुलासा छापला आहेः ''दि. २० एप्रिल रोजीच्या 'दै. पुण्यनगरी'च्या प्रसिद्ध झालेल्या अंकातील पान क्र. १० वरील बातमीत नजरचुकीने महाराजांच्या स्वराज्यातील प्रशासनात नव्वद टक्के मुस्लिम होते असा उल्लेख झाला आहे. त्याऐवजी महाराजांच्या स्वराज्यातील प्रशासनात मुस्लिमांचा सहभाग होता असे वाचावे....'' म्हणजे ''मुस्लिमांचा सहभाग होता'' याऐवजी ''९० टक्के मुस्लिम होते'' ही नजरचूक मानायची आहे तर! की ती पश्चातबुद्धी आहे? ज्यांनी बातमी वाचली पण खुलासा वाचला नाही त्यांची काय समजूत होईल?
२. सभासद बखर, पृ. ७०-७२; जेधे शकावली (शिचप्र, पृ. २५)
३. जेधे शकावली (शिचप्र, पृ.२५); *English Records on Shivaji,* Vol.I, Letter Nos. 307, 308, 313.
४. मइसा, खंड ८, लेखांक १०.
५. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४)
६. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४)
७. मइसा, खंड ८, लेखांक ९.
८. शिचसा, खंड २, लेखांक २२०; मइसा, खंड १५, लेखांक १३४.
९. पर्णाल, ५.५७, ९६, १०६-०७.
१०. पुद, भाग ३, लेखांक १५४.
११. शिचसा, खंड १, लेखांक ३०.
१२. आधार देताना बरेच संक्षेप वापरले आहेत.
१३. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ७४१ (व तळटीप ५१७), ७४२-४३ (व तळटीप ५२०.)
१४. सभासद बखर, पृ. ६.
१५. मइसा, खंड ८ मध्ये उटळूर असे छापले आहे. ती वाचनाची चूक आहे.

तिथे उटतूर असे वाचायला हवे, असे श्री. अजित पटवर्धन यांनी 'कोट–उटळूर नव्हे, कोट–उटतूर' या त्यांच्या लेखात दाखवून दिले आहे आणि तो कोट कुठे आहे तेही सांगितले आहे. (भा.इ.सं.मं.चे त्रैमासिक, वर्ष ९१, अंक १–४ एकच, शक १८३६, पृ. ५१ ते ५६.) तटसरनौबत या पदाकरिता 'शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक' या विभागाच्या शेवटी दिलेल्या टीपांपैकी टीप क्र. १ पहा.

१६. या पदाकरिता 'शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक' या विभागाच्या शेवटी दिलेल्या स्पष्टीकरण टीपांपैकी टीप क्र. २ पहा.

१७. रजपूत या शब्दाच्या अर्थाकरिता 'शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक' या विभागाच्या शेवटी दिलेल्या स्पष्टीकरण टीपांपैकी टीप क्र. ३ पहा.

१७ *. शिचसा, खंड ५ मधील लेखांक ७७३ मध्ये मोसे खोऱ्याच्या खासनिसांच्या एका करिन्यातील काही भाग छापला आहे. तो शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत शुहूर सन १०५२ मध्ये (इ.स. १६५१–५२) झालेल्या महजरातील हकीगतीशी चांगला जुळतो. (श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. ९६२–६३ मधील तळटीप क्र. ९ पहा. महजराकरिता त्या भागातील पृ. ९६० पहा.) म्हणून मी करिन्याचा तो भाग विश्वसनीय मानतो. त्यात ''ते समई कावजी मल्हार सेवा करावयास महाराज शिवाजीराजेसाहेबांकडे गेले'' असा उल्लेख आहे. म्हणून करीना जरी उत्तरकालीन असला तरी कावजी मल्हाराचे नाव मी शिवाजी महाराजांच्या हिंदू सेवकांच्या यादीत दाखल केले आहे.

१८. शिवाजी महाराजांच्या राज्यातील सुभ्यांकरिता 'शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक' या विभागाच्या शेवटी दिलेल्या टीपांपैकी स्पष्टीकरण टीप क्र. ४ पहा.

१८*. छत्रपती शाहू महाराजांनी चिमणाजी पंडित सचीव यास आनसोजी बिन कोयाजी बांदल यास हिरडस मावळ तर्फेतील आळंदे या गावी असलेल्या इनाम जमिनीविषयी लिहिलेले १८ डिसेंबर १७४१ या तारखेचे पत्र शिचसा खंड ५ मध्ये लेखांक ७७४ म्हणून प्रकाशित झाले आहे. त्यात आनसोजीने शाहू महाराजांकडे येऊन केलेली जी विनंती सुरुवातीस उद्धृत केली आहे ती अशीः ''शास्ताखान दिलीहून मोहीम करून पुणियाचे मुकामास आले होते. खासा राजमाहालात येऊन राहिले ते समयी श्रीमंत कैलासवासी थोरले माहाराज [म्हणजे शिवाजी महाराज] जातीनसी राजगडाहून स्वार होऊन रात्रीस धारकरी लोक पायउतारा होऊन

रंगमहालात प्रवेश करून गर्दी केली. ते वेळेस माझा पणजा कोयाजी बांदल याणे मोगलाचे लोकांवर वार केले. त्यासही सन्मुख चार वार लागले. याजकरिता [शिवाजी] महाराज कृपाळू होऊन मौजे मजकुरी [म्हणजे उपर्युक्त गावी] नूतन इनाम जमीन रकम कास टके साडेसत्रा दिल्हे. ...मौजे मजकुरी आपले घर दग्ध जाले त्या वतनी कागद व जमिनीचे कागदपत्र होते ते दग्ध जाले.... त्यास माझा वडील [म्हणजे पूर्वज] स्वामिकार्यास आला म्हणौन त्यास [शिवाजी] माहाराजांनी इनाम दिल्हे ते माझे मजकडे चालऊन भोगवटियास राजपत्रे करून दिल्ही पाहिजेत.'' त्यावर हिरडस मावळच्या देशपांड्यांनीही आनसोजीच्या बाजूने साक्ष दिली असे नमूद करून कोयाजी बांदल याला दिलेले इनाम त्याच्या वंशजांकडे चालवावे असा हुकूम शाहू महाराजांनी त्या पत्रात केला आहे. पत्राच्या खरेपणाविषयी शंका घेण्यास काही कारण दिसत नाही. म्हणून मी त्या पत्राच्या आधारे कोयाजी बांदल याचे नाव शिवाजी महाराजांच्या हिंदू सेवकांमध्ये समाविष्ट केले आहे.

१९. या पदाकरिता 'शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक' या विभागाच्या शेवटी दिलेल्या स्पष्टीकरण टीपांपैकी टीप क्र. ५ पहा.

१९*. कावजी मल्हार याच्यावरील टीपेत शिचसा, खंड ५, लेखांक ७७३ मधील करिन्याचा उल्लेख आहे. त्यात ''बाजी येशवंतराव बेलसरचे स्वारीस गेले ते तिकडेच युद्धात ठार पडिले'' असा उल्लेख आहे. बाजी यशवंतराव म्हणजेच बाजी पासलकर. यशवंतराव हा त्या घराण्यातील प्रमुख पुरुषास अनुलक्षून वापरला जाणारा किताब आहे. शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत शुहूर सन १०५२ मध्ये (इ.स. १६५१-५२) झालेल्या महजरात ''बाजी यसवंतराव पडिला'' असा उल्लेख आहे. (श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ६८३-८४ मधील तळटीप क्र. ३२३ पहा.) अर्थात बाजी यशवंतराव शुहूर सन १०५२ च्या अखेरीपूर्वी, म्हणजे २३ मे १६५२ पूर्वी, धारातीर्थी पडला होता.

२०. या पदाकरिता 'शिवाजी महाराजांचे हिंदू सेवक' या विभागाच्या शेवटी दिलेल्या स्पष्टीकरण टीपांपैकी टीप ३ मधील उदाहरण (१) पहा.

२१. मइसा, खंड ८, लेखांक ३५. ते पत्र शिवछत्रपतींची पत्रे, खंड १ मध्ये पत्र क्र. ५६ (पृ. १७४-७७) म्हणून छायाचित्रासह छापले आहे.

२२. मइसा, खंड ८, लेखांक ३३, ३६. ही पत्रे शिवछत्रपतींची पत्रे, खंड १ मध्ये पत्र क्र. ५७ व ५८ म्हणून त्यांच्या छायाचित्रांसह छापली आहे.

मइसा, खंड ८, लेखांक ३३ मध्ये मूळ पत्रातील काही मजकूर गळाला आहे हे छायाचित्रावरून दिसून येते.

२३. शिचसा, खंड १२, लेखांक १२८.

२४. ते पत्र ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ मध्ये, लेखांक ११९ (पृ. ११९) म्हणून छापले आहे. पत्रात प्रेषकाचे नाव नाही. पण कोनाड्यात वाटोळा शिक्का आहे. त्या शिक्क्यातील मजकूर छापील पाठात दिलेला नाही. पत्राचे संपादक स. ग. जोशी यांनी पत्र बाजी सर्जेराव जेधे याचे असल्याचे प्रस्ताविकात सांगितले आहे. ते त्यांनी शिक्क्यावरून ठरविले असावे. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकात हप्त्यांनी छापण्यात आला, स्वतंत्र पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित झाला नाही. प्रस्तुत पत्र मंडळाच्या त्रैमासिक वर्ष १०, अंक ३ मध्ये समाविष्ट केलेल्या हप्त्यात आहे.

२५. या रूपांतरात जो मजकूर मुळाप्रमाणे ठेवला आहे तो एकेरी अवतरणात आहे.

२६. बजिद हे ब-जिद्द या अरबी-फार्सी शब्दाचे मराठी रूप आहे. बजिद म्हणजे जिद्दीने, आग्रहपूर्वक. गयावया करून, काकुळतीला येऊन असेही अर्थ मराठीत त्या शब्दाला प्राप्त झाले आहेत; इथे तेच अभिप्रेत आहेत.

२७. तोग हे तौक (म्हजणे कडे, कडी, साखळी) या अरबी शब्दाचे मराठी रूप आहे.

२८. पत्राचा मूळ पाठ शिचसा, खंड १४ मध्ये पत्र क्र. १४ म्हणून छापला आहे. तत्पूर्वी आणखी दोन ठिकाणी ते पत्र छापले गेले आहे. तपशिलाकरिता श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ७२३-२४ मधील तळटीप क्र. ४५१ पहा.

२९. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ७२७.

३०. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २२४, २८६ व त्यातील तळटीप ९१७.

३१. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २८८.

३२. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २८७-८८.

३३. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ.२८७-८८.

३४. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २८८.

३५. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २९८.

३६. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २९८.

३७. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २९९.
३८. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. २९९-३०० मधील तळटीप क्र. ९८१.
३९. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ३००-३०४.
४०. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ३०४-०५.
४१. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ३०५.
४२. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ६०८.
४३. श्री राजा शिवछत्रपती, भाग २, परिशिष्ट क्र. २५ (पृ. ८८०-८२).
४४. ऐ. फा. सा., खंड ५, भाग १, पृ. १४२.
४५. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ३०५, तळटीप क्र. ९९७ मधील उदाहरण क्र. २.
४६. शिचसा, खंड ६, लेखांक ६८.
४७. शिचसा, खंड ६, लेखांक ६९.
४८. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ३०५, तळटीप क्र. ९९७ मधील उदाहरण क्र. ३.
४९. शिचसा, खंड २, लेखांक ११०.
५०. श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. ७४९ व त्यातील तळटीप ३९, ४१.
५१. शिचसा, खंड १, लेखांक ५२.
५२. *Shivaji : His Life and Times,* pp. 349-50.
५३. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ३२६.
५४. शिवभारत, अ. २६, श्लोक २७-३७.
५५. शिवभारतात (२१.७१) सूर्याजी किंवा सूर्यराव काकडे याचीही गणना महाराजांच्या अंगरक्षकांमध्ये केली आहे. सभासद बखरीत (पृ. ७१-७२) साल्हेरच्या लढाईच्या वर्णनात त्यालाही ''मोठा लष्करी धारकरी'' म्हटले आहे. अंगरक्षक म्हणून मोठ्या धारकऱ्यांची नेमणूक व्हावी हे स्वाभाविकच आहे.
५६. सभासद बखरीत (पृ. ६५) शिवाजी महाराजांच्या आरमार स्थापनेची जी हकीगत सांगितली चाहे. तिच्यात आरमाराचे सुभेदार म्हणून दर्यासारंग आणि मायनाईक अशी दोनच नावे आहेत; इब्राहमखानाचे नाव तिथे नाही.
५७. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ६९२-९३.
५८. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ७३७-४०.

५९. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ६९९–७०४, ७६९.
६०. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ७७३–७४ व त्यातील तळटीप ६४४.
६१. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ८५१–६५.
६२. मराठी अनुवाद : निवडक लेख [खंड १], पृ. १८८ (पत्र क्र. १४); इंग्रजी अनुवाद : *House of Shivaji,* p.75.
६३. बंगलोर किल्ल्याच्या जवळपासच्या हिंदू मांडलिकांनी जबाबदार आदिलशाही अधिकारी म्हणून शाहजी महाराजांशी संबंध ठेवावा असा अर्थ इथे अभिप्रेत आहे. मनेवार हा मन्नेवाडु किंवा मन्निडु (म्हणजे जमीनदार, सरदार, अधिपती) या तेलगु शब्दाचा अपभ्रंश आहे. दक्षिणेतील हिंदू राजांना उद्देशून, विशेषतः जिंजी, तंजावर व मदुरा येथील राजांना उद्देशून, तो वापरला जाई.
६४. पुर्तूगेझिश इ मराताश, भाग १, पृ. ४. इंग्रजी अनुवाद – *The Portuguese and the Marathas*, p.4.
६५. शिचसा, खंड २, लेखांक १२२ (१६५०); खंड ३, लेखांक ५४७–४८ (१६५०–५१); खंड १४, लेखांक १४ (१६५५); मराठी दफ्तर, रुमाल ३, लेखांक ५ (१६५५). तिथे पाा हा परवानगी या शब्दाचा संक्षेप आहे.
६६. अधिक माहितीकरिता श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ६९४–९५ मधील तळटीप ३५३ आणि शिचसा, खंड १६, पृ. १८० (लेखांक ३२ वरील टीप) पहा.
६७. शिचसा, खंड ७, लेखांक ३८.
६८. सनदापत्रांतील माहिती, पृ. ११४ (लेखांक ५, पृ. ६५६–५७)
६९. पेद, खंड ३१, लेखांक २३.
७०. शिचसा, खंड २, लेखांक १२९.
७१. पुद, भाग ३, पृ. १३०.
७२. शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, पृ. २१२–१३.
७३. Persian text in *Tarabai Papers : A Collection of Persian Letters,* facsimile Nos. 5 and 7 on p.2. English translation – Ibid., Preface, p.vii. नील प्रभू–मुन्शी.
७४. सभासद बखर, पृ. ४८–४९; शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर, पृ. ९८–९९ (कलम ५४).
७५. चिटणीस बखर, पृ. १५७–५८.
७६. शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर, पृ. ९८–१०२ (कलम ५४–५५).

७७. भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक, वर्ष ४, अंक १ ते ४ (एकत्र), पृ. ३७.

७८. त्या शिलालेखाचे मी पाहिलेले छायाचित्र.

७९. त्या शिलालेखाकरिता श्रीनन्द लक्ष्मण बापट यांचा 'रायगडावरील जगदीश्वराच्या अभिलेखाचे पुनर्वाचन' हा लेख पहा. (भाइसंमंचे त्रैमासिक, वर्ष ८६०, अंक१ ते ४ एकत्र, शक १९३२, पृ. ७४-८३).

८०. *Gazetteer of the Bombay Presidency,* VoI. XI : *Kolaba and Janjira,* pp. 359-60; रायगडाची जीवनकथा, तिसरी आवृत्ती, पृ. ७०८.

८१. रायगडची जीवनकथा, तिसरी आवृत्ती, पृ. १२९.

८२. भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक, वर्ष ४, अंक १ ते ४ (एकत्र), पृ. ३६ ,३९.

८३. उदाहरणार्थ : रायगडची जीवनकथा, तिसरी आवृत्ती, पृ. ८. तिथे पुढे कंसात शशि, पृ. २२३ असा आधार दिला आहे. शशि हा रियासतकार सरदेसायांच्या 'शककर्ता शिवाजी' या पुस्तकाच्या नावाचा संक्षेप आहे. तिथे दर्ग्याबद्दल काही म्हटलेले नाही. तिथे केलेले विधान असे आहे : ''मदारी मेहतर या मुसलमान फरासाने आग्ऱ्यास त्याचा जीव वाचविला.'' (मराठी रियासत, खंड १, १९८८ ची आवृत्ती, पृ. ३५८.)

८४. *Shivaji and His Times,* Third edition, p. 402 (footnote), Fourth edition, pp. 368-69 (footnote), Fifth edition, p. 386 (footnote).

८५. मी वापरलेल्या छापील इंग्रजी अनुवादात कोणता अनुवाद हस्तलिखित फार्सी प्रतीतील कोणत्या पृष्ठावरील मजकुराचा आहे ते नमूद केलेले आहे. तिथे नूरखानाचा उल्लेख folio 58b वर म्हणजे ५० व्या पानाच्या पाठीवर म्हणजे १०० व्या पृष्ठावर असल्याचे नमूद केले आहे.

८६. सिद्दी हलालखान हा उल्लेख फार्सी हस्तलिखिताच्या folio 58b व म्हणजेच पृ. ११६ वर आहे.

८७. उदाहरणार्थ : पालीचा महजर (शिवछत्रपतींची पत्रेः खंड १ः पत्र क्र. ७१ः पृ. २५७ पासूनः इ.स. १६७६); शिचसा, खंड २, लेखांक ९८ (१६५८), २१७-१८ (१६६०; लेखांक २१७-१८ हा एकच सलग महजर आहे. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ५९६ मधील तळटीप १९ पहा), २८१ (१६७५). शिचसा, खंड ५, लेखांक ८३६ (१५९७-

९८), ९५० (१६३२), ९५८ (१६८८), ९५९ (१७१०); खंड ७, लेखांक ३२ (१६४३); मइसा, खंड १७, लेखांक ७ (१६३८).

८८. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ६९८–९९ आणि भाग २, परिशिष्ट ३६ (पृ. ९७०–८६) पहा.

८९. श्री राजा शिवछत्रपती, भाग २, परिशिष्ट २१ (पृ. ७३५–८२१) पहा.

९०. शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ६०–६३.

९१. शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ६२–६५.

९२. शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ६६.

९३. शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ६६–६७.

९४. शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ७२–८८.

९५. शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ८९.

९६. शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ९२–९३.

९७. *EFI*, Vol. III (New Series), p.111; श्री छत्रपति संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, द्वितीयावृत्ती, पृ. १११ (इंग्रजी पत्राच्या आधारे).

९८. ऐफासाः खंड ६ः अखबार क्र. २२२.

९९. श्री छत्रपति संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्रः पृ. २९८.

१००. *EFI*, Vol. III (New Series), p.111; ऐफसा, खंड ६, अखबार क्र. ३५५; श्री छत्रपति संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, पृ. ३००.

१०१.उदाहरणार्थ : मक्हूर – औरंगजेबाची नसीरीखानास पत्रे (आदाब–इ आलमगीरी, खंड २, पृ. ७२२–२३, ७१८–१९, ७३१–३३; मराठी अनुवाद – श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ८२७–२८, ८२९–३०, ९३२–३३); ऐफासा, खंड ६, अखबार क्र. १२. मलऊन – औरंगजेबाचे नसरीखानास पत्र (आदाब–इ आलमगीरी, खंड २, पृ. ७१८–१९; मराठी अनुवाद – श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ८२९–३०). बी–आकिबत – औरंगजेबाची नसीरीखानास पत्रे (आदाब–इ आलमगीरी, खंड २, पृ. ७१९–२२, ७३०–३१; मराठी अनुवाद – श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ११४४–४५; भाग १, पृ. ८३३–३४). शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेब अनेकदा संभाजी महाराजांचा उल्लेख काफिरबच्चा (काफिराचा मुलगा) असा करीत असे.

उदाहरणार्थ : ऐफासा, खंड ६, अखबार क्र. ४०६, ४१०, ५२३.

१०२. कुराण, सूरा क्र. ४, आयत क्र. १४४.

१०३. कुराण, सूरा क्र. ९, आयत क्र. ७३; सूरा क्र. ६६, आयत क्र. ९.

१०४. *EFI*, Vol. III (New Series), p.112.

१०५. ऐफासा, खंड ६, अखबार क्र. ३५५.

१०६. मआसिर-इ आलमगीरी, फार्सी पाठ, पृ. २३४; इंग्रजी अनुवाद, पृ. १४३; हिंदी अनुवाद – औरंगज़ेबनामा, दुसरा भाग, पृ. १२७.

१०७. रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी शिवाजी महाराजांकडील फार्सी लेखनिकाचे नाव ''मुल्ला हैदर'' असे देऊन आणि त्याचा आधार पर्णालपर्वतग्रहणाख्यान २.५२ असा देऊन आणखी गोंधळ केला आहे. (मराठी रियासत, खंड १, १९८८ ची आवृत्ती, पृ. ३५८.) पर्णालपर्वतग्रहणाख्यानात अ. २, श्लोक ५२ मध्ये त्याचे नाव काजी हैदर असे आले आहे आणि ते फार्सी लेखनिक म्हणून आलेले नसून महाराजांनी बहादुरखानाकडे पाठविलेला वकील म्हणून आले आहे.

१०८. मआसिर-इ आलमगीरी, फार्सी पाठ, पृ. ५१४; इंग्रजी अनुवाद, पृ. ३०५.

१०९. तिच्या शेवटी पुढील मजकूर आहे : ''कृपा करून हा आपल्या राजाचा इतिहास लोकांसमोर आणून जगाला दाखवा की आपला राजा कुटला धर्माविरुद्ध नसून फक्त अन्यायाविरुद्ध होता. एक आदिवासी मावळा :– जितेन्द्र अनिलराव कुलसुंगे मु.पो. गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड।।'' पोस्ट करणाऱ्याने स्वतःविषयी फोन नंबर वगैरे अधिक काही माहिती दिलेली नाही.

११०. *Shivaji : His Life and Times,* pp. 370-71; सभासद बखर, पृ. ७६–७७.

१११. *Shivaji : His Life and Times,* p. 370.

११२. त्या चित्रसंग्रहाच्या माहितीकरिता श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. २६९–७० पहा.

११३. *Storia do Mogor,* Vol. I, editor's Introduction, p.liv.

११४. श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ९५९ व त्यातील तळटीप क्र. २६०.

११५. *ERS,* Vol.I, letter No.128.

११६. शिचप्र, पृ. २४.

११७. त्या वेळी शिवाजी महाराज आणि आदिलशाह यांच्यात तह होता! तो

१६७२ मध्ये तुटला. जेधे शकावली (शिचप्र, पृ. २४,२६).

११८. या संपूर्ण हकीगतीकरिता *Shivaji : His Life and Times,* pp. 338-39. पहा.

११९. उदाहरणार्थ पहा : *Shivaji the Great,* Vol.I, Part 2, p.480 (Dutch letter).

१२०. *New History of the Marathas,* Vol.I, Revised Edition 1957, p. 275.

१२१. रायगडची जीवनकथा, पृ. १८४ए १८६.

१२२. शिवाजी महाराजांच्या म्हणून केलेल्या एका पत्रात ''जिजाबाई आऊसाहेब'' असा उल्लेख आहे. ते पत्र बनावट आहे. (श्री राजा शिवछत्रपती, भाग २, परिशिष्ट ३७, पृ. ९८७-९७ पहा.) त्यांच्या म्हणून केलेल्या दुसऱ्या एका पत्रात ''आम्ही मातुश्री जिजाईआवाचे पोटी जाहालो'' असा उल्लेख आहे. ''त्या पत्राच्या विश्वसनीयतेविषयी काही अभ्यासकांनी संशय प्रकट केला आहे.... माझे या पत्राविषयीचे मत अद्याप निश्चित झालेले नाही'' असे मी श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. ९९१ मधील तळटीप क्र. १५ मध्ये म्हटले होते. तेही पत्र बनावट आहे अशी माझी आता खात्री पटली आहे. त्या बनावट पत्रांमध्येही मांसाहेब असा उल्लेख नाहीच.

१२३.शिचप्र, पृ. ४४.

१२४.शिचप्र, पृ. ४६.

१२५.उदाहरणार्थ पहा – श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ९१५ मधील तळटीप १११.

१२६. चिटणीस बखर, पृ. ८० कुच्या केल्या म्हणजे पायांच्या शिरा तोडल्या. (मोल्सवर्थच्या मराठी – इंग्रजी शब्दकोशात 'कुचा' पहा.)

१२७. चिटणीस बखर, पृ. ८१.

१२८. चिटणीस बखर, पृ. ८२.

१२९. शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर, पृ. ७२ (कलम ३५). फुल्या मूळ छापील अवतरणातच आहेत.

१३०.शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर, पृ. ७१ (कलम ३५). फुल्या मी दिल्या आहेत. मुळात तिथे तीन अक्षरी शब्द आहे. ताऊन म्हणजे तापवून.

१३१.ती बखर १८५४ मध्ये किंवा त्यानंतर लवकरच लिहिली आहे. (श्री राजा

शिवछत्रपती, भाग १, पृ. १०६-१०७.)

१३२. शेडगावकर बखर, पृ. ३२.

१३३. श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. २५४-६४.

१३४. श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. २५४.

१३५. श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. २६४.

१३६. या सर्व हकीगतीकरिता श्री राजा शिवछत्रपती, भाग १, पृ. ८७३-७८ पहा. तिथे आधार दिलेले आहेत.

१३७. *The Portuguese and the Marathas,* pp.11-12. पत्राची तारीख नव्या पद्धतीची (New Style) आहे. तिच्यातून दहा वजा केले की जुन्या पद्धतीची (Old Style) तारीख मिळेल. या पद्धतींकरिता श्री राजा शिवछत्रपती, भाग २, पृ. ११९-२० पहा.

१३८. *ERS,* Vol. II, letter No.251.

''[तुम्ही] दुसरा विचार करावा होता की श्री महादेवाची व श्री तुलजा भवानीची कृपा त्यावरी [म्हणजे महाराजांवर] पूर्ण जाली आहे. दुस्ट तुरुकाला ते मारितात [आपल्या सैन्यात] ही तुरूक लोकच असतां जये कैसा होतो आणि तुरूक लोक कैसे वाचों पाहतात हा विचार करावा होता आणि युध्याचा प्रसंग पाडावा नव्हता.''

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचा सावत्र भाऊ एकोजी याला लिहिलेल्या पत्रातून.

'' यौवनारंभगृहीतम्लेच्छक्षयदीक्षा''
(म्लेच्छांचा नाश करण्याची दीक्षा यौवनाच्या आरंभी घेतलेले)
छत्रपती संभाजी महाराजांनी त्यांच्या पित्याचे केलेल वर्णन.

'' अयं कौमारमारभ्य... यवनानवजानाति''
(हा कुमारवयाच्या आरंभापासून यवनांना अपमानित आला आहे)
शिवभारत १७:२१

तुरूक, म्लेच्छ आणि यवन हे वरील उताऱ्यांमधील शब्द
एकाच अर्थाने वापरलेले आहेत.